म ग्र सं. ठाणे
विषय कु प्रवास
स क्र. ५६०२




REFBK-0020829



# पश्चिम गंधा

मीना देशपांडे

REFBK-0020829

किर्लोस्कर प्रेस प्रकाशन

किर्लोस्कर प्रेस प्रकाशन

# पश्चिमगंधा

प्रथमावृत्ती  मार्च १९७५

किंमत साडेसात रुपये

© मीना देशपांडे

मेकर महाल, पेरी रोड, बांद्रा, मुंबई ५०

मुखपृष्ठ  प्रभाकर गोरे

रेखाचित्रे  ग ना जाधव

मुद्रक - प्रकाशक

मु श किर्लोस्कर

किर्लोस्कर प्रेस

वीर सावरकरनगर, पुणे ४११००९

२०१२०
९२.५१

# चार शब्द

'पश्चिमगधा' या आकर्षक नावाचे सौ मीना देशपांडे हिचे हे प्रवास-वर्णनाचे चिमुकले पुस्तक वेष्टनावरल्या सुंदर चित्रापासून तो शेवटच्या चटका लावणाऱ्या पानापर्यंत मी वाचून टाकले आनुवंशिकतेचे शास्त्र तसे फारसे मला समजलेले नाही, पण 'पश्चिमगधे'तली सुरेख, प्रवाही मराठी भाषा वाचताना, अस्सल मराठी भाषेचे महान मानकरी माझे प्रिय मित्र आचार्य अत्रे याची लेखिका मीना ही सुकन्या आहे, याची मधूनमधून एकसारखी आठवण होत होती लडनमध्ये उतरल्यावर ती म्हणते, '..लडनला गेल्यावर तिथे जाऊन नाटके बघायची नाहीत म्हणजे पढरपूरला जाऊन पाडुरगाचे दर्शन न घेण्यासारखे आहे.

लडन, कोपेनहेगन, रोम इत्यादी युरोपमधील महत्त्वाची नगरे लेखिकेने पाहिली, पण या प्रवासासबधी आपण लिहूच अशी तिला खात्री नव्हती विरगुळा म्हणून तिने लेखाक लिहायला सुरुवात केली लिहिता लिहिता तिला प्रवासातल्या नावीन्यपूर्ण अनुभवाच्या पुन प्रत्ययाचा आनद मिळू लागला हा पुन प्रत्यय युरोप पाहिलेल्या रसिक वाचकाला मिळेलच पण पाहिलेल्या आणि न पाहिलेल्या सर्वच चांगल्या वाचकाना 'पश्चिमगधे'तली वर्णने एक नवा प्रत्ययही देतील शहरे, देश, निसर्ग पुष्कळ लेखकानी पाहिलेला असतो आणि स्थळ तेच असले तरी प्रत्येक चांगला लेखक त्या सबधी नवे काही तरी चांगले लिहीत असतो युरोपी किंवा अमेरिकी वृद्धा

किती आत्मीयतेने रंगरोगण करून, झोकदार वेशभूषा घालून जीवनात रस घेण्याचा प्रयत्न करीत असतात याचे मार्मिक वर्णन लेखिकेने केले आहे

आमच्या इथे, विशेषतः पूर्वीच्या काळी फार उशिरा म्हणजे पधराव्या वर्षी लग्न होऊन पस्तिसाव्या वर्षी चार-पाच मुले असलेली पुरुषरी वाकलेली वृद्धा होत असे आताही शहराबाहेर हे दृश्य पुष्कळ वेळा दिसते हे सर्व माहीत असलेल्याला, युरोपी स्त्रीच्या जीवनोन्मुखतेबद्दलचा आणि भारतीयांच्या ऐहिकतेपेक्षा मोक्षाकडे दृष्टी असलेल्या प्रवृत्तीचा चागला प्रत्यय येईल नवीन स्थलांपेक्षाही नवीन माणसांच्या मनाचा शोध घेण्याची लेखिकेची प्रवृत्ती मला स्पृहणीय वाटते चांगल्या प्रवासवर्णनांत ‘ पश्चिम-गधा ’ ही निश्चितपणे एक चांगली भर आहे

२५ फेब्रवारी, १९७५ — **अनत काणेकर**

# अशीच एकदा...

आपल्या आयुष्यात काही काही अनपेक्षित गोष्टी का घडतात, कशा घडतात, याला काही कारण आहे का? असलेच तर ते कधी कुणाला सांगता येईल का? कदाचित् सांगता आले तर केवळ योगायोग हेच असू शकेल माझ्या आयुष्यात योगायोगाने घडणाऱ्या गोष्टींची प्रचीति अनेक वेळा आली आहे, अजूनही येत आहे.

अशीच एकदा थंडीच्या मोसमातील एका मस्त दुपारी मी माझ्या मैत्रिणींबरोबर आरामात गप्पा मारीत बसले होते पुष्पा, निर्मला अन् मी—आम्ही तिघी जिवाभावाच्या मैत्रिणी मैत्रिणी कसल्या, बहिणीच जणू, इतक्या आम्ही एकमेकींच्या जवळ आलेल्या पुष्पा बी ए ला मराठीत पहिले बक्षीस पटकवणारी, हुषार, नरतरीत, वटमोगरीसारखी सदा हसरी बोलकी मुलगी! पण मुले मोठी होऊन दिवसभर शाळेत जाऊ लागल्यामुळे आयुष्यात पोकळी निर्माण झाल्यासारखे वाटू लागले होते तिला निमाही एक बुद्धिमान, सुस्वरूप, नोकरी करणारी मुलगी नोकरीमुळे एका जागी आयुष्य खुटल्यासारखे झाले होते स्वतःची उन्नती करून घेण्याचा मार्ग कुठेच सापडत नव्हता निदान परदेशी जाऊन तरी नशिबाची परीक्षा पहावी म्हणून तिची एकसारखी धडपड चालू होती अन् मी मी तर पुरती अस्वस्थतेने घेरलेली जरा कुठे आयुष्य किंचित थबकल्यासारखे वाटू लागले तरी त्या परिस्थितीत तात्काळ बदल घडवून आणण्यासाठी धडपडणारा स्वभाव नक्कीच आनुवंशिक असावा! आयुष्यातील निष्क्रियतेचा मला कंटाळा आला होता

परंतु दिशा सापडेन नव्हती काहीतरी केले पाहिजे, धडपडले पाहिजे ही जाणीव अंकुशासारखी मनला टोचणी देत होती

तर अशा या अस्वस्थतेतून निमाचा अन् माझा परदेश प्रवासाचा बेत बाहेर पडला अर्थात त्यामुळे आमच्या परिस्थितीत काय फरक पडणार होता देव जाणे ! पण कुठल्यातरी दिशेने धडपड करण्यासाठी एक कारण मिळाले होते एवढेच शिवाय परदेशप्रवासाची उत्कट इच्छा मनात कित्येक दिवस सुप्त राहिलेली हाती ही गोष्ट वेगळी

त्या दिवशी दुपारी आम्ही दोघीनी परदेश प्रवासाचा बेत आखला अन् कल्पनेच्या भगात आम्ही प्रवाससुद्धा करून आलो पण दुसऱ्याच क्षणी मी स्वप्नातून खाडकन् जागी झाले निमाचे ठीक होते, ती पूर्णपणे स्वतंत्र होती, पण मी ? मी तर संसारात गुरफटलेली, दोन मुलांची आई होते अन् ह्या विचारानी माझ्या मनाने पलटी खाल्ली माझा बेत ढासळू पहातो आहे हे लक्षात येताच निमाने घाईघाईने आमच्या प्रवासाच्या बेताला माझे पति सुधाकर ह्यांचेकडून परस्पर संमतीसुद्धा घेऊन टाकली ! द्विधा मनःस्थितीत मी तयारी सुरू केली

माझ्या हातावरची परदेश प्रवासाची रेषा अगदी उत्तम असली पाहिजे ! नाहीतर त्याच सुमारास लंडनच्या सुप्रसिद्ध श्रीमती आजीबाई बनारसे ह्यांची कन्या सौ कला मेहेता व जावई श्री प्रतापभाई मेहेता ह्यांची मुंबईत ओळख व्हायचा योग कसा जुळून आला असता ? पहिल्या भेटीतच त्या दोघानी लंडनला त्यांच्या घरी उतरण्याचे मनःपूर्वक आमंत्रण दिले

तसे युरोपला यायचे आमंत्रण फार पूर्वीपासूनच मिळाले होते मला सुधाकरांचे एक आवडते विद्यार्थी व नंतरचे जिवलग स्नेही डॉ मधुकर चोडणेकर हे स्वित्झर्लंडमधील बासल ह्या गावी स्थायिक झाले होते त्यांनी इंगेबोर्ग हास्लाभर ह्या जर्मन मुलीशी विवाह केला होता इंगेची अन् माझी पत्ररूपाने दाट मैत्री जमली होती तिला भेटायची मला फारच उत्सुकता लागली होती तीही दर पत्रातून मला युरोपला येण्याविषयी लिही ते वाचले की मला खूप हसू येई भारतातून परदेशी जाणे इतके सोपे वाटले की काय ह्या वेड्या पोरीला ?

अन् अखेर मी व निमा प्रवासाला निघालो लंडनला थोडे दिवस राहायचे व इग्लंडमधील बघता येईल तेवढी स्थळे बघायची, नंतर लंडन-मधील 'कॉसमॉस' ह्या प्रवासी कंपनीच्या बसने युरोपाची सोळा दिवसांची सफर करायची व स्विझर्लंडाला थोडे दिवस राहायचे असा आम्ही प्रवासाचा आराखडा आखला पुन्हा प्रवासाचा योग कधी येतो कोण जाणे म्हणून आम्ही जेवढी शक्य असतील तेवढी ठिकाणे बघून घेत होतो अगदी आधाशीपणाने डोळ्यांची तृप्ती होईपर्यंत। अनेक देश पाहिले अनेक लोकांच्या ओळखी झाल्या त्यांच्या स्नेहाने, आदरातिथ्याने मने भारावून गेली अशा या अपूर्व अनुभवांचा आस्वाद घेत असतानाच एकाएकी माझ्या प्रिय आईच्या दु खद निधनाची वार्ता कळली। आईची काय किंमत असते हे त्या दिवशी कळले मला तिच्यापुढे सर्व काही निष्फळ, निरर्थक वाटू लागले मला।

मुबईला मी परतले ती अत्यंत विकल मनाने। आई ह्या जगात नाही ही कल्पनाच सहन होईना एकसारख्या तिच्या आठवणी येऊन मन बेचैन होऊ लागले डोळ्यातील पाणी थांबेना कशातच मन लागेना शेवटी तिची व माझी भेट झाली नाही ही जाणीव मनाला सतत टोचणी देत होती माझ्या प्रिय आईचा मृत्यू बघविला नसता म्हणून अखेरच्या क्षणी मी तिच्या जवळ नसणे ही दैवी योजना तर नव्हती ना ? माझ्या या मानसिक अवस्थेची कल्पना माझ्या बहिणीला– नानीला– आली तिने मला खूप धीर दिला प्रवासातील अनुभव लिहून काढ म्हणून तिनेच मला सुचविले

प्रथम मी तिच्या सूचनेकडे दुर्लक्ष केले पण वेळ कसा घालवावा हा प्रश्न माझ्यापुढे होताच तेंव्हा वेळ घालविण्याचे एक साधन म्हणून मी ह्या लेखनाला हात घातला अन् हळूहळू त्यात माझे मन रमू लागले अनुभव लिहिता लिहिता प्रवासातील ते दिवस मी पुन्हा अक्षरश जगले। प्रवासात भेटलेल्या व्यक्तींचा सहवास पुन्हा एकवार घडला त्यांच्याशी मी बोलले, हसले, गप्पा मारल्या, त्यांच्या स्नेहाचा अनुभव घेतला। सर्व सौंदर्यस्थळांना पुन्हा भेटी दिल्या त्यांच्या दर्शनाचा आनंद लुटला या लिखाणाद्वारे मी माझे मन मोकळे केले माझे दु:ख हलके केले मनात दाटून आलेल्या

भावनांचा असह्य भार उतरविला त्यामुळे माझ्या मनाला थोडीफार शांती लाभली

ह्या लिखाणाला प्रथम प्रकाशात आणले ते माझी वहीण नानी ऊर्फ सौ शिरीष पै हिने तिच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध होणाऱ्या मराठा ह्या वृत्तपत्रातून तिने हे लेख प्रसिद्ध केले पुस्तकरूपाने हे लेखन कधीकाळी प्रसिद्ध होईल अशी कल्पनाही नव्हती अन् हेतूही नव्हता तो केवळ योगायोग ! जे काही अनुभवले ते हृदयातून सहजस्फूर्तपणे शब्दद्वारे बाहेर पडावे, उत्कटपणे कुणालातरी सांगावेसे वाटावे एवढीच ह्या मागची भावना।

माझ्या भावना ज्यांना समजल्या, त्यांच्याकडे ज्यांनी अत्यंत आपुलकीने पाहिले व त्या पुस्तकरूपाने वाचकांपुढे आणल्या, ते श्री मुकुंदराव किर्लोस्कर व त्यांचे सहकारी श्री चिं ग वझे, चित्रकार श्री ग ना. जाधव, श्रीमती लीलाबाई बावडेकर ह्यांचे माझे कायमचे स्नेहसंबंध जुळले हाही केवढा योगायोग !

'पश्चिमगंधा' हे नाव तर सर्वस्वी श्री प्रभाकर गोरे ह्यांचे, मुखपृष्ठाची कल्पनाही सर्वस्वी त्यांचीच ! मना जे काही सांगायचे होते ते त्यांच्या कुंचल्याने नेमके पकडले

माझ्या वडिलांचे परमस्नेही व महाराष्ट्राचे प्रख्यात लेखक पद्मश्री श्री अनंत काणेकर ह्यांचा पितृतुल्य आशीर्वाद मला लाभला, हे माझे मोठे भाग्यच होय !

हे अनुभव मिळविण्यासाठी ज्या ज्या व्यक्तींनी मला मदत केली उत्तेजन दिले, स्फूर्ती दिली, त्या सर्वांविषयी कृतज्ञतेची भावना सदैव माझ्या मनात राहील

एकच हुरहूर मनात आहे हे अनुभव सांगून जिच्या आयुष्यात एक घटकाभर विरंगुळा उत्पन्न करण्याची माझी उत्कट इच्छा होती, ती माझी आई या जगात नाही, अन् ज्यांनी माझ्या पहिल्याच प्रयत्नाचे कोडकौतुक केले असते ते माझे पपा कधीच हे जग सोडून गेले आहेत

— मीना देशपांडे

# ९. व्हेनेत्झिया, तू मला फार आवडतेस !....

'व्हेनेत्झिया, तू मला फार आवडतेस ' तो खड्या सुरात गात होता त्याच्या हृदयस्पर्शी, भावनापूर्ण गीतांचे सूर रात्रीच्या शांत वातावरणात तरंगत दूरवर जात होते गिटारवर छेडलेले दर्दभरे संगीत त्याच्या गीताला सुंदर साथ करीत होते गाण्याच्या तालावर वर-खाली होत गोंडोला हलके हलके पुढे सरकत होते वल्हो मारताना बाजूला होणाऱ्या पाण्याचाच काय तो चुळुक चुळुक असा मधून मधून आवाज येत होता बाकी सर्वत्र अगदी नि:शब्द शांतता पसरली होती काठावरती स्तब्धपणे उभी असलेली माणसेही कोरीव पुतळ्यांसारखी भासत होती

गायक दिसायला मोठा देखणा होता पिंगट कुरळे केस, निळसर, भावुक डोळे, बाकदार नाक, पातळ ओठ, लालसर तुकतुकीत अंगकांती, भरदार बांधा– जणू काही एखाद्या इटालियन चित्रपटातील नटच ! गाताना उभे रहाण्याची, हावभावाची पद्धतही ऐटबाज, आकर्षक दोन्ही हात पसरून तो तन्मयतेने पुन्हा पुन्हा आळवत होता–

**'व्हेनेत्झिया, तू मला फार फार आवडतेस,**
**म्हणूनच मी तुझ्याकडे परत येतो !"**

भरदार आवाजात गायलेले ते सूर अगदी हृदयाला जाऊन भिडले प्रेमीजनांच्या आठवणी उचंबळून वर आल्या डोळ्यासमोर सुंदर स्वप्न तरंगू लागली

थोड्या वेळापूर्वी गोंडोलात बसताना 'कॉसमॉस' कंपनीच्या युरोपीय सफरीतील आमची मार्गदर्शिका आणि यजमानीण मँडी हिने आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे माहिती सांगण्यास सुरुवात केली होती. काही वर्षांपूर्वी व्हेनिस शहरातील एका कालव्यात एक गोंडोला अपघाताने उलटून अनेक माणसे बुडून मृत्युमुखी पडली. त्यांचे मृतदेह गोंडोलातून वाहून नेताना ख्रिस्ती धर्माच्या पद्धतीप्रमाणे शोकनिदर्शक काळा रंग गोंडोलांना देण्यात आला. तो रंग आजतागायत तसाच कायम राहिला आहे. व्हेनिसमधल्या अरुंद कालव्याचे गढूळ पाणी अगदी काळपट हिरव्या रंगाचे आणि समुद्राच्या भरतीचे पाणी मिसळल्यामुळे एक प्रकारच्या उग्र दर्पाने भरलेले असल्यामुळे त्याचे सान्निध्य नकोसे वाटत होते. कालव्याच्या काठावरील दोनतीनशे वर्षांच्या जुन्यापुराण्या घराची मागची बाजूही फारशी प्रेक्षणीय नाही. सतत पाण्याशी संपर्क आल्यामुळे हिरव्या शेवाळ्याने भरलेले त्यांचे तळमजले बघून तर ही घरे कधी कोसळून पडतील अशी भीती वाटते. एकूण दृश्य तसे अस्वच्छ, उदासवाणे वाटते. आधीच रात्रीची वेळ, त्यातून गोंडोलांच्या काळ्या रंगाच्या इतिहासाने गोंडोलात पाऊल टाकताना भीतीने अंगावर काटाच उभा राहिला.



आमची चेष्टेखोर ऑस्ट्रेलियन सहप्रवासिनी मॉली मनातील भीती लपविण्यासाठी, 'कोणाला पोहता येते का' म्हणून प्रत्येकाला विचारू लागली. वरकरणी तिची चेष्टा करीत, हसतखेळत आम्ही गोंडोलात स्थानापन्न झालो. आमची करमणूक करण्यासाठी मँडीने मुद्दाम एक इटालियन गायक व त्याचा साथीदार

गोंडोलात घेतले संगीत ऐकता ऐकता नौकानयन करण्याची कल्पना रोमहर्षक होती धक्क्याला रेटे देऊन नावाड्यांनी तिन्ही गोंडोला एकामागोमाग पाण्याच्या प्रवाहावर अलगद सोडले

थंडीवाऱ्याला सतत तोंड दिल्याने काळपट पण सशक्त अंगकांती असलेले, देखण्या चेहऱ्याचे, चट्टयापट्टयाचे रंगीबेरंगी गंजीफ्रॉक घातलेले नावाडी किंचित मद्य-प्राशन केल्याने मोठ्या खुषीत होते तसे ते मूळचेच बडबडे, गमत्ये व आनंदी स्वभावाचे इतर पाश्चात्य देशातील लोकांचे कडक इस्त्री केल्यासारखे चेहरे बघून अवघडलेल्या मनाला एकदम मोकळे, अगदी घरच्यासारखे वाटू लागले गायकाच्या साथीदाराने गिटारवर स्वरांची जुळवाजुळव सुरू केली त्याबरोबर एका नावाड्याला गाण्याची हुक्की आली रोज ऐकून पाठ झालेल्या एका गाण्याची हुबेहूब नक्कल करून भसाड्या आवाजात त्याने गायला सुरुवात केली गायकाकडे मोठ्या उत्सुकतेने बघणाऱ्या सर्वांचा एकदम अपेक्षाभंग झाला सर्वांनी एकच गिल्ला केला खजील होऊन नावाड्याने मुकाट्याने वल्हे मारण्यास सुरुवात केली हातात हात घालून जाणाऱ्या मैत्रिणीप्रमाणे आमचे तीन गोंडोला पाण्यावर संथपणे तरंगू लागले इतका वेळ मिस्कीलपणे हसत, गंमत बघत असलेल्या गायकाने आपली सिगरेट विझवली व तो उठून उभा राहिला आपली निळसर घारी नजर सर्वांवर फिरवली त्याच्या डोळ्यात एक प्रकारचा गूढ भाव चमकू लागला चेहऱ्यावर निराळेच तेज पसरले गिटारमधून स्पष्ट सुरेल सूर निघू लागले दोन्ही हाताचे पंजे पसरून गायकाने हृदयाच्या आतल्या कप्प्यातून आवाज काढून गायला सुरुवात केली

**व्हेनेत्झिया, तू मला अगदी बेचैन करून सोडले आहेस**

सुरांनी आणि भावांनी एक अद्भुतरम्य मोहजाल पसरले इतका वेळ एकमेकांशी थट्टामस्करी करीत असलेली सर्व मंडळी एकदम स्तब्ध झाली येता जाता फुटाण्यासारख्या टणाटणा उडणाऱ्या चेष्टेखोर मॉलीचे डोळे पाण्याने ओलावल्यासारखे दिसू लागले कदाचित भूतकाळाचा वेध घेणारे तिचे मन गततारुण्यातील विफल प्रेमकहाणीच्या आठवणीने व्याकूळ झाले असावे

प्रवास सुरू होऊन चारपाच दिवसाचा सहवास घडतो न घडतो तोच जुळलेल्या प्रेमानें बेहोष होऊन गेलेली अमेरिकन कॅथी अन् तिचा स्पॅनिश रोमियो आजूबाजूच्या जगाची पर्वा न करता सतत एकमेकांवर प्रेमाचा वर्षाव करीत होती अन् आता तर ती दोघे इटालियन गाण्याच्या उन्मादक सगीताने धुद होऊन एकमेकाच्या बाहुपाशात गुरफटून भावी आयुष्याची सुखस्वप्ने रंगवीत स्वस्थ पडली होती हे प्रेमाचे चालतेबोलते शिल्प हाँगकाँगचा चिनी वाँग अगदी अधाशासारखा न्याहाळीत होता

एकमेकांच्या सहवासात सुखदु खाचे अनेक हिवाळे–पावसाळे काढलेल्या त्या प्रौढ जोडप्याच्या चेहऱ्यावर सुदर शांत भाव दिसू लागला एकमेकांकडे अर्थपूर्ण सस्मित नजरेने बघता-बघता त्याचे हात नकळत गुफले गेले रूक्ष–सामान्य रूपाची एक शिक्षिका–गुडघ्याला दोन्ही हातांची मिठी मारून, त्यावर डोके टेकवून कसल्यातरी विचारात गुगून गेली होती कदाचित आपल्या सरत्या तारुण्यामुळे कोणी कधी आपल्याकडे आकृष्ट होईल का, इतक्या उत्कटपणे आपल्यावर कोणीतरी प्रेम करील का, या विचाराने तिच्या चेहऱ्यावर एक उदासीन छटा दिसू लागली असावी अगदीच बिचारी निराधार व असहाय्य दिसत होती

व्हेनेत्सिया व्हेनेत्सिया ।'

सूर वाढतच होते कधी उदास तर कधी हर्षभरित, कधी लाडिक तर कधी प्रेमविव्हल, अशा विविध भावनाची गुफण मोठ्या कौशल्याने करून गायकाने बघता-बघता एका गाण्यातून दुसरे गाणे सुरू केले शब्द कळत नव्हते, पण भावनेने ओथबलेले ते सूर बोलून जात होते सर्व काही सागून जात होते. पुन्हा तेच गूढ मोहमय वातावरण, तीच समाधी, तीच तद्री, मनाला आलेली धुदी असे वाटत होते, की कधी हे सपूच नये, सर्व जाणिवा नष्ट व्हाव्या, सुरांच्या झोल्यावर झोके घेताघेता निद्रेच्या आधीन व्हावे.

दुसऱ्या दिवशी सकाळी जाग आली तेव्हा उगीचच उदास वाटत होते डोके सुन्न झाले होते खिडकीतून बाहेर पाहिले तेव्हा आजूबाजूच्या कारखान्यांची उचच उच काळीकुट्ट धुराडी दिसत होती मधूनमधून मोडक्या मोटारींचे मोठमोठाले डोगर साचले होते इटालियन लोक बेफामपणे मोटार

चालवण्यात नावाजलेले आहेत त्याच्या बेफाम ड्रायव्हिंगचेच ते अवशेष होते त्या रुक्ष वातावरणात उत्साह गळून गेल्यासारखे वाटू लागले

व्हेनिस शहराचे इंग्लिश S ह्या अक्षराच्या आकारासारख्या 'ग्रँड कॅनाल' ह्या कालव्याने दोन भाग केले आहेत अलीकडच्या ह्या कारखान्यांनी गजबजलेल्या रुक्ष भागापेक्षा कालव्याच्या पलीकडील व्हेनिस फारच निराळे आहे सकाळी ९ वाजता आम्ही मोटार-बोटीने ग्रँड कॅनालमधून प्रवास करून पलीकडच्या बाजूच्या रियाल्टो ह्या पुलाजवळील धक्क्यावर जेव्हा उतरलो तेव्हा खऱ्या व्हेनिसचे दर्शन घडले सरोवरात दाटीवाटीने रंगीबेरंगी कमळे फुलावीत त्याप्रमाणे पाण्यातून वर आलेली एकशे अठरा चिमुकली बेटे, त्यावर वसलेली चित्रविचित्र जुनीपुराणी जलनगरी व्हेनिस ऊर्फ व्हेनेत्झिया, बेटांना जोडणारे छोटेछोटे कमानदार पूल, त्याखालून वाहणारे हिरवट रंगाचे अरुंद कालवे, कालव्याच्या काठावर एकमेकींचा आधार घेऊन उभ्या राहिलेल्या इमारती, त्यामधून जाणाऱ्या, मारुतीच्या शेपटीप्रमाणे लांबच लांब नागमोडी गल्ल्या, त्यावरून चालणारी परदेशी प्रवाशांची अखंड रहदारी, अस्सल सोन्याच्या नाजूक वेलबुट्टीने मढवलेली सुबक काचपात्रे व रंगीबेरंगी सुरया यांनी सुशोभित केलेली छोटी दुकाने, पिझ्झा व स्पॅगेटीच्या आस्वादाने दरवळणारी खाद्यालये, मस्तकात शिरणारा कपॅचिनो ह्या इटालियन कडक कॉफीचा वास—

हे सर्व जगच निराळे आहे देखणे, आनंदी, मनमोकळे, बडबडे, गजबजाटाने भरलेले— असे वाटते, की बाहेरील यांत्रिक, कृत्रिम, अरसिक जगाचा संपर्कसुद्धा लागला नसावा ह्या जगाला आपल्यापेक्षा दुसरे वेगळे जग आहे, ह्याची जाणीवसुद्धा नसावी ह्या साध्या, सुंदर, निष्पाप जगाला। येथील अद्भुतरम्य वातावरणाच्या ओढीने लाखो परदेशी प्रवासी येतात म्हणूनच काही थोडीफार विचारांची देवाणघेवाण होत असेल तेवढीच प्राचीन काळचा पूर्व-पश्चिमेला जोडणारा, वैभवाच्या पराकोटीला पोचलेला हा व्यापारी दुवा—आता त्याच्या गतवैभवाची साक्ष देतात केवळ मोठमोठी चर्चेस व चित्रकला संग्रहालये। एरवी हे शहर जगते ते परदेशी प्रवाशांच्या जीवावरच

व्हेनिसमधून फेरफटका मारून झाल्यावर आमची प्रवासी यजमानीण मॅडी हिने आम्हाला स्वतंत्रपण खरेदीसाठी जाण्यास मोकळीक दिली बरोबर दुपारी एक वाजता रियाल्टो पुलाच्या धक्क्यावर येण्यास बजाविले व ती आपल्या इटालियन मित्राला भेटण्यासाठी तरातरा गर्दीत दिसेनाशी झाली आईचा डोळा चुकवून एकटे भटकण्याची मजा लुटणाऱ्या लहान मुलाच्या उत्साहाने मी, निमा व हाँगकाँगचे एक गुजराथी जोडपे असे चौघेजण गल्ल्यागल्ल्यातून भटकू लागलो मधूनमधून घड्याळाकडे लक्ष होतेच गुजराथी जोडप्याची धुमधडाक्यात खरेदी चालू होती अशात किती वेळ गेला हे कळलेच नाही आपण कुठे आलो आहोत याचा ठावठिकाणा लागेना असे वाटले, की रियाल्टो पूल एवढा प्रसिद्ध, त्याचा पत्ता सहज कोणीही सांगेल पण विचारायचे तरी कुणाला ? बहुतेक सर्व आमच्यासारखेच बाहेरून आलेले प्रवासी त्यात भाषेची अडचण ! त्यातल्या त्यात इटालियनसारख्या दिसणाऱ्या एखाद्या व्यक्तीला ' रियाल्टो ? एवढेच प्रश्नार्थक विचारायचा प्रयत्न केला तर त्याने खांदे उडवून गमतीदार हावभाव करून कुठल्यातरी दिशेने बोट दाखवावे आणि काहीतरी बरेच मोठे लांबलचक बडबडावे सुरुवातीला आम्ही अगदी बरोबर त्याने दाखवलेल्या दिशेने जायचा प्रयत्न केला आता नक्की पूल सापडणार असे वाटले पण नंतर लक्षात आले, की ही पत्ता सांगणारी माणसे आपल्याला चुकीच्याच दिशेने पाठवीत आहेत ! मग मात्र आमचे धाबे दणाणले आपल्याकडल्या खेडुताला रस्ता विचारला असता तो ज्याप्रमाणे ' ह्यो नव्ह का पल्याड डोंगूर दिसतुया तथंच जावा ' म्हणून दोनचार मैल तंगडतोड करायला लावतो त्याची आठवण झाली वेड्यासारखे दिसेल त्या गल्लीतून आम्ही धावत सुटलो चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यूप्रमाणे आमची अवस्था झाली किती पूल ओलांडले, किती गल्ल्या तुडवल्या त्याची गणतीच नाही घड्याळाचा काटा एकजवळ हळूहळू येऊ लागला, तसा मात्र भीतीने पोटात खड्डा पडला गरमगरम पिझ्झाच्या दरवळणाऱ्या सुगंधाने भुकेचा भडका उडाला होता पण खाण्यात थोडा जरी वेळ गेला तरी बोट चुकेल म्हणून तिकडे नाइलाजाने दुर्लक्ष करून आम्ही धावत होतो

एकसारखे पूल चढून उतरून पाय ठणकू लागले डोळ्यात नकळत पाणी येऊ लागले एक वाजेपर्यंत रियाल्टो पुलावर पोचलो नाही तर बोट

चुकणार आणि आपल्या प्रवासाचा गोंधळ उडणार असे दृश्य डोळ्यासमोर दिसू लागले रस्ता सापडण्याची आशाच खुटली! मुंबईला मागे एका गुरु-महाराजांच्या भेटीचा योग आला होता त्या वेळी त्यांनी एक गुरुमंत्र सांगून त्याचा मनातल्या मनात जप कर, असे सांगितले होते त्यावर माझा काही विश्वास बसला नव्हता तो मंत्र मी जवळजवळ विसरूनच गेले होते पण ह्या वेळी मात्र कशी कोण जाणे एकाएकी त्या मंत्राची आठवण झाली तो मंत्र मनातल्या मनात म्हणायला मी सुरुवात केली आणि काय असेल ते असो, कदाचित योगायोगही असेल— पण अचानक ग्रँड कॅनालचे दर्शन घडले! सर्व शक्ती एकवटून आम्ही धावत सुटलो धक्क्यावर आलो तेव्हा बोट सुटण्याच्या बेतात होती आम्हाला बघून मॅडीने सुटकेचा नि:श्वास सोडला आमची काय अवस्था झाली याची तिला स्वानुभवाने कल्पना आली असावी अशी ही गूढ, मोहमयी, सुरम्य, परीकथेतील वाटणारी स्वप्नमय जलनगरी व्हेनेत्झिया! ही सोडताना लक्षात आले, की हिने आपल्या काळजाचा तुकडा तोडून घेतला आहे ही चैतन्याने भरलेली, चालती-बोलती जिवंत नगरी हृदयाला चटका लावून गेली, मनात चिरंतन स्मृती ठेवून गेली अजूनही ते धुंद सूर मस्तकात घोटाळत आहेत, हृदयावर कोरले गेले आहेत, देहाच्या कणाकणात जाऊन भिनले आहेत, "व्हेनेत्झिया, कधी भेटणार तू परत, कधी भेटणार?"

□ □

## २. मृताची नगरी

"अरेरे! अखेर ब्रूटस तूही—!" पुढचे शब्द तसेच ओठावर थिजले शेवटचा घाव जिव्हारी लागला, छातीतून आरपार गेला! रोमच्या महान सम्राटाचा, जुलियस सीझरचा देह तडफडत धरणीवर कोसळला त्याचबरोबर जवळजवळ अर्ध्या जगावर सत्ता गाजविणाऱ्या रोमच्या वैभवशाली साम्राज्याचा उत्तुंग मनोरा धडाधड कोसळला. अनेक रथीमहारथींवर मिळवलेले दैदीप्यमान विजय, सारी पृथ्वी पादाक्रांत करण्याची महत्त्वाकांक्षा धुळीस मिळाली एका महान् पर्वाचा शेवट झाला!

सम्राटाच्या मृत शरीरातून रक्ताची हजारो कारंजी उडाली त्यात रंगलेल्या नंग्या तलवारी विजयी पताकांसारख्या मिरवीत नाचत वेड्यापिशा मारेकऱ्यांनी गर्जना केल्या, "स्वातंत्र्याचा जयजयकार असो! साम्राज्यशाहीचा नि:पात होवो !!!" स्वातंत्र्याच्या ह्या अकस्मात घडलेल्या दर्शनाने जनसमुदाय भयचकित झाला लाडक्या सम्राटाच्या मृत्यूच्या दु:खाने अश्रू ढाळावेत की नवस्वातंत्र्याचे स्वागत करावे? शत्रू कोण आणि मित्र कोण हे कळण्याची शुद्ध राहिली नाही एकच गोंधळ उडाला पळापळ सुरू झाली दौडत आलेल्या घोड्यांच्या टापाखाली माणसे चिरडली गेली रणकंदन सुरू झाले अनेक निष्पाप जिवांची हत्त्या, स्त्रियांच्या करुण किंकाळ्या आणि हे सर्व दृश्य बघणारी ज्युलिअस सीझरची गोठलेली नजर

छे, छे, विचार भलतीकडेच भरकटत चालले होते भणभणणारे मस्तक जोराने हलवून विचारमालिका झटकून टाकली हेच ते रोमन फोरम

जिथे एका महान साम्राज्याचा शेवट झाला आता तिथे उरले आहेत फक्त त्या वैभवाचे भग्न अवशेष अर्धवट मोडकळीला आलेल्या दोनचार कमानी, आडवे-तिडवे पडलेले स्तंभ, मधूनमधून उगवलेले गवत, शेवाळाने भरलेले पायाचे दगड । आणि पलीकडच भग्नावस्थेतल्या मूक व्हेस्टाल व्हर्जिन्स पवित्र अग्नीच्या सरक्षणासाठी आजन्म कौमार्याचे व्रत लादल्या गेलेल्या त्या अखड कुमारिका व्रतभंग घडल्यास जिवतपणी मातीत गाडून घेण्याची शिक्षा त्यांना भोगावी लागे त्या भीषण मृत्यूच्या भयाने अतृप्त वासनांचा कोंडमारा करून आपल्या भग्न हृदयाचे होणारे शतश तुकडे आपल्याच निर्जीव डोळ्यानी पाहात हजारो वर्षे उभ्या आहेत

त्यातल्याच एका रिआसिल्वा नावाच्या कुमारिकेचा प्रतिज्ञाभंग झाला, आणि तिने जन्म दिला दोन जुळ्या बालकाना– रोम्युलस आणि रिमस ही त्याची नावे मृत्यूच्या भयाने तिने त्या नवजात बालकांना एका टोपलीत घालून टायबर नदीच्या प्रवाहात सोडून दिले त्या असहाय्य कोवळ्या बालकांना एका लांडगीने वाचविले, व नदीकाठी असलेल्या पॅलेटाईन टकडी-वर त्याचा साभाळ केला त्याना आपले दूध पाजून वाढविले त्या निराधार बालकाना बघून लाडग्यासारख्या क्रूर प्राण्यालाही माणुसकीचा पान्हा फुटला. पण मानवाच्या जातीत जन्म घेतलेल्या त्या भावाभावांनी एकमेकाशी वैर केले रोम्युलसने रिमसची निर्घृण हत्या केली भावाभावाच्या वैमनस्या-तून रोम नगरीचा जन्म झाला त्याच्याच वशजानी माणुसकीची हत्या घडविण्याची परपरा पुढे चालविली अनेक वेळा रोमच्या साम्राज्याने धुळीतून जन्म घेतला आणि तितक्याच वेळा ते पुन्हा धुळीला मिळाले

रोम शहराच्या मध्यभागी असलेल्या या रोमन फोरमच्या पलीकडेच कोलोसियम ह्या प्रचड क्रीडागणाची पडकी अर्धवर्तुळाकार भित कशीबशी उभी आहे ह्याच ठिकाणी रोमन राजांनी आपल्या जिवाच्या करमणुकीसाठी हजारो जीवघेण्या कुस्त्या घडवून आणल्या– माणसाच्या माणसांशी, माणसाच्या हिंस्त्र श्वापदांशी । कॅथॉलिक धर्माच्या असख्य अनुयायाना, दीनदुबळ्या अबलाना, कोवळ्या अर्भकाना असहाय्यपणे वाघ-सिंहाच्यापुढे भक्ष्य म्हणून फेकून देण्यात आले गरीब बिचारी किड्या-मुगीसारखी तडफडत, किंकाळत,

रडत, हालहाल होऊन मेली आणि हा सर्व क्रूर खेळ बघितला त्या फत्तराच्या काळजाच्या राजांनी व त्यांच्याबरोबर ८७ हजार प्रेक्षकांनी— अगदी मिटक्या मारत, जिभल्या चाटत इथेच घडला माणुसकीचा खून। आता शिल्लक



आहेत कोलॉसियमच्या पडक्या भिंती— तिथ बळी गेलेल्या माणसाच्या सागाड्यासारख्या तिथे वाहिलेल्या रक्ताच्या महापुराने रंगलेल्या, लाल मातीची पुटेच्या पुटे चढलेल्या।

अन् हजारो वर्षे चाललेल्या ह्या हत्याकांडाला बळी पडलेल्या अनेक निष्पाप जिवाचे असंतुष्ट, अतृप्त आत्मे तळमळत पडले आहेत एका मृत नगरीत। कॅटॅकोबूस तिचे नाव रोमपासून काही अंतरावर जमिनीच्या पोटात पोखरलेल्या शेकडो मैल लांबीच्या भुयारात अशा एका मृत नगरीचे वास्तव्य आहे ह्याची कुणालाही तिथ गेल्याशिवाय कल्पना येणार नाही

कॅटॅकोबूसच्या प्रवेशद्वाराशी एक जुनाट पडके चर्च आहे तिथे राहणाऱ्या पाद्र्यांपैकी कुणी तरी प्रवाशांना एका दरवाजातून आत नेते व या मृतनगरीचा मार्ग दाखविते मार्गदर्शकाचा चेहरासुद्धा मृतनगरीतल्या थडग्यातून उठून उभ्या राहिलेल्या प्रेतासारखा निर्विकार, थंड। यामुळे त्या भयाण वातावरणनिर्मितीत भर माल पडते त्याने दाखविलेल्या मेणबत्तीच्या

मिणमिणत्या प्रकाशात जपून पावले टाकीत एकेक जण भुयारात शिरू लागतो आणि आत पाऊल टाकताच एक प्रकारचा उग्र ओलसर दर्प नाकात शिरून गुदमरल्यासारखे वाटते भुयाराची रुंदी जेमतेम तीन फुटाची त्यामुळे कितीही अंग चोरून चालले तरी भिंतीचा थडगार ओलसर स्पर्श होतो व अंगावर काटा उभा राहतो आगगाडीच्या डब्यातील दोन टीयर, तीन टीयर बर्थप्रमाणे दोन्ही बाजूच्या भिंतीत एकावर एक रचलेल्या दफन-पेट्याच्या खुणा स्पष्ट दिसतात त्यावर साचलेली माती इतकी ठिसूळ की जरा धक्का लागताच मातीचा ढिगारा कोसळून त्याखाली आपल्यालाच जिवंत समाधी मिळते की काय अशी शंका मनाला चाटून जाते छपराला लावलेल्या मिणमिणत्या दिव्यामुळे आतला गर्द गुडुप अंधार अधिकच भयाण वाटतो मृत्यूच्या दारात उभ्या असलेल्या माणसाच्या घशातून निघणाऱ्या घरघरीसारख्या आवाजात मार्गदर्शकाची चर्पटपंजरी चालूच असते एक-मेकाच्या श्वासाचा स्पर्श शरीराला होत असतो, तोसुद्धा नकोसा वाटतो सभोवतालच्या तळमळणाऱ्या मृत आत्म्यांचेच ते निराशेने सोडलेले दीर्घ उसासे आहेत की काय असा भास उगीचच होतो सूडाने पेटलेल्या मानवी सापळ्याचा एखादा हात बाहेर यायचा आणि गळ्याभोवती आवळायचा अशी कल्पना चाटून जाते आणि अंगावर एकदम सरसरून काटा उभा रहातो हृदयाचे ठोके जलद पडू लागतात आमच्या सहप्रवाशांपकी कुणी चिनी टारगट पोरे वेडचावाकडचा भेसूर किंकाळ्या मारतात व त्याचा आवाज भुयाराच्या पोकळीतून दूरवर घुमत जातो हृदयाची धडधड आणखीनच वाढत जाते किती मैल पसरली आहेत ही भुयारे कुणास ठाऊक ? दोनशे मैल, तीनशे मैल– चुकून एखादा माणूस एकटादुकटा इकडे आला की फसलाच ! बाहेर येण्याचा मार्ग सापडणे शक्यच नाही तिथल्या मृतनगरीचे कायमचे नागरिकत्व मिळायचे त्याला ! रोमन राजाच्या छळाला आणि जुलुमाला चुकविण्यासाठी लाखो ख्रिस्ती लोकांनी या नगरीचा आसरा घेतला त्यापैकी किती लोकांना पुन्हा सूर्यदर्शन घडले असेल कोण जाणे !

येथून बाहेर पडताना मात्र पुनर्जन्म झाल्यासारखेच वाटते अशा ठिकाणी बिचाऱ्या प्रवाशांना कशाला आणतात देव जाणे ! अमेरिकन

म्हाताऱ्या मात्र 'हाऊ ब्यूटिफुल' 'मोस्ट वंडरफुल !' म्हणून उत्साहाने फुटाण्या-साऱख्या टणाटणा उडतात प्रवासाला निघाल्यानंतर जी जी ठिकाणे पाहू ती ती सुंदर असलीच पाहिजेत अशी त्या बापड्याची प्रामाणिक समजूत असते की काय कुणास ठाऊक ! त्याच्या सौंदर्यदृष्टीचे जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे

योगायोग असा, की या मृतनगरीचे दर्शन घडले ते रोम नगरीच्या स्थापनेच्या वर्धापनदिनी ! बरोबर २७२६ वर्षांपूर्वी २१ एप्रिल रोजी रोम नगरीची स्थापना रोम्युलसने केली असे म्हणतात दुसऱ्या दिवशी होता ईस्टरचा रविवार ! ख्रिस्ती धर्माचे अधिष्ठान असलेली व्हॅटिकन सिटी मोठ्या उत्साहाने सुसज्ज झाली होती सेंट पीटर्स चर्चचे ते प्रचंड अर्धवर्तुळाकार प्रांगण दोन्ही बाजूंनी वेढणाऱ्या उंच कमानीवरील संतमहंताचे शेकडो पुतळे, चर्चच्या मुख्य दरवाजातून आत शिरल्यावर दिसणारा भव्य सभामंडप बघून डोळे दिपून जातात चर्चच्या भिंतीन् भिंती सुंदर कोरीव काम केलेल्या वेलबुट्टयांनी, सोन्याचा मुलामा दिलेल्या नक्षीकामांनी संपूर्ण भरलेल्या आहेत त्या भव्य वास्तूच्या दर्शनाने आपण किती क्षुद्र आहोत याची जाणीव होते हे चर्च म्हणजे सौंदर्य, कला ह्यांचे आगरच आहे ही वास्तू उभी करण्यास किती वर्षे लागली असतील, इथल्या एक एक मूर्ती घडवताना किती कला-वंतांना उभे आयुष्य खर्ची घालावे लागले असेल त्याची गणतीच नाही

पोप हा ख्रिस्तीधर्मजगतातील सर्वश्रेष्ठ अधिकारी, परमेश्वराचा प्रेषित ! व्हॅटिकन सिटीमध्ये तो एखाद्या सम्राटासारख्या वैभवात, दिमाखात राहतो. व्हॅटिकन सिटी हे स्वतंत्र संस्थानच आहे रोम नगरीच्या मध्य भागातच ह्या संस्थानाचा पसारा आहे त्याचे स्वतंत्र आकाशवाणी केंद्र आहे, त्याचे वेगळे पोलिसखाते आहे, पोस्टाची तिकिटेसुद्धा स्वतंत्रपणे छापली जातात सेंट पीटर्स चर्चच्या डाव्या हाताला पोपचा ४–५ मजली प्रचंड राजवाडा आहे ह्या राजवाड्याच्या शेवटच्या मजल्यावरच्या दुसऱ्या खिडकीत उभा राहून तो खाली चर्चच्या भव्य प्रांगणात जमलेल्या हजारो भाविकांना दर्शन देतो, उपदेश करतो जगाच्या कानाकोपऱ्यातून पोपच्या दर्शनाला लोक येत असतात अगदी पंढरीला विठोबाच्या दर्शनाला जाणाऱ्या भक्तांच्या अधीरतेने ! पण

एखाद्या रोमन सम्राटाप्रमाणे वैभवात रहाणाऱ्या ह्या पोपच्या जवळ एखादा सामान्य ख्रिस्ती भाविक कधीतरी पोचणे शक्य आहे काय, अशी शंका मनाला चाटून जाते अजूनही रोमन बादशहाच्या वंशजाचे अवशेष शिल्लक आहेत तर, ह्या विचाराने मन विषण्ण होते

एकदा अंधार पडून दिवेलागणी झाली की रोमनगरीतल्या खऱ्या सौंदर्याचे व शिल्पकलेचे दर्शन घडते चौकाचौकातून वसविलेल्या शेकडो कारंज्यातून जलधारा बरसू लागतात मोत्यासारख्या जलबिंदूंची मुक्तपणे उधळण होते कारंज्याची ही कोरीव शिल्पे तरी किती सुंदर, वैचित्र्यपूर्ण !

रोममधील पिआझा नाहोना ह्या भव्य चौकाच्या मध्यभागी असलेल्या 'फौंटन ऑफ दि फोर रिव्हर्स' ह्या कारंज्याची एक गमतीदार गोष्ट सांगतात त्या कारंजाचा शिल्पकार बर्निनी आणि समोरच असलेल्या प्रासादाचा शिल्पकार बॅरोमिनी ह्या दोन कलावंतामध्ये एवढा हेवादावा होता, की बर्निनीने उभ्या केलेल्या कारंज्याच्या शिल्पाच्या चार कोपऱ्यांना उभ्या असलेल्या चार पुरुषांच्या पुतळ्याचे चेहरे बरोबर कोन साधून मुद्दाम त्या प्रासादाच्या विरुद्ध दिशेला फिरवलेले आहेत! न जाणो, चुकून त्या प्रासादाच्या भव्यतेच्या व सौंदर्याच्या दर्शनाने भारावून जाऊन त्या पुरुषांच्या कौतुकाचा आभास कोरीव नजरेतून व्यक्त व्हायचा !

रोमचे सुप्रसिद्ध कारंजे फौंटन ऑफ ट्रेव्ही'— जे बघायला हजारो मैलावरून प्रवासी मोठ्या उत्साहाने येतात आणि न चुकता त्यात एक नाणे टाकून जातात, ते कारंजे पियाझा ट्रेव्ही ह्या चौकात उभे आहे एका प्रचंड राजवाड्याच्या कोरीव कमानीत हे कारंजे उभे आहे समुद्र-शिंपल्याच्या रथात आरूढ झालेला समुद्रदेवतेचा पुतळा, रथ ओढीत भरधाव धावणारे घोडे, समुद्राच्या खऱ्या लाटाचा भास व्हावा अशा कोरीव दगडाच्या लाटा, त्यावरून बरसणाऱ्या जलधारा ! हे शिल्प अितके जिवंत, चालते-बोलते वाटते जणू काही समुद्राच्या उफाळणाऱ्या लाटातून उधळत, भरधाव धावणारे घोडे खरोखरच वायुवेगाने पुढेपुढे चालले आहेत असे वाटते ह्या चैतन्यमय अद्‌भुतरम्य वास्तूसमोरून एक क्षणभरही हलू नये असे वाटते

आपल्या कमनीय देहावरून असंख्य जलधारा मुक्तपणे खेळवून सचैल स्नान करणाऱ्या सौंदर्यवतीसारखीच विलोभनीय भासते ही रोम नगरी! हिच्या दर्शनाने मनाला एकदम प्रसन्नता येते हृदयातून आनंदाची हजारो



कारंजी थुईथुई नाचू लागतात आणि नकळत ट्रेव्हीच्या कारंज्यात आपण नाणे टाकतो, पुन्हा ह्या नगरीत परत येण्यासाठी!

□ □

# ३. तारुण्याने मुसमुसलेल्या वृद्धा !

माझ्या युरोपच्या प्रवासात मी अनेक प्रेक्षणीय स्थळे पाहिली, अनेक व्यक्तींशी माझ्या ओळखी झाल्या पण अेक व्यक्ती मला अगदी मनापासून फारफार आवडली तिच्या मी अक्षरश प्रेमात पडले– ती म्हणज पाश्चिमात्य गौरकाय वृद्धा ! ती कुठलीही असो, अमेरिकन, ऑस्ट्रेलियन किंवा इंग्लिश असो की इटालियन असो, आपापल्या देशातील काही खास वैशिष्ट्ये त्यांच्यात असूनसुद्धा, त्या वृद्धा मला सारख्याच वाटल्या त्या त्यांच्या एका समान गुणामुळे– उत्तम पोशाख केलेला, त्याला शोभतील असे दागिने घातलेले, निळा किंवा लाल रंग देऊन केस सुरेख कापलेले, त्यांच्यावर छोटीशी हॅट अलगद ठेवलेली, चेहऱ्यावर रंगसफेती केलेली, हातात कातड्याची मूल्यवान पर्स आणि त्याला मॅचिंग असे उंच टाचाचे बूट घालून त्यावर आपला तोल व्यवस्थित सांभाळत तरुणीप्रमाणे तुरुतुरू चालणारी ही वृद्धा म्हणजे एक मूर्तिमंत उत्साहाची पुतळीच दिसते शॉपिंग हा तिचा अत्यंत आवडता छंद प्रवास करण्याची तिला दांडगी हौस आणि दोन्ही गोष्टी करताना तिच्या उत्साहाचे आधण नुसते उतू जात असते तिचे निळसर डोळे म्हणजे जणू काही प्रेमाची अथांग सरोवरे, आणि तिचे दिलखुलास मधुर हास्य म्हणजे प्रफुल्लित कमळेच जी अेका दृष्टिक्षेपात कुणाचेही मन जिंकून घेतील

प्रवासात मला अनेक वृद्धा भेटल्या कुणी नुसत्या जाता-येता भेटल्या तर कुणाशी औपचारिक ओळखी झाल्या काहींशी तर अगदी जवळचे नाते

निर्माण झाले तरीसुद्धा त्या सगळ्या मला सारख्याच वाटल्या आणि मनात ठसला तो एकच, मातेच्या ममतेने ओथबलेला चेहरा !

मुलाबाळाच्या जबाबदारीतून मोकळी झालेली, ससारातील बऱ्या-वाईट प्रसगातून तावूनसुलाखून निघालेली ही वृद्धा पन्नाशीनतर जणू काही भूतपूर्व आयुष्याची कात टाकते आणि खास स्वत साठी जगायच्या नव्या आयुष्याची सुरुवात करते पुन्हा नव्या नवलाईने आयुष्यातील सुदर गोष्टीचा उपभोग घ्यायला सिद्ध होते तिच्या ससारातील तिचा अर्धा वाटेकरीही आपल्यापरीने तिच्या या नव्या आयुष्याला साथ देतो पण हिच्या अवर्णनीय उत्साहापुढे त्याचा उत्साह फिकाच पडतो आणि त्याची अवस्था थोडीफार केविलवाणीच वाटते दुकानात ती शॉपिंग करताना तिची पार्सले सांभाळणारा, तिची मोटार हाकणारा ड्रायव्हर, प्रवासातील तिचा वाटाड्या, घरी तिच्या कपबश्या आणि भाडीकुडी विसळणारा अशी काहीशी त्याची भूमिका असली तरी तो बिचारा खेळकरपणे, हसतमुखाने ती पार पाडतो

मुबई ते लडन आणि रोम ते कोपनहेगन ह्या सर्व ठिकाणची तरुण पिढी मला सारखीच वाटली निदान त्याची रहाणी, वागण्याची पद्धत तरी ! तेच बिनतेलाचे भुरभुरीत लाबसडक केस, त्याच विटक्या निळ्या रगाच्या जीन्स आणि त्यावर 'I love you' वगैरे प्रेमिकांची नेहमीचीच वचने असलेली ठिगळे, अगात तीच गुर्मी, तोच बेबदपणा, तीच आजूबाजूच्या जगा-बद्दलची बेपर्वाई ! मुलगी मुलासारखे वागण्याचा प्रयत्न करते आणि मुलगा मुलीसारखा लचकतो, मुरडतो ! पण या गौरकाय वृद्धा मात्र भारतीय म्हाताऱ्यापेक्षा एकदम वेगळ्या आहेत 'म्हातारी' हा शब्द आपण किंचित का होईना हेटाळणीपूर्वकच वापरतो पण या गौरकाय वृद्धाना मात्र म्हाताऱ्या म्हणवत नाही कारण म्हातारपणसुद्धा त्या इतक्या सुदरपणे जगत असतात आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंतसुद्धा जीवनातील सर्व सुदर, चागल्या गोष्टींमध्ये रस घ्यायची त्यांची वृत्ती बघून असे वाटते, की ह्याना आलेले मरणसुद्धा अतिशय सुदर असेल ! ह्या वृद्धाची जगण्याची विलक्षण हौस, उमेद पाहिली की आपल्याकडील म्हाताऱ्याची खरोखर कीव करावीशी वाटते चाळीशी जवळ आली की "आता काय वय झाल सपल आमच सार!" असे

शब्द प्रत्येकाच्या तोंडातून नकळतच निघ लागतात आणि खरे म्हातारपण जवळ यायच्या आधीच या वृत्तीने अतिक्या म्हाताऱ्या, मरगळलेल्या बनतात, की त्यांचे जिणे त्यांनाच काय पण इतरांनाही असह्य होऊ लागते कधी अेकदा म्हातारीची कटकट संपते असे घरातील प्रत्येक माणसाला वाटू लागते असे मानहानीचे जिणे पाश्चिमात्य स्त्रीच्या वाट्यास कधीच येणार नाही ती फार स्वाभिमानी असते मुला-बाळाच्या जबाबदारीतून ती वेळेवरच मोकळी होते त्यासाठी त्याना आपल्या पायावर शक्यतो लौकर स्वतंत्रपणे अुभे राहता येअील असे शिक्षण अगदी बाल्यावस्थेपासून देते त्याच्या संसारात नाके खुपशीत तिथे अडगळ म्हणून बनून रहाणे तिच्या स्वाभिमानी मनाला कधीच पटणार नाही मुला-बाळावर, नातवंडावर मायेची पाखर घालूनसुद्धा त्याच्या संसारापासून अलिप्त रहाण्याचा शहाणपणा ह्या वृद्धापासून उचलण्यासारखा आहे


दरवर्षी युरोपमध्ये येणाऱ्या हजारो प्रवाशामध्ये बहुसंख्येने वृद्धाच असतात आपल्या पतीबरोबर, नाहीतर मैत्रिणीबरोबर, नाहीतर अेकट्यासुद्धा ह्या हजारो मैल प्रवास करीत असतात सुंदरसुंदर गोष्टीचा आस्वाद मनमुराद मोकळेपणाने, अगदी पोट भरून घेतात प्रवासाप्रमाणे बाजारात जाऊन खरेदी करण्याचा— shopping चा—ह्याना भलताच छंद ! खेळणी विकत घ्यायला जाणाऱ्या लहान मुलांच्या औत्सुक्याने, लगबगीने त्या शॉपिंग करायला निघतात लंडनमध्ये ऑक्सफर्ड स्ट्रीटवर ' सेल्फ्रिजेस ' म्हणून अेक नावाजलेले चार-पाच मजली प्रचंड वस्तुभांडार आहे तिथे मिळणाऱ्या वस्तू अतिशय सुबक, सुंदर पण किमतीही तशाच मोठमोठ्या ' आपल्यासारखे बेताचेच परदेशी चलन हातात असलेले भारतीय तिथे जाऊ शकतात ते केवळ एक प्रेक्षणीय स्थळ म्हणूनच लंडनमध्ये राहिल्यानंतर अनेक प्रेक्षणीय स्थळाना भेटी दिल्याशिवाय खरे लंडन पाहिले असे वाटत नाही त्यापैकीच हे एक स्थळ म्हणून मी एकदा तिथे गेले होते All roads lead to Rome ह्या चालीवर All roads lead to Selfridges असं म्हटल्यास वावगे होणार नाही कारण दुपारी अकरा वाजले की आपली घरची कामे झटपट आवरून बाबागाडीसारख्या चाकावर ढकलता येणाऱ्या गाडीत बाजारी

पिशव्या घेऊन आग्ल वृद्धा उत्तम पोशाख पेहरून 'शॉपिंग'ला निघतात या सुमारास ऑक्सफर्ड स्ट्रीटला जाणाऱ्या बहुतेक बसेस अशा वृद्धांनीच भरलेल्या असतात

सेल्फ्रिजेसच्या अेका मजल्यावर बायकांच्या टोप्यांचा एक स्वतंत्र विभाग आहे या विभागात शिरल्यानंतर अितके मनोहारी दृश्य दिसते! तऱ्हेतऱ्हेच्या रंगाच्या सुंदर फुलांनी व पिसांनी सुशोभित केलेल्या टोप्या इतक्या कलापूर्ण रचून ठेवलेल्या असतात, की अगदी एखाद्या बहरलेल्या गुलाबपुष्पाच्या ताटव्यात शिरल्याचा भास होतो या वृद्धा भुंग्याप्रमाणे त्यांच्याभोवती रुंजी घालत असतात मुंबईच्या मरीन लाइन्सवरील शालूंच्या दुकानात प्रत्येक शालूचा पदर उलगडून तो खांद्यावर टाकून बायका ज्याप्रमाणे आरशात सतरा वेळा लचकून मुरडून बघत असतात, अगदी तशाच ह्या वृद्धा आपल्या रंगीबेरंगी केसांवर अलगदपणे एक एक टोपी कोन साधून ठेवून एकदा ह्या बाजूने तर एकदा त्या बाजूने आरशात निरखून बघतात प्रत्येकीचा हा कार्यक्रम कमीत कमी तासभर तरी चालतो तोपर्यंत बिचाऱ्या विक्रेत्या मुली सहनशीलपणे यांची कसरत बघत प्रत्येक टोपी त्यांना फारच शोभून दिसते, अगदी खास त्यांच्यासाठीच बनवलेली असल्यासारखीच, असे पटवून देण्याचा सारखा प्रयत्न करीत असतात वयोमानपरत्वे थोडासा थकवा आला की त्या जवळच असलेल्या प्रसाधन-गृहात जातात व अग बाई माझे केस विस्कटले कीऽऽ," अय्या माझी लिपस्टिक पुसली की ग' असे शाळकरी मुलींच्या तोंडात शोभतील असे चीत्कार इंग्रजी भाषेत काढून गालावर थपथपा पावडरचे फूल थापून ताज्या-तवान्या होतात व पूर्वीपेक्षा दुप्पट उत्साहाने भराभर एकामागून एक टोपी डोक्यावर चढवायला सुरवात करतात या उत्साही वातावरणात आपल्या वयातील दहा वर्षे तरी कमी झाल्यासारखी वाटतील आपल्याला

इंग्लिश लोक त्यांच्या अबोल, थंड स्वभावाबद्दल प्रसिद्धच आहेत बसमध्ये किंवा आगगाडीत आपण शेजारी बसलो तरी ढुंकून बघणार नाहीत. जणू काही शेजारी कोणी दगडधोंडा असल्यासारखे ते आपल्याकडे दुर्लक्ष करतील काही वेळेला खूपच राग यायचा हा त्यांचा माणूसघाणा स्वभाव

बघून पण इंग्लिश वृद्धा मात्र अतिशय प्रेमळ म्हातारपणी मुले विचारत नाहीत म्हणून की काय कुणास ठाऊक, पण ह्या प्रेमाच्या खूप भुकेल्या वाटतात नुसती नजरभेट होताच ह्या पटकन् इतक्या गोड हसतील, की खडीसाखरेचा खडाच तोंडात विरघळल्यासारखे वाटेल ह्या त्याच्या मधुर हास्यानेच त्या आपले मन जिंकून घेतात एका क्षणात !



'कॉसमॉस' प्रवासी कंपनीच्या बसने युरोपमध्ये प्रवास करताना मॉली ही अशीच एक गोड वृद्धा आमची सहप्रवासी होती ती ऑस्ट्रेलियाहून सहा महिन्याच्या प्रवासासाठी निघाली होती प्रवासातील पहिल्याच दिवशी माझी मैत्रीण निर्मला हिला थंडी वाजते हे पाहून तिने आपल्या बॅगेतून एक मऊ लाल गरम गळपट्टा काढून तिला बक्षीस दिला व तिच्या गोऱ्या रंगाला तो लाल रंग किती शोभून दिसतो म्हणून आईच्या मायेने तिचे कौतुक केले ती कुमारिका होती, म्हणूनच जणू काही आपल्या अतृप्त राहिलेल्या मातृत्वाच्या भावनेचा वर्षाव ती प्रत्येकावर करीत होती तशी ती फारच आनंदी आणि विनोदी होती तिच्या तोंडाचा पट्टा कायम चालू असायचा आपल्या विनोदी, मजेशीर बोलण्याने ती सर्वांना सतत हसवीत होती मध्येच केव्हातरी गंभीर होऊन तिने मला आपल्या आयुष्याची

कर्मकहाणी, एकुलत्या एका प्रेमभगाची कथा डोळ्यात पाणी आणून सांगितली दुसऱ्याच क्षणी जणू काही दुसऱ्याच कुणाची तरी गोष्ट सांगावी इतक्या अलिप्तपणे आपली दु:खी कहाणी विसरून तिने हसण्या-खिदळण्यास सुरुवात केली दररोज ती तऱ्हेतऱ्हेचे सुंदर पोशाख करीत असे प्रत्येक ठिकाणी उतरून आपल्या भाचीला नाहीतर लांबच्या काकीला लहानसहान वस्तू खरेदी करून देत असे तिच्या शेजारी बसलेला एक स्पॅनिश तरुण अेकसारखा रोमिओ



थाटात बसमधील मुलींवर 'लाइनी' मारायचा खटाटोप करीत होता आणि आईने आपल्या खोडकर मुलाला दटवावे तितक्या हक्काने मॉली त्याला दम भरीत असे तिच्यापुढे तो रोमिओ अगदी गुपचूप नांगी टाकून बसे आमचा बसचा प्रवास संपत आला तशी मॉलीला अगदी चेव आला होता मध्येच टाळ्या वाजवून गाणी म्हणायची, मध्येच लहान मुला-सारखी खोडकरपणे कोणाची तरी वस्तू लपवायची रस्त्यातून येणाऱ्या जाणाऱ्या म्हाताऱ्यांना 'फ्लाइंग किसेस' पाठवायची एकदा तर कुरणावर चरत असलेली दोन हरणे पाहून तिने अक्षरश: उड्या मारायला सुरुवात

केली बसमध्ये तिन एक निराळेच चैतन्यपूर्ण वातावरण निर्माण केले आणि आमचा मधूनमधून कटाळवाणा होणारा प्रवास सुसह्य केला आमचा प्रवास सपल्यानतर मॉली जितक्या जिव्हाळ्याने सर्वांशी एकरूप झाली होती तितक्याच अलिप्तपणे सर्वांपासून दूर गेली स्वत च्या ऐकाकी जीवनाबद्दल खंत न करता दुसऱ्याच्या आयुष्यात आनदाचे दोन क्षण निर्माण करणाऱ्या मॉलीची ठेंगणीठुसकी मिस्किल मूर्ती मात्र माझ्या मनात कायमची ठसली 'मॉली, तू कुठही ऐस परमेश्वर तुला आणखी १०० वर्षं आयुष्य देवो तू हे सर्व आयुष्य अगदी अखरच्या क्षणापर्यंत हसत-खेळत, दुसऱ्याना हसवीतच घालवशील अशी माझी खात्री आहे

मी माझी जर्मन मैत्रीण इगे हिच्याबरोबर पश्चिम जर्मनीतील आऊसबुर्ग ह्या गावी तिच्या आईकडे राह्यला गेले ती जरा शकाकुल मन-स्थितीतच ! कारण जर्मन कुटुबात राह्यचा माझा हा पहिलाच प्रसग होता पण मुटीने–इंगेच्या आईने–मला मिठी मारून 'वेलकॉमन् मीना' असे जर्मन भाषेत इतक्या प्रेमळपणे स्वागत केले, की माझा परकेपणा एका क्षणात नाहीसा झाला आमच्या स्वागतासाठी तिने सुदर केक तयार केला होता व तो मला अगदी आग्रह करकरून खायला घातला मुटी जर्मन भाषेत बोलत होती व मी इग्लिशमध्ये ! पण भाषेची अडचण मुळी आलीच नाही मुटी तरुणपणी दिसायला सुरेखच असावी मूळचा तिचा ठेंगणाठुसका बांधा वयोमानाने स्थूल झाला होता तिचे निळसर डोळे मात्र एकाद्या तरुण मुलीप्रमाणे स्वच्छ पाणीदार होते सकाळी उठल्यापासून तिची कामाची धावपळ चालू असे तेवढ्यात वेळ काढून ती कुत्र्याला फिरवून आणी मध्येच नट्टापट्टा करून शॉपिंग करून येई मुटीला खाण्यापिण्याची फारच आवड मधुमेहाचा विकार असूनसुद्धा इगेच्या दटावणीला न जुमानता ती दुपारी चहाबरोबर गोड केक मोठ्या आवडीने खाई मुटीचे यजमान फाटी दररोज न चुकता तिला भाडी विसळायला मदत करीत त्याचे ते दोघांचे वृद्धावस्थेतील सहजीवन बघून मला फारच आनद वाटला मुटी रोज न चुकता माझ्या यजमानाची व मुलाबाळाची चौकशी करी त्यांचे पत्र आले की नाही म्हणून आस्थेने विचारी मी

जरी एक क्षणभर गप्प राहिले तरी 'मुलाची आठवण येते का तुला?' म्हणून प्रेमळपणे मला कुरवाळी पायाला भिंगरी बांधल्यासारखा माझा सतत प्रवास चालला होता म्हणून माझ्या मुलाने — हर्षूने — एका पत्रावर आऊसबुर्ग, जर्मनी, पृथ्वी असा पत्ता लिहिला होता ते वाचून मुटीला फारच गमत वाटली 'तुझ्या मुलाना वाटते, की तू एकादे वेळी चद्रावर-सुद्धा गेली असशील!' असे म्हणून मुटी अगदी खळखळून पोटभर हसली

मुटीचा आपल्या दोन छोटचा नाती—गीता व पिपी— ह्याच्यावर फार जीव त्या दोघीना आळीपाळीने ती आपल्या कुशीत घेऊन झोपे आठ-दहा दिवसात तिने त्या दोघीना इतके लाडावून ठेवले, की बासलला घरी गेल्यावर त्या एकटचा झोपायलाच तयार होईनात! इंगेला नुसते त्यानी अगदी भडावून सोडले छोटचा गीताला तर तिच्या 'ओमाचा' (आजीचा) इतका लळा लागला होता, की घरी कुणाचाही फोन आला तरी तिला वाटे आपल्या 'ओमा'चाच फोन आला धावत जाऊन ती प्रथम फोन उचली आणि ओमा, ओमा' म्हणून आपल्या बोबडचा भाषेत बोलायचा प्रयत्न करी

आठ-दहा दिवसाच्या सहवासात मुटीचे व माझे अितके जवळचे नाते निर्माण झाले, की ती अगदी मला आईच्या ठिकाणीच भासली तिचा निरोप घेऊन निघाले तेव्हा मुटीने मला प्रेमाने जवळ घेतले तिच्या डोळ्या-तून खळखळा अश्रूच्या धारा वाहात होत्या जणू काही तिचीच मुलगी दूरदेशी जात होती मलाही माझे अश्रू आवरेनात मुटीची आणि माझी पुन्हा भेट केव्हा होईल कोण जाणे! कदाचित् पुन्हा होणारही नाही पण तिच्या प्रेमाच्या सुगधाने माझे मन अगदी तुडुब भरले आहे

□ □

# ४. अद्‌भुतरम्य ओबेर अमरगाव

फाटीची छोटीशी मोटारगाडी आऊसबुर्गच्या पूर्वेला भरधाव धावत होती आदल्या रात्री पावसाच्या रिमझिम सरी पडून गेल्यामुळे हवेत आल्हाददायक गारवा पसरला होता आकाश अगदी स्वच्छ निळेभोर दिसत होते मधूनच तुरळक पांढरेशुभ्र ढग विहरत होते जिथे नजर पोहोचेल तिथपर्यंत पाचूसारखी हिरवीगार कुरणे पसरली होती आणि त्याचा हिरवा रग सोन्यासारख्या पिवळ्याधमक सूर्यप्रकाशात अधिकच खुलून दिसत होता त्या हिरव्या गालिच्यावर नखाएवढ्या चिमुकल्या पिवळ्या रगाच्या फुलानी नक्षीकाम केले होते या दिवसात इतकी स्वच्छ सुदर हवा म्हणजे मोठे भाग्यच होते माझ्या सुदैवाने मी जिथेजिथे जाई तिथेतिथे हवा स्वच्छ आणि सुदर असायची

इगे हसून म्हणालीसुद्धा की— तू काय देवदूत बिवदूत आहेस की काय ' जिथे जातेस तिथे इतके सुदर ऊन घेऊन जातेस ?" ह्या लोकाना स्वच्छ ऊन पडले की मोठी पर्वणीच वाटते !

हिरव्या कुरणामधून नागमोडी वळणे घेतघेत गाडी चालली होती आणि आजूबाजूचे सृष्टिसौंदर्य मी अगदी डोळे भरून बघत होते निसर्गाच्या इतक्या निकट सहवासाने मन कसे उल्हसित झाले होते आतापर्यंत पश्चिम जर्मनीतील ' ऑटोबान ह्या राजशाही हमरस्त्यावरून प्रवास करून जीव अगदी वैतागून गेला होता मैलोन मैल नाकासमोर सरळ जाणारे

ऑटोबान्स सुरुवातीला मला खूपच आवडले होते मोटारीच्या दुहेरी तिहेरी रांगा दुतर्फा जाऊ शकतील इतके प्रशस्त रस्ते-- मध्ये कुठेही अडथळा न आल्यामुळे बंदुकीतून सटासट सुटलेल्या गोळ्यांसारख्या शंभर मैलांच्यावर वेगाने सुसाट पळणाऱ्या त्या मोटारी-- छे छे ! त्या प्रवासाचा अनुभव मोठा रोमांचकारक असतो यात शंका नाही पुढे येणाऱ्या गावाच्या पाट्या शंभर मैल अगोदरच एकसारख्या ओळीने लावलेल्या असतात, त्यामुळे ह्या रस्त्यावर कधी चुकणेच शक्य नाही जिथे दुरुस्तीचे काम चालू असते तिथे गाड्या आपला वेग कमी करतात की नाही, यावर रस्त्याच्या कडेला लावलेले टेलिव्हिजन कॅमेरे जागरूकपणे सतत देखरेख करीत असतात ! गाडी थांबवण्यासाठी रस्त्याच्या बाजूला वळणे घेऊन पार्किंगच्या खास जागा केलेल्या असतात ती ठिकाणेसुद्धा इतकी निसर्गरम्य असतात, की लहानसहान गोष्टीतूनसुद्धा येथील लोकांची सौंदर्यदृष्टी दिसून येते तेवढ्यात तिथे एखादे हॉटेल असेल, प्रसाधनगृह असेल, पेट्रोल पंप आणि टेलिफोनसुद्धा असेल गाडी नादुरुस्त झाल्यास मदतकेंद्रातून मदत बोलविण्यासाठी असलेले खास टेलिफोन तर दर मैलागणिक बसविलेले आहेत अशा नाना प्रकारच्या सुखसोयींनी युक्त असलेले हे ऑटोबान्स प्रवास करायला अतिशय सुखाचे व बिनत्रासाचे वाटतात बायकासुद्धा एकट्या--दुकट्या सुरक्षितपणे मोटारीने लांबवर प्रवास करू शकतात सबंध युरोपभर पसरलेल्या ह्या हमरस्त्यामुळे दूर असलेल्या ठिकाणामधले अंतर मुळी भासतच नाही किंचितही थकवा न येता आरामात आठशे-नऊशे मैल प्रवास एका दिवसात करता येतो पण पुढेपुढे नावीन्य संपल्यावर ह्या रस्त्याचाही कंटाळा यायला लागला सर्व रस्ते शहराबाहेरून जात असल्यामुळे वाटेत तसे बघण्यासारखे फारसे काही दिसत नाही त्यामुळे नवीननवीन गोष्टी पाहायला उत्सुक असलेल्या माझ्यासारख्या प्रवाशांना कधी हा प्रवास संपतो असे होऊन जाते

सृष्टिसौंदर्याची नवीनवी रूपे दाखविणारा आणि छोट्या गावाच्या वैशिष्ट्याचे दर्शन घडविणारा हा आताचा प्रवास फारच चित्तवेधक वाटत होता फाटीची नवी कोरी गाडीही कशी मजेत जात होती पिवळ्या रंगाची फोक्सवॅगन जातीची ही गाडी इतकी छोटी होती, की फाटी, इंगे व मी आतमध्ये

बसल्यानंतर एक इंचही जागा शिल्लक राहिली नव्हती एखाद्या खळण्यातल्या



मोटारीसारखीच दिसत होती फाटी म्हणजे इगचे वडील– ज्यांना इंगेची मुलगी 'ओपा (म्हणजे आजोबा) म्हणते ओपा हे नाव त्यांना फारच शोभून दिसते ओपाना तीन गोष्टीचे अतिशय वेड आहे– बीअर, सिगरेट आणि ही मोटार। मध्यम उंचीचा प्रशस्त देह, गोरापान लालबुंद रंग, गुबगुबीत चेहरा, त्यातून जेमतेम दिस-णारे निळसर रंगाचे मिस्किल डोळे, अशी ही ओपाची मूर्ती अगदी एखाद्या जर्मन सेनानीसारखी रुबाबदार दिसते अंगावर खाकी युनिफॉर्म चढवला, खांद्यावर दहाबारा चकचकीत बिल्ले लटकावले आणि पायात गुडघ्यापर्यंत उंच असलेले खाडखाड वाजणारे बूट घातले की झाले काम। अखंड धूम्रपानामुळे खोकूनखोकून आवाजसुद्धा इतका घोगरा झालेला, की त्यात दरडावून सोडलेले हुकूमच खरे म्हणजे शोभतील पश्चिम जर्मनीतील बव्हेरिया या संस्थानातील एका गावात जन्म घेतलेल्या ओपांच्या अंगात अस्सल शुद्ध जर्मन रक्त खेळत आहे आणि त्याचा त्यांना अतिशय अभिमान आहे त्यांच्या हयातीत त्यांनी दोन्ही महायुद्धे पाहिलेली आहेत, अनेक हालअपेष्टा सहन केल्या आहेत खूप पाहिले आहे, खूप भोगले आहे, तसा अतिशय रंगेलपणे जीवनाचा उपभोगही घेतला आहे आणि त्याची ते अगदी मनमोकळेपणाने कबुली देतात एकदा ते तरुणपणी खिशात दमडा नसताना एका मैत्रिणीला हॉटेलात घेऊन गेले असताना त्या मैत्रिणीने भराभर निरनिराळ्या पदार्थांची ऑर्डर दिली व मग बिल चुकविण्यासाठी त्यांना तासभर संडासात कसे लपून बसावे लागले ही त्यांची आवडती गोष्ट ते अगदी रसभरीत वर्णन करून रंगवून सांगतात

ओपा तसे फारसे बोलत नाहीत– किंचित लाजाळूच। पण स्वभावाने अतिशय प्रेमळ नातींवर तर त्यांचा एवढा जीव, की ती खाण्यापिण्याचा

हट्ट करते म्हणून स्वत गरम कुरकुरीत टोस्ट तयार करतील व त्याला लोणी लावून त्याचे छोटेछोटे चौकोनी तुकडे कापून तिला मोठ्या प्रेमाणे गप्पागोष्टी सांगत भरवतील ! एकदा तर माझ्या बुटालाच त्यांनी पॉलिश करून दिले मला खूपच लाजल्यासारखे झाले व मी त्यांचे तीनतीनदा आभार मानले पण 'तुला माझ्यासारखे पॉलिश करायला जमले असते का ?' असे म्हणून त्यांनी मला निरुत्तर करून टाकले


ओपाचा स्वभाव अतिशय दिलदार त्याच्या आदरातिथ्याला तर सीमाच नाही मी त्याच्याकडे पाहुणी म्हणून आलेली माझ्या लहानसहान सुखसोयींकडे स्वत जातीने लक्ष घातले त्यांनी आरामशीरपणे बसून सिगरेट ओढीत टी व्ही वरचे कार्यक्रम बघताबघतासुद्धा त्यांचे सगळीकडे बारकाईने लक्ष असे

एकदा मी व इगे खरेदी करायला गेलो असताना खरेदीच्या नादात भान न राहून भलतीच खरेदी करून बसलो एक महागाचा उत्तम पँटसूट खरेदी करून घरी आलो मुंबईला आल्यावर त्याचा काही उपयोग होणार नाही हे माझ्या लक्षातच आले नाही तेव्हा इगे आणि तिच्या आईने– मुटीने– अगदी हौसेने तो मला घालायला लावला आणि ओपासमोर त्या मला घेऊन गेल्या सिगरेटच्या धुराची वर्तुळे सोडतासोडता ओपांनी एक क्षणभर मला निरखून पाहिले व ते मिस्किलपणे हसत म्हणाले, "Your Mann will throw you out of the house' (तुझा नवरा तुला घराबाहेर हाकलून देईल !) मी म्हटले, "मुळीच नाही ! हिंदुस्थानातील पुरुष पुष्कळच सुधारलेले आहेत मला नाही का माझ्या नवऱ्याने एकटीला प्रवास करायची परवानगी दिली ?' ओपा आपले मिस्किलपणे हसत, धुराची वर्तुळे सोडीत गप्प बसले

केव्हातरी लहर आली की ओपा गाडी काढून आऊसबर्गजवळील एका खेडेगावातील शेतावर जाऊन येत येताना निरनिराळ्या प्रकारचे ताजेताजे पाव, मांसाचे तुकडे, चार-पाच डझन अंडी आणून सबंध आठवड्याची बेगमी करीत एकदा ते असेच शंभर एक अंड्यांची टोपली मोटारच्या टपावर बांधून येत होते त्यांच्या त्या जुन्या गाडीला उघडझाप करणारे

छप्पर होते एकाएकी काय झाले कुणास ठाऊक, वरचे छप्पर आपोआप उघडले गेले आणि वरची टोपली आत पडली सर्व अंडी फुटून ओघाच्या अंगा-खांद्यावर चिकट चिकट ओघोळ वाहू लागले ! दुसऱ्या दिवशी जाऊन त्यांनी नवीन गाडी विकत घेऊन टाकली !

अशा गप्पागोष्टींच्या नादात किती वेळ गेला ते कळले नाही बघता-बघता दूरवर उंच पर्वताच्या अस्पष्ट धूसर कडा दिसू लागल्या अंतर कमीकमी होऊ लागले तसे त्यावरची हिरवीगार वनराजी स्पष्ट दिसू लागली त्याची बर्फाच्छादित शिखरे निळ्याभोर आकाशाच्या पार्श्वभूमीवर शोभून दिसत



होती पर्वताच्या पायथ्याशीच लाल छपराचा छोटासा पुंजका दिसत होता 'हे आलेच बघ ओबेर अमरगाव' इंगे उद्‌गारली 'गाव?' मी आश्चर्य-चकित झाले इकडेसुद्धा आपल्याइथल्या तळेगाव, वडगावसारखी नावे आहेत तर !

थोड्याच वेळात आमची गाडी ओबेर अमरगाव ह्या छोट्याशा गावात शिरली निसर्गाच्या अंगाखांद्यावर वाढलेले, जेमतेम शभर–दोनशे घरे असलेले गाव किती सुंदर टुमदार दिसत होते ! जणू एखाद्या चित्रकाराने काढलेले चित्रच ! नावालाच खेडेगाव म्हणायचे ! इथे शहरातल्यासारखे सुंदर डांबरी रस्तेसुद्धा होते कोपऱ्याकोपऱ्यावर तर चक्क लाल, हिरवे डोळे मिचकावत

सिग्नल्स पण उभे होते छोटयाछोटया उपाहारगृहाबाहेर रंगीबेरंगी खुर्च्या, टेबले मांडलेली होती आणि अमेरिकन प्रवासी सर्वसाक्षी परमेश्वराप्रमाणे इथेही हजर होतेच— खाद्यपेयाचा आस्वाद घेत, मजेत ऊन खात बसलेले !

इथेही रस्त्यावर वाटेल तेथे गाडी थांबवता येत नव्हती म्हणून पार्किंगची जागा शोधून काढून तिथे गाडीला विश्रांती दिली श्रमपरिहारार्थ ओपा जवळच्याच बिअर बारमध्ये गेले आणि आम्ही दोघीजणी गावात फेरफटका मारायला निघालो पहिल्याच घरापाशी माझे पाय जमिनीला खिळले मी त्या घराकडे अनिमिष नेत्रांनी बघत उभी राहिले सफेद चुना मारलेले, लाल कौलांचे छप्पर असलेले, साधेच पण टुमदार घर होते ते पण छपरापासून ते पायापर्यंत असंख्य रंगीबेरंगी चित्रांनी सुशोभित केलेले होते हिरव्या रंगाच्या खिडक्यांना लाकडी कुंड्या लटकावलेल्या होत्या आणि त्यातून लाल पिवळ्या फुलांचे गुच्छ डोकावत होते खिडकीच्या आतल्या बाजूना नायलॉनचे पांढरे शुभ्र जाळीदार पडदे झुलत होते बाहेरच्या बाजूला वेलबुट्टयांच्या मैहिरपी शोभत होत्या इतके रंगाढंगानी सजलेले कलापूर्ण घर मी आतापर्यंत पाहिलेच नव्हते आणखी किती वेळ मी बघत उभी राहिले असते कोण जाणे ! पण इंगेनेच माझा हात धरून पुढे ओढले पुढचे घर त्या घरापेक्षाही सरस आणि सुंदर प्रत्येक घरावर निराळीच कला-कुसर , एक एक घर म्हणजे चित्रकलेचा उत्कृष्ट नमुनाच होता ! एक दोन नर्सरी शाळाही होत्या एका शाळेवर लहान मुलांच्या आवडत्या ' रेड रायडिंग हूड या सुप्रसिद्ध कथेतील प्रसंगाची चित्रे रंगवलेली तर दुसरीवर हॅन्सेल व ग्रेटेल 'ही जर्मन बालकथा संपूर्ण चित्ररूपाने अवतरलेली ! ही कल्पना मला फारच आवडली अशा चित्रमय रंगीत वातावरणातील छोटीछोटी मुले कलावंत न निपजली तरच नवल ! सुप्रसिद्ध बालकथाकार हॅन्स अँडरसन ह्याच्या सुरस चमत्कृतिपूर्ण परीकथेतील एखाद्या अद्‌भुतरम्य जादुनगरीत आल्याचाच भास झाला मला

ओवेर अमरगावच्या छोटयाशा बाजारपेठेत आम्ही शिरलो आणि ओळीने लागून असलेल्या दुकानातील लाकडांच्या सुंदर कोरीव चित्रांनी माझे लक्ष वेधून घेतले इंगेन आधी सांगतलेच होते, की लाकडाच्या कोरीव

वस्तू बनविण्याचा इथल्या लोकाचा मुख्य धदा आहे म्हणून लाकडावर कलाकुसर करून बनविलेल्या लहानमोठ्या वस्तूनी खच्चून भरली होती ही दुकाने बहुतेक सर्व मूर्ती येशू ख्रिस्ताच्याच होत्या कुमारी माता मेरी हिच्या हातावर पहुडलेला हसरा बाल ख्रिस्त, क्रॉसवर सुळी गेलेला येशू ख्रिस्त, सुळी जाण्यापूर्वी येशूने आपल्या अनुयायाबरोबर केलेले शेवटचे भोजन (दि लास्ट सपर), या व अशाच प्रकारच्या लहानमोठ्या मूर्ती अत्यत कलापूर्ण व सुदर होत्या पण हे कलावत येशू ख्रिस्त आणि त्याच्याशी निगडित असलेल्या व्यक्ती व प्रसग ह्याच्याच फक्त मूर्ती का करतात हा प्रश्न मला पडला

फिरता फिरता आम्ही गावाबाहेरील एका भव्य अर्धवर्तुळाकार छप्पर असलेल्या इमारतीपाशी आलो ती इमारत म्हणजे एक नाट्यगृह आहे हे कळताच आश्चर्याचा धक्काच बसला मला! येवढ्याशा छोट्याशा गावात नाट्यगृह! तिथे नाटके तरी कसली होत असतील, आणि जेमतेम शभर दोनशे घरे असलेल्या ह्या गावातील अशी कितीशी माणसे ही नाटके बघायला येत असतील, या शकेने माझे कुतूहल आणखीनच वाढले अर्धवर्तुळाकार छप्पर असलेले हे नाट्यगृह हजारो लोक बसू शकतील येवढे प्रचड होते रगमचही तेवढाच भव्य! तिथे होणाऱ्या नाट्यप्रयोगाची हकीकत कळली आणि अगावर रोमाच उभे राहिले

बव्हेरिया सस्थानची राजधानी म्युनिक हिच्यापासून ४५ मैल दूर असलेल्या अमर ( Ammer ) दरीच्या खोऱ्यात वसलेल्या ओबर-अमरगाव ( Ober Ammergau ) ह्या छोट्याशा गावात बरोबर तीनशेचाळीस वर्षांपूर्वी प्लेगची भयानक साथ पसरली होती मृत्यूच्या छायेने ते सुदर गाव काळवडून गेले होते मृत्यूच्या दारात उभ्या असलेल्या या गावाला वाचविण्यासाठी तेथील गावकऱ्यानी येशू ख्रिस्ताची मनोभावे प्रार्थना केली व प्लेगच्या तावडीतून सुटका झाली तर आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी लोकांच्या मनात येशू ख्रिस्ताची आठवण सतत तेवत ठेवण्याची प्रतिज्ञा केली प्लेगची साथ ओसरली ओबेर अमरगावची सुखरूप सुटका झाली गावकऱ्यानी दिलेला शब्द पाळला व त्यानी येशू ख्रिस्ताची आठवण

नाट्यरूपाने जागृत ठेवली इतकी वर्षे झाली तरी अजूनही ही प्रथा चालूच आहे लोकांच्या मनात धार्मिक भावना सतत जागरूक ठेवण्यासाठी, ख्रिस्त-जीवनातील प्रसंगाचे चित्रण करणारी नाटके इथे मोठ्या थाटामाटात सादर केली जातात या नाटकांना पॅशन प्लेज् ( Passion Plays ) असे म्हणतात पॅशन ' म्हणजे ख्रिस्ताला सहन कराव्या लागलेल्या यातना दर दहा वर्षांनी हे पॅशन प्लेज प्रचंड प्रमाणावर सादर केले जातात निसर्गाच्या पार्श्वभूमीवर उभारलेला, भव्य चर्चचा देखावा, नाटकात एका वेळी भाग घेणारे चारशे-पाचशे कलावंत, हा भव्य सोहळा बघायला सर्व जगाच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक येथे दर दहा वर्षांनी जमतात, तेव्हा ह्या गावाला प्रचंड यात्रेचेच स्वरूप येते

युरोपमध्ये कुठेही फारसे धर्माचे स्तोम माजविलेले दिसत नाही चर्चेसमधूनच धर्माचे थोडेफार जतन केले जात असेल तेवढेच जुन्या पिढीतील माणसे कितीही धार्मिक असली तरी दर रविवारी चर्चला जातीलच असे नाही कधी कुठल्या समारंभानिमित्त अथवा सणावारी जात असतील तेवढेच परदेशी प्रवाशांनी चर्चेस थोडीफार गजबजलेली असतात एरवी ही ओसाडच पडलेली हल्लीची तरुण पिढी तर धार्मिक बाबतीत अगदीच उदासीन आहे एखाद्या माहितीपत्रकावर धर्माबाबत काही माहिती द्यायची असल्यास सरळ कोणताही धर्म नाही ' असे लिहून मोकळी होतात !

ओबेर अमरगाव हे खऱ्याखुऱ्या अर्थाने तीर्थक्षेत्र आहे तीनशे वर्षे होऊन गेली तरी आपल्या पूर्वजांनी दिलेल्या वचनाची इमानेइतबारे पूर्ती करणे ही गोष्टच मुळी मोठी कौतुकास्पद आहे ही माणसे ख्रिस्ताच्या भक्तिरसात पूर्णपणे बुडून गेली आहेत ख्रिस्तप्रेमावरच ती अक्षरश जगतात ख्रिस्ताची आठवण सतत ध्यानीमनी ठेवतात त्यांच्या कृतीतूनही ख्रिस्तप्रीती एकसारखी व्यक्त होत असते कलावंतांनी हातात घेतलेल्या लाकडाच्या तुकड्यातून शिल्प प्रकट होते ते ख्रिस्ताची हजारो रूपे घेऊन ! ध्यानी, मनी, स्वप्नी ख्रिस्त, ख्रिस्त, ख्रिस्त ! त्यांच्या हृदयात ख्रिस्त पूर्णपणे व्यापून आहे ख्रिस्ताच्या प्रीतिरूपी अमृतरसात न्हाऊन निघालेले अमर दरीतील ओबेर

अमरगाव खरोखरच अमर आहे! स्वर्गीय सुखाचे, शांतीचे वरदानच मिळाले आहे ह्या छोट्या जगाला .

एका झाडाच्या पारावर बसून ओपा आमची वाटच बघत होते गाडी सुरू करताकरता ओपांनी विचारले, 'आवडले का हे गाव ?' मी नुसतेच 'हो' म्हटले त्या वेळी माझ्या मनातील भावना व्यक्त करायला शब्दच नव्हते माझ्यापाशी!

समोर दिसणाऱ्या 'कोफेल अझुगस्पिट्झ' ह्या पर्वताच्या दिशेने आमची गाडी भरधाव निघाली मागच्या खिडकीतून मी मागे वळूनवळून बघत होते आणि ते सुंदर दृश्य डोळ्यात साठवून ठेवण्याचा प्रयत्न करीत होते एवढ्यात गाडीने एक मोठे वळण घेतले आणि ते अद्भुतरम्य ओबेर अमरगाव दिसेनासे झाले!

□ □

# ५. एका सुंदर स्वप्नाची शोकांतिका

" . जग हे सुंदर,
नभ हे सुदर
जे जे दिसते, ते ते सुदर

पपानी लिहिलेल्या काव्याच्या या ओळी सहजस्फूर्तपणे मनात उचंबळून आल्या त्यातील आशयाचा प्रत्यय क्षणाक्षणाला येत होता दोन्ही बाजूला एकाआड एक लपलेल्या उचच उच पर्वतराजी हिरव्यागार सूचिपर्ण वनराईने सपूर्णपणे आच्छादलेल्या होत्या

पर्वताच्या शिखरावर सायीसारख्या मृदुमुलायम धवल हिमकणाचा शिड-काव झालेला होता पर्वताच्या अगाखाद्यावरून रुपेरी कलावतूच्या हाराप्रमाणे ओघळणारे असख्य झरे मधूनच कुठेतरी लुप्त होत होते त्यांचा खळखळाट त्या निसर्ग-सौदर्याला योग्य अशी पार्श्वसगीताची साथ देत होता मानवी हाताचा स्पर्श न घडल्यामुळे इथला निसर्ग किती अकृत्रिम स्वरूपात प्रकट झाला होता अगदी ' सुदर ' या विशेषणाची सार्थकता पटवून देणारा !


पश्चिम जर्मनीतील म्युनिकपासून चाळीस मैल अतरावर असलेले ओबेर अमरगाव हे छोटेसे टुमदार गाव मागे टाकून श्वानगाव व ग्रासबॉग या दरीतून नागमोडी वळणे घेतघेत आमची मोटार चढावाला लागली होती. बघताबघता पर्वतावरील हिरव्यागार वनराईतून एका सगमरवरी पाढऱ्या-शुभ्र महालाचे दर्शन एकच क्षण इतके अचानकपणे घडले की, आश्चर्याचा धक्का बसून मन स्तिमित झाले !

पर्वताच्या उतारावर सदाहरित वनराईच्या छायेत बसलेला तो चिमुकला राजवाडा झाडावर फुललेल्या एकाच पांढऱ्या शुभ्र टपोऱ्या गुलाबाच्या फुलाप्रमाणे अत्यंत शोभिवंत दिसत होता हिरव्या वनराईने त्याला शोभा आली होती की त्याच्यामुळे वनराईचा हिरवागार रंग खुलून दिसत होता, हे ठरविणे कठीणच होते परमेश्वराने इथली निसर्गसृष्टी ज्या वेळी निर्माण केली त्याच क्षणी त्या निसर्गाबरोबर या महालाचीही निर्मिती केली असावी असे वाटण्याइतका तो अगदी सहज स्वाभाविकपणे भोवतालच्या निसर्गात बेमालूम मिसळून गेला होता स्वप्नसृष्टीचा आणि सत्यसृष्टीचा संगमच घडला होता इथे जणू !

लिंडर हॉफ– एका स्वप्नाळू राजपुत्राचे साकारलेले सुंदर स्वप्न त्या सुंदर स्वप्नाच्या मूर्त स्वरूपाला साजेशी पार्श्वभूमीची साथ देण्यासाठी तर इथल्या रम्य परिसराची निर्मिती झाली नव्हती ना ? आणि स्वप्नाने साकार व्हावे तेसुद्धा फक्त इथेच !

मनातील औत्सुक्य क्षणाक्षणाला वाढतच होते पर्वताच्या पायथ्याशी मोटारीचा तळ होता अनेक प्रवासी बसेस उभ्या होत्या त्यावरून तिथे आलेल्या परदेशी प्रवाशांच्या संख्येची कल्पना आली गाडी थांबवून ओपा नेहमीप्रमाणे बीअर घ्यायला जवळच्या पेयगृहात गेले मी व इंगे दोघीजणी हातात हात घालून लहान मुलाच्या अधीरतेने राजवाड्याच्या दिशेने धावत सुटलो आमचा उत्साह बघून आपल्या नवऱ्याच्या हातात हात अडकवून धापा टाकीत चढण चढणाऱ्या अमेरिकन म्हाताऱ्यासुद्धा आश्चर्यमिश्रित कौतुकाने बघू लागल्या एरवीसुद्धा जिथेजिथे मी व इंगे जात होतो तिथे-तिथे गळ्यात गळे घालून फिरणाऱ्या काळ्या व गोऱ्या मैत्रिणीकडे बघून आजूबाजूच्या लोकांचे कुतूहल जागे होई कदाचित माझ्या रंगामुळे म्हणा किंवा माझ्या साडीमुळे– कारण इंगेबरोबर फिरताना ती कटाक्षाने मला साडी नेसायला लावी– त्यांच्या मनात काय विचार येत असतील देव जाणे पण माझ्या मनात मात्र आम्ही दोघी म्हणजे पाश्चात्य आणि पौर्वात्य संस्कृती-संगमाचे चित्रच तर नाही ना, असे विचार आल्याखेरीज राहिले नाहीत

बरीच मोठी चढण चढून धापा टाकीत आम्ही राजवाड्याजवळ येऊन पोचलो त्याच्या अंगप्रत्यंगावरून ओसंडणाऱ्या कलेच्या आणि सौंदर्या-च्या निकटच्या दर्शनाने मन मोहून गेले राजवाड्याच्या पहिल्या मजल्याच्या दर्शनी भागावरील कमानीत उभे असलेले कोरीव पुतळे, हातात पृथ्वीगोल




घेऊन उभा असलेला ॲटलास देवतेचा कळसावरील पुतळा हा छोट्याशा वास्तूला एक प्रकारची भव्यता प्राप्त करून देत होता राजवाड्यासमोरच्या प्रांगणातील छोट्याशा जलाशयात मध्यभागी असलेल्या एका खडकावर सोन्याचा मुलामा दिलेल्या तीन-चार मूर्ती आरामात पहुडल्या होत्या उचंबळून उसळणाऱ्या कारंजाच्या जलधारांनी त्यांना सचैल स्नान घडत होते जलाशया-भोवती पायऱ्यापायऱ्यांनी चारी बाजूला सुंदर बगीच्याची आखणी केलेली होती पण तीसुद्धा इतकी कौशल्याने, की भोवतालच्या निसर्गाशी जरासुद्धा विसंगत दिसू नये बागेतील कोपऱ्याकोपऱ्यातून, पौराणिक कथातील देव-देवतांचे पुतळे उभे केले होते राजवाड्याभोवतालच्या तीस एकराच्या परिसरात वेलींच्या कमानींनी आच्छादलेल्या पाउलवाटा काढलेल्या होत्या

'लिंडर हॉफ' महालाचा विस्तार तसा फार मोठा नाही पॅरिसच्या व्हर्सायल्स राजवाड्यासारखी भव्यताही इथे नाही मोठमोठाले राजवाडे त्यांच्या भव्यतेमुळे अधिकच निर्मनुष्य, ओसाड वाटतात व त्यात एक प्रकारच्या उदास वातावरणाचा भास होतो पण लिंडर हॉफ हा छोटासा बंगलेवजा महाल मात्र अतिशय जिवंत व चैतन्यपूर्ण वाटतो

सोनेरी जाळीकाम असलेल्या मुख्य दरवाजातून आत गेले की समोरच फ्रान्सच्या १४ व्या लुईचा अश्वारूढ पुतळा आपले स्वागत करतो छतावर १४ व्या लुईच्या वैभवशाली राज्याचे प्रतीक असलेल्या तळपणाऱ्या सुवर्ण-सूर्याचे भव्य राजचिन्ह रेखाटलेले आहे १४ व्या लुईच्या सत्तेखालील फ्रान्स वैभवाच्या शिखरावर पोहोचत होता त्याच्याच वैभवाचा प्रभाव या महालावर पडल्याचे क्षणोक्षणी प्रत्ययास येते त्याच काळातील सजावट जिकडेतिकडे आढळते पहिल्या मजल्यावरच दहा मुख्य दालने आहेत निळे दालन, पिवळे दालन, लाल दालन, गुलाबी दालन अशा निरनिराळ्या रंगांच्या दालनाची सजावटही त्या त्या रंगाला साजेशीच आहे प्रत्येक दालनाच्या कमानदार खिडक्यातून बाहेरील निसर्गाचे निरनिराळे स्वरूप दृष्टीस पडते मध्यभागी असलेले शयनमंदिर हे महालातील सर्वांत मोठे दालन सोन्याच्या नक्षीकामाने भरलेल्या निळ्याभोर मखमली गाद्यागिरद्यानी आणि महिरपीने सुशोभित केलेला पलंग एका जाळीदार कठड्याच्या पलीकडे ठेवलेला आहे फ्रेंच राजे आपल्या शयनमंदिरातसुद्धा लोकांच्या भेटीगाठी घेत असत त्यामुळे शयन-मंदिरात कठड्याच्या पलीकडे पलंग ठेवण्याच्या पद्धतीचेच इथे अनुकरण केलेले आहे छतावर पुराणातील एका कथेचे भव्य चित्र रंगवलेले आहे भिंतीवर जिकडे तिकडे फ्रेंच दरबारातील दृश्याची रंगवलेली मोठमोठी चित्रे टांगलेली आहेत सगळीकडे सोन्याचा मुलामा दिलेल्या वेलबुट्टया तिथल्या वैभवाची, कल्पकतेची आणि सौंदर्यदृष्टीची साक्ष देतात सर्व दालने वरपासून खालपर्यंत सुंदरसुंदर दुर्मिळ वस्तूंनी भरलेली आहेत

या रमणीय वास्तूचा मालक होता एक देखणा, स्वप्नाळू राजपुत्र । 'लुडविग दि सेकंड' त्याचे नाव जर्मनीमधील बव्हेरिया या संस्थानाच्या

'मॅक्सीमिलियन दि सेकंड' ह्या राजाचा तो पुत्र लुडविगचे बालपण अत्यंत एकलकोंडे व एकाकी अवस्थेत गेले त्यामुळे तो अंतर्मुख बनला अरेबियन नाइटस, अद्भुतरम्य पौर्वात्य कथा, जर्मन परीकथा आणि दंतकथा ह्याच त्याच्या बाळपणीच्या सख्यासोबतिणी बनल्या त्या वाचतावाचता त्याने



स्वतःभोवती एक काल्पनिक स्वप्नसृष्टी निर्माण केली त्यात गत्रदिवस रममाण होऊन त्याने आपल्या एकाकी आयुष्यात एक अपूर्व सौख्य शोधले १८६४ साली त्याचे वडील निवर्तल्यानंतर १८ व्या वर्षी लुडविगला राज्यपद प्राप्त झाले परंतु आतापर्यंत राजकारणापासून अलिप्त असलेल्या लुड-विगला राजदरबारातील कपट-कारस्थानांचा तिरस्कार वाटू लागला त्याच्या स्वप्नाळू, काव्यमय वृत्तीला राजकारण मानवेना. त्याचा त्याला जाच वाटू लागला त्यातून बाहेर पडण्यासाठी त्याच्या मनाची माशासारखी तडफड

होऊ लागली सुखाचा शोध करणाऱ्या त्याच्या कोमल, हळव्या मनाने निर्माण केलेली स्वप्नसृष्टी मूर्त स्वरूपात अवतरली ती 'लिंडर हॉफ'च्या रूपाने।

लिंडर हॉफ हे त्याच्या वडिलांचे शिकारीला जाताना थांबण्याचे विश्रांतीस्थान होते दुष्ट, स्वार्थी, राजकारणी जगापासून अगदी दूरदूर जाऊ पहाणाऱ्या लुडविगला हे ठिकाण इतके आवडले, की ते त्याच्या आयुष्याचे कायमचे सुखनिधान ठरले त्या छोट्याशा विश्रांतिस्थानाला त्याने महालाचे स्वरूप दिले तिथे कोणत्याही बाहेरच्या लोकांना स्थान नव्हते स्वतःच्या मनातील भावनांचा, कल्पनांचा आणि स्वप्नांचा आविष्कार प्रकट करण्याचे ते एकमेव ठिकाण होते इथे फक्त सौंदर्याला जागा होती क्रौर्याला, कपटाला व कुरूपतेला बिलकुल वाव नव्हता फ्रान्सच्या वैभवशाली बलाढ्य राजसत्तेने भारावून गेलेल्या लुडविगने त्याचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवला फ्रान्सची अखेरची सम्राज्ञी मेरी अँटवानेट हिचा ट्रायनॉन नावाचा खाजगी राजवाडा होता तो राजवाडा म्हणजे सौंदर्याचे आगरच होते मेरी अँटवानटने तिथे आपले स्वतःचे असे स्वप्नमय जग निर्माण केले होते ते निर्माण करण्यासाठी फ्रान्सची सारी संपत्ती तिथे ओतली होती तो वाडा शेवटी तिच्या विनाशाला कारण ठरला त्या ट्रायनॉनच्या वाड्याच्या धर्तीवरच लुडविगने लिंडर हॉफची रचना केली होती

जगात जीजी सुंदर वस्तू आढळेल तीती त्याने आपल्या संग्रही आणावी. महालापासून थोड्या अंतरावर असलेल्या बागेतील 'मूरीश किऑस्क' हे 'चहाचे घर' तर दृष्ट लागण्याइतके देखणे आहे धातूपासून बनविलेले हे मुसलमानी पद्धतीचे घर त्याने बोहेमियामधून विकत आणले अष्टकोनी आकाराच्या ह्या घराच्या खिडक्यांना रंगीबेरंगी काचा बसविल्यामुळे त्यातून आत येणारी प्रकाशकिरणे एक प्रकारचे अद्‌भुतरम्य वातावरण निर्माण करतात थोडे उंचावर असलेले मयूरसिंहासन लुडविगने पॅरिसच्या प्रदर्शनातून विकत घेतले ह्या सिंहासनाला तीन मोर बसविले आहेत मोरांनी पसरलेल्या पिसाऱ्यात अत्यंत मौल्यवान हिरे, माणके, पाचू बसविलेले आहेत चहाच्या टेबलावरचा पृष्ठभाग 'मदर ऑफ पर्ल' ह्या मौल्यवान वस्तूचा

आहे   उन्हाळ्यात हे धातूचे घर थंड रहावे म्हणून खोलीच्या मध्यभागी एका संगमरवरी कारंजाची योजना केलेली आहे  जिकडेतिकडे पर्शियन गालीचे-रुजामे अंथरलेले आहेत  खिडक्यावर सुवर्णकाम केलेले भारी पडदे रुळत आहेत  'अरेबियन नाइट्स्' मधील अद्‌भुतरम्य कथेतील एखाद्या पाशाप्रमाणे हुक्का ओढीत मयूरासनावर आरामात पहुडलेला लुडविग आपल्या स्वप्नसृष्टीत तासचे तास रमून जाई

काव्यमय वृत्तीच्या लुडविगला काव्ये, नाटके, संगीतिका ह्यांची आवड नसती तरच नवल होते  त्याच्या या आवडीमळे त्याची प्रख्यात जर्मन संगीतिकाकार रिचर्ड वॅग्नर ह्याच्याशी गाढ मैत्री झाली  किंबहुना लुड-विगच्या प्रोत्साहनामुळेच रिचर्ड वॅग्नरने अनेक संगीतिकांची रचना केली व तो प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचला ।

रिचर्ड वॅग्नरच्या संगीतिका फक्त स्वत लाच पहाता याव्यात म्हणून लुडविगने लिंडर हॉफ येथे एक ऑपेरा थिएटर बांधण्याची योजना तयार केली होती  त्याची आखणी त्याने स्वत च केली होती  पण ती प्रत्यक्षात मात्र कधीच उतरू शकली नाही

रिचर्ड वॅग्नरच्या 'टानहाऊसर' या गाजलेल्या संगीतिकेचे स्मारक त्याने लिंडर हॉफ येथे उभारले  इटालीजवळ कॅप्री नावाची बेटे आहेत तिथे ग्रोटो ( Grotto ) म्हणजे नैसर्गिक गुहा आहेत  त्यामधील पाण्यामध्ये सूर्याची किरणे परावर्तित होऊन एक निळसर धूसर स्वर्गीय वातावरण निर्माण होते असे म्हणतात  ते ठिकाण बघायला लांबून लांबून हजारो प्रवासी येतात , त्या गुहांची कृत्रिम प्रतिकृतीच लुडविगने लिंडर हॉफ येथे तयार केली आहे  सिमेंट, चुना व दगड याचे मिश्रण ओतून तयार केलेल्या गुहा इतक्या नैसर्गिक वाटतात, की त्या मुद्दाम तयार केल्या आहेत असे सांगूनसुद्धा खरे वाटणार नाही  आतमध्ये पाण्याचे झरे खेळविले आहेत  छोटेछोटे धबधबेही आहेत व मुख्य गुहेत एक चिमुकले सरोवरही आहे  गुहाना अशा रीतीने छिद्रे ठेवली आहेत, की त्यातून प्रकाशकिरणे आत शिरून एक गूढरम्य वातावरण तयार होते व त्याद्वारे संगीतिकेला पोषक अशीच पार्श्वभूमी तयार केली आहे

टानहाउसर या संगीतिकेची कथा मोठी लोकविलक्षण आहे हा १४ व्या शतकातील टानहाउसर राजकवी व्हीनस ह्या सौंदर्यदेवतेच्या प्रेमात पडतो व व्हीनस पर्वतावर तिच्या सहवासात एक वर्षभर सुखाने काल-क्रमणा करतो पुन्हा परत आल्यानंतर पश्चात्तापदग्ध होऊन तो धर्मगुरूकडे क्षमायाचना करतो परंतु धर्मगुरु त्याला नकार देतो तीन दिवसानंतर धर्मगुरूच्या धर्मदंडाला आपोआप कोवळी पालवी फुटते परमेश्वरानेच टानहाउसरला क्षमा केली असे समजून धर्मगुरू तो पापमुक्त झाल्याचे त्याला कळवितो परंतु तत्पूर्वीच टानहाउसर व्हीनसकडे परत गेलेला असतो या कथेतील व्हीनसचे निवासस्थान असलेल्या पर्वताचे दृश्य या गुहेत रेखाटलेले आहे व त्यामुळे तेथील नाट्यमय वातावरणात अधिकच भर पडते छोट्याशा सरोवरात शिंपल्याच्या आकाराच्या नावेच्या सुवर्ण सिंहासनात बसून लुड-विग आपल्या काव्यमय सृष्टीत पूर्णपणे बुडून गेलेला असे या सौंदर्याच्या उपासकाने अशा अनेक रम्य कलाकृती निर्माण करण्याचा संकल्प सोडला होता त्याचे सारे आयुष्यच जणू सौंदर्यदेवतेच्या उपासनेसाठी वाहिलेले होते अनेक सौंदर्यवतींनी या देखण्या राजपुत्राच्या प्राप्तीसाठी हरतऱ्हेचे प्रयत्न केले असतील पण त्या प्रेमाला त्याच्या आयुष्यात स्थान नव्हते कदाचित त्याला त्याबाबतीत कटु अनुभव आला असावा त्याच्या कल्पकतेची भरारी किती उत्तुंग होती ह्याची कल्पना ग्रोटो पाहिल्यानंतर येते

लुडविगच्या स्वप्नाळू वृत्तीनेच अखेर त्याचा घात केला प्रजेचे पालन करण्यास तो असमर्थ ठरला सर्वांनी त्याला वेडा ठरविले राजा म्हणून नालायक ठरविले व अखेर त्याला बर्ग येथे कैद करून ठेवण्यात आले परंतु काही दिवसातच दि १३ जून १८८६ रोजी त्याच्या सुंदर जीवनाची अखेर झाली तो व त्याचा खाजगी डॉक्टर गुडेन ह्या दोघाना स्टार्नबर्ग ह्या तळ्यात बुडून मृत्यू आला त्याच्या मृत्यूबद्दल अजूनही अनेक शंका व्यक्त केल्या जातात कुणी म्हणतात, की दरबारातल्या काही व्यक्तींनी लुडविगच्या खुनाचा कट रचला व ती कामगिरी त्याचे खाजगी डॉक्टर गुडेन ह्याच्यावर सोपविण्यात आली एका काळ्या अंधाऱ्या रात्री दोघानाही स्टार्नबर्ग तळ्यावर जलविहारासाठी पाठविण्यात आले डॉक्टरने काहीतरी

निमित्त काढून लुडविगला गुंगीचे औषध दिले आणि त्या अवस्थेत त्याला पाण्यात ढकलून दिले डॉक्टर गुडेनने हे काम केवळ नाइलाजाने पत्करले होते कारण त्याची लुडविगवर अतिशय भक्ती होती त्यामुळे लुडविगचा देह पाण्यात लोटून देऊन त्यानेही आपल्या स्वामीबरोबर पाण्यात उडी मारून जलसमाधी घेतली !

कुणास ठाऊक, लुडविगच्या मृत्यूची ही कहाणी खरी आहे किंवा नाही अखेर सत्य हे नेहमी अंधारातच रहाते लुडविगसारख्या स्वप्नाळू, काव्य-मय वृत्तीच्या जीवनाची अखेर मात्र अत्यंत भीषण रीतीने झाली लुडविगच्या सतत तळमळणाऱ्या अस्वस्थ आत्म्याला शांती मिळाली असेल काय ? की अजूनही त्याचा आत्मा ' लिंडर हॉफ ' भोवती घोटाळत असेल ? ' लिंडर हॉफ ' त्याच्या काळजाचा तुकडाच होता ! त्याच्यावर त्याने जीवापलीकडे प्रेम केले आणि ' लिंडर हॉफ 'नेही त्याच्या एकाकी प्रेमशून्य जीवनात सौख्याचा, शांतीचा ओलावा निर्माण केला एखाद्या प्रेमळ पित्याने आपल्या एकुलत्या एका पुत्राचे डोळ्यात तेल घालून अत्यंत काळजीपूर्वक पालनपोषण करावे, त्याला उत्तम शिक्षण द्यावे, आणि नुकताच कुठे तो कलागुणसंपन्न होऊन वयात येतो तोच पित्याला आपल्या लाडक्या पुत्राला कायमचे सोडून जाण्याची पाळी यावी, त्याचप्रमाणे ' लिंडर हॉफ ' या जिवाच्या कलिजाला सोडून जाताना लुडविगच्या कोमल मनाला अनंत यातना झाल्या असतील त्याचीच आठवण काढत त्याने अखेरचा श्वास घेतला असेल !

लिंडर हॉफ—लिंडर हॉफ मात्र अजूनही उभा आहे लुडविगच्या दुर्दैवी जीवनाची कहाणी सांगत, त्याच्या सुंदर स्वप्नाच्या आठवणी काढत-- अगदी एकटाच उभा आहे ! उंच पर्वतावर, निळ्या आभाळाच्या छायेत-- गर्द हिरव्या निर्जन वनात-- व्यवहारी, रुक्ष यंत्रयुगापासून अगदी दूर—दूर

□ □

# ६. ल्युबेकची क्लॉडिया

गळ्यापाशी उघडा असलेला पांढरा शुभ्र ब्लाऊज व खाली काळा स्कर्ट घातलेली, कुरळ्या केसांची, भरदार बांध्याची क्लॉडिया एखाद्या



जर्मन सोल्जरच्या थाटात ताठ मानेने छाती पुढे काढून बुटांचा खाड् खाड् आवाज करीत जवळ येत होती

लावून तिचा गोबरा चेहरा किंचित रागीट वाटत होता सोनेरी फ्रेमचा चष्मा लावल्यामुळे त्या रागीटपणात अधिकच भर पडली होती आम्ही मोटारमध्ये बसून तिची वाट बघत होतो ती जसजशी जवळ येऊ लागली तसतसे माझ्या छातीत उगीचच धडधडायला लागले कोणत्याही नवीन माणसाची ओळख होताना ती व्यक्ती कशी असेल अशी शंका नेहमीच माझ्या मनात येते आणि ही तर पडली अगदीच परकी युरोपीय लोकांच्या-बद्दल आपल्या मनात अकारण गैरसमज रुजलेले असतात तसे पाहिले तर गुणदोषामध्ये ती आपल्यासारखीच रक्तामासाची माणसे असतात पण विशेष सहवास न घडल्यामुळे म्हणा किंवा त्यांच्या गोऱ्या कातडीमुळे आपल्यात रुजलेल्या न्यूनगंडामुळे म्हणा या लोकांबद्दल आपल्या मनात वेगळ्याच कल्पना असतात परदेशात जाऊन आलेली मंडळी त्यांच्या बऱ्यावाईट अनुभवावरून आपापल्या परीने आधीच असलेल्या गैरसमजात आणखीनच भर टाकतात

क्लॉडियाबद्दल माझ्या मनात भीती बसली होती ती तिच्या वहिणीने केलेल्या तिच्या वर्णनामुळे आऊसबुर्गहून निघताना इंगेने आपल्या धाकट्या वहिणीबद्दल थोडीफार माहिती दिली होती आई-वडिलांची क्लॉडिया सर्वात धाकटी मुलगी असल्यामुळे त्यांनी तिला फारच लाडावून ठेवली आहे व त्यामुळे ती अतिशय हट्टी बनली असून तिचे कधी कुणाशी फारसे पटत नाही, वगैरे सांगून क्लॉडियाच्या स्वभावाच्या विविध पैलूंचे इंगेने आपल्या अत्यंत सौम्य व शांत आवाजात वर्णन केले होते क्लॉडियाशी वागताना जरा जपूनच वाग, मात्र तसे घाबरण्याचे कारण नाही, असेच जणू इंगेला सुचवायचे होते

पण त्यामुळे माझ्या मनाने मात्र क्लॉडियाची धास्तीच घेतली क्लॉडिया म्हणजे रूपाचा गर्व असलेली एक अत्यंत घमेंडखोर, हट्टी मुलगी असे चित्र मी माझ्या कल्पनेने रंगविले कशाला तिला उगीच भेटायला जाऊन हात दाखवून अवलक्षण करायचे, म्हणून मी माझ्या परीने क्लॉडियाची भेट टाळण्याचा प्रयत्न केला पण इंगेच्या आईने आधीच क्लॉडियाला फोन करून आम्ही तिच्याकडे येणार असल्याचे व क्लॉडियानेही आमची

उतरण्याची व्यवस्था करण्याचे परस्पर ठरवून देखील टाकले शिवाय ल्युबक हे गाव हॅंबुर्गहून डेन्मार्कमधील कोपनहेगनला जाण्याच्या वाटेवरच असल्या-मुळे तिच्याकडे न जाण्याची आता कोणतीच सबब शिल्लक राहिली नव्हती

क्लॉडिया ल्युबेकच्या प्रसिद्ध मेडिकल कॉलेजात शेवटच्या वर्षाला शिकत होती. तिथे ती एका छोट्याशा फ्लॅटमध्ये एकटी रहात होती आऊसबुर्गच्या माझ्या १५ दिवसाच्या मुक्कामात येताजाता मुटी आपल्या नेकीचे कौतुक करीत होती व तिच्याकडे मी गेलेच पाहिजे, असा एकसारखा आग्रह करीत होती मनात म्हटले, प्रत्येक आईला— मग ती जर्मन असो, अथवा भारतीय— आपल्या मुलीचे कौतुक वाटणारच। त्यामुळे मुटी सागत होती ते मी एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देत होते माझी रहाण्याची व्यवस्थाही मुटीने क्लॉडियाच्या रिकाम्या खोलीतच केली होती त्या छोट्याशा खोलीतील एक सपूर्ण भिंत पुस्तकाच्या शेल्फनी भरून गेली होती सर्व पुस्तके अर्थात् जर्मन भाषेतील होती तरी त्यावरील नावांवरून ती जर्मन भाषेतील उत्कृष्ट पुस्तके असावीत हे कळून येत होते मेडिकलची विद्यार्थिनी असली तरी या मुलीला वाचनाची बरीच आवड असावी ही गोष्ट त्यातल्या त्यात दिलासा देणारी होती व त्यामुळे माझ्या मनात क्लॉडियाबद्दल कुतूहलही जागृत झाले होते

सकाळी दहा वाजता हॅंबुर्गहून निघून आम्ही ल्युबेकला पोहोचलो तेव्हा ११ वाजले होते ल्युबेक हे बाल्टिक समुद्रावरील एक छोटेसेच पण महत्त्वाचे बदर आहे जर्मनीतील जुन्या ऐतिहासिक गावांपैकी हे गाव दुसऱ्या महायुद्धाच्या वणव्यातून कसेबसे बचावले गेले ल्युबेक जवळ येऊ लागले तसे त्यातील ऐतिहासिक जुन्यापुराण्या किल्ल्यांचे व चर्चेसचे निमुळते मनोरे लांबूनच दिसू लागले हिरव्यागार झाडीतून एकमेकाला लागून असलेल्या जुन्या घराची लाल कौलारू छपरे डोकावत होती ल्युबेक गावाच्या वेशीवर एका प्रचड दगडी दरवाजाने आमचे स्वागत केले त्याच्या दोन्ही बाजूला जर्मन किल्ल्याना असतात तसे वैशिष्ट्यपूर्ण बुरूज होते या दरवाजापासून गावाच्या वस्तीला सुरुवात होत होती तेथून दिसणारा गावाचा देखावा १८ व्या शतकाचा



२०८ २०

भास अुत्पन्न करीत होता दीड-दोनशे वर्षांची जुनी पण सुस्थितीतील घरे, चर्च, म्युझियम आणि त्याबरोबर बाजारपेठेतील अत्यंत अद्ययावत् डिपार्ट-



मेंटल दुकाने, रस्त्यावरची एकसारखी ट्रॅम्सची व मोटारीची रहदारी, सुंदर-सुंदर कपडे परिधान केलेले युवक-युवतीचे तांडे, अशा नव्या-जुन्या गोष्टींची सरमिसळ अगदी बेमालूमपणे झाली होती एका बाजूला ४०० वर्षांपूर्वीचे जुनाट चर्च, तर समोरच शरिराच्या नको त्या भागाचे उघडे दर्शन घडविणाऱ्या स्त्री-पुरुषाच्या जाहिराती दिमाखाने झळकवणारी सेक्स-फिल्मसची चित्रपट-गृहे! सनातनी आणि पुरोगामी विचारांची ही विसंगती मोठी मजेशीरच होती

सकाळच्या वेळी क्लॉडिया बहुधा कॉलेजला गेली असावी म्हणून आम्ही जेवणाचा कार्यक्रम आटोपून मगच तिच्या घरी जाऊन तिला एकदम आश्चर्यचकित करायचे ठरविले होते आम्ही येणार असल्याचे जरी तिला माहीत होते तरी ठरलेल्या कार्यक्रमापेक्षा एक दिवस अगोदरच आम्ही ल्युबेकला येऊन पोहोचलो होतो

शहराच्या मध्यभागी असलेल्या 'राठ हाऊस'पाशी गाडी थाबवून आम्ही तेथे असलेल्या रेस्टॉरंटमध्ये जेवायला गलो युरोपमधील कोणत्याही

लहान-सहान गावात जा, तिथे गावाच्या मध्यभागी एक भव्य चौक असतो या चौकात कबुतराचे थवेच्या थवे घुमत असतात जर्मनीमध्ये या चौकाना ' राठ हाऊस ' असे म्हणतात आपल्याकडे ज्याप्रमाणे गावाची मुख्य चावडी असायची व तेथूनच सर्व गावाचा कारभार चालायचा तशीच ही राठ हाऊसेस आपल्या चावडीपेक्षा मात्र ही राठ हाउसेस फारच भव्य व देखणी असतात चौकाच्या एका बाजूला गावचे मुख्य चर्च, दुसऱ्या बाजूला म्युनिसिपालिटी-सारख्या निरनिराळ्या कचेऱ्या, पोस्ट ऑफिस, अितर बाजूना बाजारपेठ, आणि मधल्या भव्य दगडी फरसबदी चौकात फळाफुलांची छोटीछोटी दुकाने रगीबेरगी खुर्च्या, टेबल माडलेली कॉफी-गृहे– अशी ही राठ हाऊसेस् इतकी स्वच्छ आणि सुदर ठेवलेली असतात अगदी एखाद्या चित्रासारखीच दिसतात ती !

आम्ही टूरिस्ट इन्फर्मेशन ऑफिसमधून ल्युबेक शहराचा नकाशा घेतला व त्यावरून क्लॉडियाचे घर शोधून काढायचे ठरवले युरोपमधील प्रत्येक लहान-सहान गावाच्या स्टेशनवरील हे ऑफिस म्हणजे परदेशीय प्रवाशासाठी केलेली उत्कृष्ट सोय आहे त्या ऑफिसमध्ये एकदा गेल्यावर आपल्याला त्या त्या गावाची सपूर्ण माहिती नकाशासह मिळते त्या नकाशावर लहान सहान गल्ल्यासुद्धा दाखविलेल्या असतात त्या गावच्या आसपासची प्रक्षणीय स्थळे, तेथे जाणाऱ्या प्रवासी बसेसची वेळापत्रके, पैसे बदलून घेण्याची व्यवस्था, निरनिराळ्या दर्जाच्या हॉटेल्सची नावे व पत्ते वगैरे गोष्टीची माहिती इतकी सुलभपणे मिळते, की अेकटयादुकटया स्त्रीला प्रवास करणे अत्यत आरामदायक व बिनत्रासाचे वाटते अगदी मुबअीहून पुण्याला जाण्यापेक्षाही सोपे !

नकाशावरून ' २४, फलाइस हावर स्ट्रास ' हा क्लॉडियाचा पत्ता शोधून काढायला बिलकूल त्रास पडला नाही राठ हाउसजवळच तिचे घर होते पहिल्या मजल्यावरच्या तिच्या फ्लॅटची बेल दाबली आणि थोड्याच वेळात नाइटड्रेस परिधान केलेली क्लॉडियाची स्वारी डोळे चोळीतचोळीत दार अुघडायला आली. आम्हाला पाहून तिला क्षणभर उमजच पडेना हॉस्पिटलमध्ये नाइट ड्यूटी केल्यामुळे तिची आता मध्यरात्र चालू होती

आमच्या अचानक येण्यामुळे तिची झोपमोड झाली होती म्हणूनच की काय तिची मुद्रा किंचित् रागीट– चिडकी वाटली आम्हाला खालीच मोटारमध्ये थांबायला सांगून स्वारीने दार बंद केले । कुठून हिच्या घरी येण्याची दुर्बुद्धी आपल्याला झाली असे मला वाटायला लागले

बरोबर दहा मिनिटांनी क्लॉडिया धावतधावत खाली आली तिथे येताक्षणीच माझा हात हातात धरून आम्हांला बाहेरच थांबविल्याबद्दल तिने माझी प्रांजलपणे क्षमा मागितली माझ्या येण्याने तिला फारफार आनंद झाल्याचेही सांगितले तिच्या मोकळ्या बोलण्याने माझ्या मनावरचे एक मोठे ओझे उतरले ही मुलगी माझ्या कल्पनेने निर्माण केलेल्या क्लॉडिया-पेक्षा फारच वेगळी होती इतकी साधी, सरळ स्वभावाची वाटली ती मला जणू काही फार दिवसांची ओळख असल्यासारखी मोकळेपणाने ती बोलत होती आपण हिच्याबद्दल उगीचच गैरसमज करून घेतला म्हणून मला रुखरुख वाटू लागली ती थोडीशी मितभाषिणीच होती पण वागण्यात-बोलण्यात कुठेही घमेंड नव्हती की आढ्यता नव्हती

ल्युबेक गावाचा फेरफटका मारण्यासाठी तिने मोठ्या उत्साहाने आपली छोटीशी जुनाट फोक्सवॅगन गाडी काढली तिचे मोटार हाकणे इतके बेछूट बेफाम होते, की त्या मोटारची खरोखर कसोटीच होती भर रस्त्यातून अत्यंत वेगाने गाडी हाकताना ती कचाकच ब्रेक दाबीत होती वाटेत अडथळा आणणाऱ्या इतर गाड्यांच्या ड्रायव्हर्संना दातओठ खाऊन चक्क शिव्या हासडत होती अर्थात त्या जर्मन भाषेत असल्यामुळे मला त्यांचा अर्थ समजणे शक्य नव्हते रागाने मुठी आवळून त्यांना वाकुल्या दाखवीत होती पुढची मोटार लवकर पुढे सरकली नाही की मोठ्याने 'हा' म्हणून डोळे गरकन् फिरवून चाकावरून हात काढून हाताचे पंजे पसर-ण्याचा तिचा अभिनय तर मोठा मजेशीर होता मी आपली मागच्या सीटवर जीव मुठीत धरून बसले होते

ल्युबेक गावाबाहेरील अेका सरोवराच्या काठावर पूर्व जर्मनीची सीमा लागूनच आहे तिथे दोन्हीकडचे जर्मन अधिकारी टोप्याबिप्या काढून बंदुका जमिनीवर टाकून आरामशीर गप्पा छाटीत टिवल्या-बावल्या करीत

होते  आमची गाडी जवळून जाऊ लागली तशी क्लॉडियाकडे बघून त्यांनी काहीतरी आचरटपणे बोलायला सुरुवात केली  त्याबरोबर ती एकदम रागाने लालीलाल झाली आणि त्यांना दोनचार फर्मास शिव्या घालून तिने गाडी जोराने पुढे काढली

या सरोवरात क्लॉडियाचा एक मित्र, सर्वजण नको-नको म्हणत असता एका रात्री बोटिंग करायला गेला आणि बुडून मरण पावला  ही हकीकत सांगत असताना क्लॉडिया अचानक गंभीर झाली  हिचे त्याच्यावर प्रेम तर नसेल ना, अशी शंका माझ्या मनाला चाटून गेली

क्लॉडियाला ल्युबेकमधील प्रेक्षणीय स्थळांची खडान्‌खडा माहिती होती  प्रवासाची, फिरण्याची तिला खूपच आवड दिसली  गावातील एका उंच चर्चच्या मनोऱ्यावर आम्ही गेलो व तिथून ल्युबेक गावाचे व भोवतालच्या परिसराचे विहंगम दर्शन घडले  ल्युबेक गावाला दोन्ही बाजूंनी दोन नद्यांनी वेढले आहे, व मधूनमधून लहानलहान कालव्यांचेही जाळे पसरले आहे  त्यामुळे ल्युबेक गाव हे एक बेटच बनले असून त्याचा आकार अगदी हुबेहूब पिंपळाच्या पानासारखा दिसतो ! मधले कालवे त्या पानावरच्या शिरांसारखेच दिसतात  नदीच्या पाण्यावर तरंगणाऱ्या पिंपळपानावर आंगठा चोखीत पहुडलेल्या मोहक काळ्यासावळ्या बाळकृष्णासारखे वाटले ते ल्युबेकचे रमणीय स्वरूप !

अंधार पडू लागला तशी क्लॉडियाला घरी परतण्याची आठवण आली  घरापाशी गाडी थांबवून तिने आमच्या सामानाच्या बॅगा बाहेर काढल्या व त्या अगदी सहजपणे उचलून ती भराभर जिना चढून गेली  अंधारात चाचपडत आम्ही तिच्या मागे चढू लागलो  दाणकन्‌ लाथ मारून तिने घराचा दरवाजा उघडला  मी थक्क होऊन विचारले– "क्लॉडिया, तू कुलूप नाही लावत दाराला ?" 'लावते ना घर बंद करताना  पण उघडताना अशीच लाथ मारावी लागते ! माझी जादू आहे ती" क्लॉडिया मोठ्यामोठ्याने हसत म्हणाली  मी माझा कोट काढून दाराच्या मागे असलेल्या शेल्फाच्या खुंटीला टांगायला गेले तो काय, ती सबंध शेल्फच माझ्या अंगावर आली ! बड ॲबट आणि लुई कोस्टलो ह्यांच्या एका सिनेमात ते दोघेजण

एका भुताटकीच्या वाड्यातील जुनाट कपाट उघडायला जातात आणि त्यातून एक प्रेत त्यांच्या अंगावर पडते ! त्या वेळी ते जेवढे दचकले नसतील तेवढी मी दचकले ! मोठ्या शिताफीने क्लॉडियाने ती शेल्फ पकडली आणि दुसऱ्या खोलीचे दार अुघडून त्याच्या आधाराने ती उभी केली "ही अशी ट्रिक आहे !" ती हसत म्हणाली "तुझ्या घरात सगळीकडेच अशा ट्रिक्स आहेत की काय ? मला आधीच दाखवून ठेव" धडधडणाऱ्या छातीवर हात ठेवून मी म्हटले

क्लॉडियाचे घर म्हणजे 'टाकाऊतून टिकाऊ ह्याचा एक नमुनाच होता जुन्या खोक्याच्या पुस्तकांच्या शेल्फा केलेल्या, जाडजाड अुशा एकमेकीवर रचून त्याचा 'सोफा-कम-बेड' केलेला वगैरे वगैरे. एका भिंतीवर तर मोडकीतोडकी घड्याळेच टांगलेली होती ! पांढऱ्या शुभ्र रंगाचे प्लास्टिकचे अभ्यासाचे टेबल मात्र अगदी आधुनिक, पण विविधोपयोगी होते कारण त्यावर वैद्यकीय पुस्तके, उपकरणे, लिपस्टिक, कंगवे, औषधे, दागिने, कप-बशा अशा वस्तूंची सरमिसळ झालेली होती आणि भिंतीवर जिथे जागा मिळेल तिथे निरनिराळ्या मासिकातून येणाऱ्या आपल्या भारतीय दृष्टीला अश्लील वाटतील अशा रंगीबेरंगी जाहिराती चिकटवलेल्या होत्या ! अश्लील असल्या तरी त्यातसुद्धा कल्पकता होतीच अगदी स्पष्ट उदाहरणच द्यायचे झाले तर एक ब्रासियरची जाहिरात होती त्या ब्रासियर्स अत्यंत टिकाऊ असून स्तनांना खालून आधार देऊन त्यांना सुडौल आकार देतात अशी कल्पना दर्शविण्यासाठी एका पीळदार शरीराच्या दणकट पुरुषाने आपल्या दोन्ही हातांनी पृथ्वीगोलासारखे मोठे स्तन अगदी सहजपणे वर उचलून धरले आहेत असे ते चित्र होते ते बघताबघता मलाच लाजल्यासारखे झाले आपल्या लैंगिक भावनांचा कोंडमारा करून त्या मनातल्या मनात दाबून ठेवण्यापेक्षा त्यांना अशा रीतीने मोकळी वाट करून देण्याचा कदाचित् क्लॉडियाचा हा मार्ग असावा ! माझ्या प्रश्नार्थक मुद्रेकडे बघून माझ्या मनातील शंका क्लॉडियाला कळली असावी अग, माझी जागा इतकी जुनी आणि बेकार आहे, की भिंतीचे ढलपे पडून तिथे घाणेरडे डाग दिसतात, म्हणून ते झाकण्यासाठी मी अशी चित्रे लावते चांगली पेंटिंग्ज फार महाग

असतात ना, ती घेणे मला परवडत नाही आय ॲम ट्राजिंग टु मेक माय फ्लॅट वेरी इटरेस्टिंग ! '

क्लॉडियाची बाथरूम म्हणजे सर्वांत कळस होता ! बाथरूम कसली, एक छोटीशी अंधारकोठडीच होती ती– आंघोळीची सोय नव्हतीच फक्त कमोडच ! आतील भिंतीवर इतक्या चित्रविचित्र वस्तू टांगल्या होत्या, की कल्पना करता येणेच शक्य नाही जेवढ्या म्हणून काही टाकाऊ वस्तू असतील तेवढ्या वस्तूंचे ते एक संग्रहालयच होते जुने परत आलेले चेक्स, दुकानाची बिले, कुणाची तरी पत्रे, जुनी नाणी, केसांच्या मोडक्या क्लिपा, प्रोफेसरचे फोटो, मैत्रिणीने अव्हेरलेल्या केविलवाण्या प्रियकराची तसबीर अशा अनेक विसंगत गोष्टींचा तो प्रचंड संग्रह म्हणजे संशोधनाचा मोठा विषयच ठरला असता गळक्या, पडक्या भिंती झाकण्याचा हा खटाटोप होता हे तर खरेच, पण इतकी कल्पनापूर्ण ' सजावट असलेली अवर्णनीय बाथरूम मात्र आतापर्यंत मी पाहिली नाही ! क्लॉडिया, युवर टॉयलेट इज द मोस्ट इंटरेस्टिंग प्लेस ! मी क्लॉडियाला शाबासकी दिली

रात्री तिने जेवायला भारतीय पद्धतीची सुंदर मसालेदार कोबडी केली होती छोट्याशा टेबलावर सुंदर सजावट करून आपल्या ठेवणीतल्या चश्या मांडल्या, मध्ये मेणबत्ती पेटविली, रेकॉर्ड-प्लेअरवर रेड इंडियन लोक-संगीताची रेकॉर्ड लावली आणि आमची छोटीशी पार्टी सुरू झाली

बाजाच्या आकाराच्या लाकडी बासरीतून वाजविलेले ते रेड इंडियन संगीताचे सूर इतके विलक्षण मनाचा ठाव घेणारे होते कधी करुण, तर कधी हलके-फुलके संगीताचे सूर अगदी झपाटून टाकणारे होते मेणबत्तीच्या अंधुक प्रकाशात भिंतीवर वेड्यावाकड्या सावल्या नाचत होत्या क्लॉडियाच्या गोऱ्यापान नितळ चेहऱ्यावर लालसर प्रकाश पडला होता तिचे निळसर हिरवे डोळे हिऱ्यासारखे लखलखत होते, आणि क्लॉडिया एखाद्या जादुगारिणी-सारखी गूढ भासत होती तिच्या मोहक हालचाली मी कौतुकाने बघतच राहिले तिने तयार केलेल्या चवदार खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत, अन् रेड इंडियन संगीताचे झपाटून टाकणारे सूर ऐकत आम्ही कितीतरी वेळ बसलो होतो

रात्री १२ नंतर केव्हातरी डोळा लागला होता अचानक कसल्यातरी


आवाजाने दचकून मी जागी झाले वघते तो अथरुणावर पडलेली क्लॉडिया मोठमोठ्याने कण्हत होती तळमळत, हातपाय आपटीत होती मध्येच एकदम ताडकन् अुठून तिने उशाजवळील एका बाटलीतल्या गोळ्या पाण्या-बरोबर घटाघट गिळल्या! मी एकदम घाबरून विचारले, क्लॉडिया, बरे नाही वाटत का तुला? 'डोण्ट वरी, मीना' म्हणून क्लॉडियाने सुस्कारा सोडला झोप येत नाही म्हणून मी नेहमीच झोपेच्या गोळ्या घेते। एरवी इतकी हसरी, खेळकरपणे वागणारी ही अल्लड पोरगी एका क्षणात अशी गंभीर का होते? कसले दु ख तिच्या अंत करणात सलत असेल? विरोधी भावनांचा सतत झगडा चालू असल्यासारखी दिसणारी ही मुलगी म्हणजे एक मोठे कोडेच होते।

दुसऱ्या दिवशी सकाळी उठून आम्ही कोपनहेगनच्या दिशेने प्रवासाला सुरुवात केली मार्गदर्शनाचे काम अर्थात् क्लॉडियाच करीत होती कोपन-हेगनला जायचे म्हणजे ल्युबेकजवळील ट्रॉव्हेमुण्डे ह्या बंदरापासून डेन्मार्क-मधल्या गेडसेर ह्या बंदरापर्यंत समुद्रमार्गाने बोटीने प्रवास करावा लागतो हे अंतर तोडायला साधारण तीन-साडेतीन तास लागतात ह्या प्रवासाचे वैशिष्ट्य असे,की बंदरावरच्या धक्क्यावरील पुलावरून थेट बोटीच्या पोटातील तळघरात मोटारी नेता येतात। पलीकडे बोट थांबल्यावर आपापल्या मोटारी रांगेने बाहेर काढून पुन्हा पुढच्या प्रवासास सुरुवात करता येते एका वेळी १५०० प्रवासी, २००–२५० मोटारी व २५–३० बसेस राहू शकतील एवढ्या प्रचंड बोटीची वाहतूक एकसारखी चालू असते

त्या दिवशी आमची बोट प्रवाशांनी अगदी गच्च भरली होती सर्वच-जण मजेखातर प्रवासास निघालेले मग काय विचारता वरच्या डेकवरील उत्कृष्ट उपहारगृहात खाण्यापिण्याची नुसती रेलचेल चालली होती कोणी गाणी म्हणत होते, कोणी नाचत होते, सर्वत्र नुसता अल्लोप उडाला होता या सर्व प्रकारात आमची अवस्था पाण्याबाहेर काढलेल्या माशाप्रमाणे झाली होती त्याच्या आनंदोत्सवात आम्ही कुठेच भाग घेऊ शकत नव्हतो आपल्याकडे सर्वांना मिळून एकत्र म्हणता येतील अशी समूहगीतेही नाहीत की नृत्याचे प्रकारही नाहीत त्याबद्दल मला वाईट

वाटत होते क्लॉडिया मात्र त्या जल्लोषाकडे तटस्थपणे बघत होती जणू काही तिला असले प्रकार नापसत होते कोपनहेगनला पोहोचेतो संध्याकाळचे सहा वाजले होते कोपनहेगनच्या स्टेशनवर जाऊन आम्ही तिथल्या टूरिस्ट अिन्फर्मेशन ऑफिसमधून सर्व माहिती मिळविली व त्यातल्या त्यात स्वस्त अशा हॉटेलमध्ये आमच्या खोल्या ठरवून टाकल्या आमच्या हॉटेल-समोरील भव्य चौकात एक मोठे कारंजे होते त्याच्या आवाजाने सकाळी मला लौकरच जाग आली क्लॉडिया गाढ झोपली होती तिची गोरीपान नितळ कमनीय आकृती व्हीनसच्या संगमरवरी पुतळ्याप्रमाणे रेखीव दिसत होती मी खिडकीतून बाहेर डोकावून पाहिले बाहेर चकचकीत उन्हे पडली होती रस्त्यात मात्र एक चिटपाखरू नव्हते ! शंका येऊन मी सहज घड्याळात बघितले तर मध्यरात्रीचे ३॥ वाजले होते ! ह्या लख्ख उजेडात आणखी चार तास कशी झोप काढायची तेच कळेना

कोपनहेगन शहराला विशेष अशी काहीच ऐतिहासिक पार्श्वभूमी नसल्यामुळ तिथे बघण्यासारखे फारसे काही नाही तेच ते घुमणाऱ्या कबुतरानी व्यापलेले भव्य चौक, तीच मोठमोठाली डिपार्टमेंटल दुकाने, लांब-सडक केसाचे व मळकट जीन्स परिधान केलेले तरुण तरुणीचे तांडे सर्व युरोपभर कोणत्याही मोठ्या शहराचे जे रूप, तेच ह्याही शहराचे होते



कोपनहेगनची मर्मेड जगप्रसिद्ध आहे सातासमुद्रापलिकडे गेलेल्या आपल्या प्रियकराची डोळ्यात प्राण आणून वर्षानुवर्षे वाट बघणाऱ्या त्या मत्स्यकन्येचा दगडी पुतळा किती भव्य आणि अद्‌भुतरम्य असेल अशा कल्पनेने आम्ही तो बघायला गेलो आणि पदरी निराशा घेऊन परत आलो जेमतेम दोन-तीन फूट उंचीच्या त्या पुतळ्यात ना भव्यता होती, ना सौंदर्य ! लहान सहान गोष्टीचे

उगीचच स्तोम माजवून अवास्तव कौतुक करण्याची या पाश्चात्य लोकांना सवयच दिसते।

स्कँडिनेव्हिया त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण फर्निचरसाठी व काचसामानासाठी सुप्रसिद्ध आहे कोपनहेगनमधील अशी दुकाने इतकी महागडी आहेत, की तिकडे फिरकायचेही धैर्य होत नाही क्लॉडियाने माल हॉस्पिटलमध्य नाइट ड्यूटी करून काटकसरीने वाचविलेले सर्वच्या सर्व पैसे एका सामान्य दिसणाऱ्या कपबश्यांच्या सेटमध्ये ओतले मोठ्या खुशीत येऊन तिने जाहीर केले, "मी आता अगदी कफल्लक झाले आहे।"

रात्रीचे कोपनहेगन माल विलक्षण आहे अंधार पडला की शहरातील गल्लोन् गल्ल्या रंगीबेरंगी दिव्यांनी उजळून निघतात त्या गल्ल्यातून सेक्स फिल्म्स्, ब्ल्यू फिल्म्स् दाखविणारी लहानलहान दुकाने ओळीने लागून आहेत दुकानाबाहेर उभ्या असलेल्या एजटामध्ये 'माझा माल सस्ता की तुझा माल सस्ता' अशी अहमहमिकाच लागलेली असते रस्त्याने जाणाऱ्या प्रवाशाना विनवण्या करून करून आग्रहाने आत बोलविण्याचा त्याचा एक-सारखा प्रयत्न चालू असतो त्यांच्या आग्रहाला फारशी गिऱ्हाइके बळी पडत नाहीत एखादी मास्तरीण रागारागाने छोट्या पोराना दटावते त्याचप्रमाणे कपाळावर आठ्या घालून क्लॉडियाने आम्हाला बाजूला खेचले 'तुमचे इडियन लोकच इकडे जास्त करून येतात' म्हणून तिने नाक मुरडून नापसती व्यक्त केली

सध्याकाळी वेळ घालविण्यासाठी आम्ही 'कॅबेरे' या सात का आठ ॲकेडमी ॲवॉर्ड मिळालेल्या इग्लिश चित्रपटाला गेलो जाभया देतदेत आणि या चित्रपटाला ॲकॅडेमी ॲवॉर्ड देणाऱ्या महाभागाना शिव्या घालत-घालत कसाबसा चित्रपट बघितला शेवटी 'लाइफ इज् अ कॅब्रेरे' हा या चित्रपटाचा 'महान् सदेश' मनावर बिबवून आणि सकाळी उठताक्षणीच कोपनहेगन सोडण्याचा निश्चय करून आम्ही चित्रपटगृहाबाहेर पडलो।

कोपनहेगनहून परतताना क्लॉडिया खूपच गभीर दिसत होती एक अक्षर न बोलता कुठेतरी दूरवर नजर लावून शातपणे बसली होती मी

सहज तिची चेष्टा करण्यासाठी म्हटले, "कुणाची तरी आठवण येते का ?
"छे, मला कुणी मिळच नाही। ती उद्गारली "माझ्यापेक्षा बुद्धिमान पुरुष जेव्हा भेटेल तेव्हाच त्याच्याशी मला मैत्री करावीशी वाटेल आणि अजून तरी असा भाग्यवान पुरुष भेटला नाही "

मधेच कशावरून तरी आमचा एक वादविवाद सुरू झाला क्लॉडिया थोडा वेळ शांतपणे ती ऐकत होती ऐकताऐकता एकदम ती मोठमोठ्याने हसून म्हणाली, 'भारतीय स्त्रियासुद्धा पुरुषाच्या बरोबरीने वादविवाद करू शकतात हे आज कळून मला अतिशय आनंद वाटला मला वाटत होते, की तुम्ही बायका पुरुषासमोर गुपचुप माना खाली घालून बसता म्हणून तुझ्या माझ्यात काहीच फरक नाही हे कळून मला फारफार आनंद झाला !"

ल्युबेक सोडताना मनात एकच खंत वाटत होती, की क्लॉडियाच्या मनाचे धागे नुकतेच कुठे उकलू लागले होते ते आपण पुरते उकलू शकलो नाही।

आमच्या गाडीपुढे आपली गाडी चालवीत ल्युबेक गावच्या वेशीपर्यंत क्लॉडिया आम्हाला पोहोचवायला आली होती दिसेनासे होईपर्यंत हात जोरजोराने हलवून ती आम्हाला 'बाय् बाय् करीत होती खेळण्यातल्या घरासारखे दिसणारे ते छोटेसे टुमदार ल्युबेक गाव, त्यात शोभून दिसणारी मोहक लोभसवाणी क्लॉडिया, तिच्याकडे ऐकलेले ते रेड इंडियन संगीताचे झपाटणारे सूर, या सर्वांच्या सुंदर आठवणी घेऊन मी परत जात होते, आणि मनात मात्र एकसारखी एकच उत्कट इच्छा परतपरत येत होती– या तडफदार, बुद्धिमान, प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या क्लॉडियाला तितकाच जबरदस्त बुद्धिमान पुरुष भेटावा– अगदी खरेच भेटावा– नक्की भेटावा– लौकरच –!!

□ □

# ७. कुठे पीटर उस्टिनॉव्ह, कुठे मार्लन ब्रॅण्डो !

लंडनला गेल्यानंतर तिथे जाऊन नाटके बघायची नाहीत म्हणजे पंढरपूरला जाऊन पांडुरंगाचे दर्शन न घेण्यासारखेच आहे. इंग्लिश लोकांचे नाट्यप्रेम पाहिले की त्यांच्यात व मराठी माणसात त्याबाबतीत तरी अतिशय जवळचे नाते आहे असे वाटते.

ज्या वयात काही समजत नव्हते, तितक्या लहान वयापासून मी नाटके पाहिली आहेत, ऐकली आहेत. तेव्हापासून नाटकाचे वेड डोक्यात जे शिरले ते अगदी नसानसात जाऊन भिनले आहे. त्यामुळे लंडनला गेल्यानंतर जितकी मिळतील तेवढी नाटके बघायची असे मी ठरवले होते. किंबहुना लंडनला जाण्यात ते एक मोठे आकर्षणच होते !

लंडनमध्ये गेली २१ वर्षे अव्याहतपणे ज्या नाटकाचे हाऊसफुल्ल प्रयोग चालू आहेत ते नाटक म्हणजे ॲगाथा क्रिस्टी ह्या सुप्रसिद्ध लेखिकेचे ' माऊस ट्रॅप ' हे रहस्यमय नाटक. यातला नटसंच दर खपेला बदलत असला तरी त्याची लोकप्रियता अजूनही ओसरलेली नाही. त्या नाटकाची तिकिटे मिळणे मोठे मुष्कील. लंडनमधील एक महाराष्ट्रीय रहिवासी श्री. पैंगणकर ह्यांनी महत्प्रयासाने आमच्यासाठी तिकिटे मिळवून आणली. साहजिकच हे नाटक बघायला जाताना मी मनात फार मोठ्या अपेक्षा बाळगून गेले होते. आमची उत्सुकता क्षणाक्षणाला वाढतच होती. नाट्यगृह खच्चून भरले होते. प्रेक्षकांमध्ये अगदी लहानलहान मुलेही बघून मला आश्चर्यच वाटले.

नाट्यगृह अगदीच लहानसे, जुन्या पद्धतीचे होते जेमतेम पाचशे प्रेक्षक बसू शकतील एवढेच मोठे स्टेजला लागूनच दोन्ही बाजूला दोन छोटीशी बॉक्सेस होती त्यात जरा भारीपैकी सूटबूट घातलेले दोनचार प्रेक्षक बसलेले होते ते प्रेक्षक म्हणजे नाटकाचाच एक भाग नव्हते ना, अशी शंका माझ्या मनात आली दिसत तर होते प्रेक्षकासारखेच पण मग पडदा उघडल्यानंतर स्टेजवरच्या नटांना ह्या प्रेक्षकांच्या इतक्या जवळच्या सान्नि-ध्याने अडचण तर भासणार नाही ना, अशी काळजी उगीचच माझ्या मनाला लागून राहिली बरोबर आठ वाजता एक सेकंदही उशीर न होता पडदा उघडला एका जुनाट वाडेवजा घराचे ते दृश्य होते पार्श्वभागी एक मोठी काचेची खिडकी होती त्यातून दिसणारा बाहेरील हिमवर्षावाचा देखावा अत्यंत वास्तववादी होता पात्रे रंगभूमीवर वावरू लागली ती इतकी सहजपणे, त्यांचा मेकअप्, त्यांचे कपडे, त्यांचे बोलणे-चालणे हे इतके स्वाभाविक होते, की जणू काय ह्या व्यक्ती खऱ्याखुऱ्या होत्या बाहेर कुठे-तरी त्या आपल्याला भेटल्या आहेत असा भास उत्पन्न करणाऱ्या भूमिका करणाऱ्या नटनट्या तशा काही फारशा नावाजलेल्या नव्हत्या दुय्यम दर्जाच्या होत्या पण तरीसुद्धा त्यांच्या अभिनयात कुठेही कसूर होत नव्हती इतक्या रेखीवपणे बसविलेला शिस्तबद्ध प्रयोग आपल्याकडील उत्तम नाटकांचासुद्धा क्वचितच होत असेल

नाटक ऐन रंगात आले असता मध्येच एखादी विंग हलून त्याच्या फटीतून आतल्या माणसांच्या हालचाली स्पष्टपणे दिसत आहेत, जेव्हा वाजायला पाहिजे तेव्हा टेलिफोन कधी वाजत नाही, अन् रिसीव्हर उचलला तरी तो वाजत राहतो, किंवा मध्येच नटाचा आवाज चिरकून रंगाचा भंग होतो, गप्पांच्या नादात नटीला रंगमंचावर प्रवेश करायला उशीर होतो आहे हे लक्षात आल्यानंतर ती येईपर्यंत कसातरी वेळ काढायला म्हणून रंग-मंचावरच्या पात्रांनी फालतू विनोद सुरू केला आहे, असल्या ढोबळ चुका न कळण्याइतका आपला प्रेक्षकवर्ग काही अगदीच अजाण नसतो पण आपल्याकडचे प्रेक्षक बिचारे रंगमंचावर घडणाऱ्या चुका समजून घेतात आणि जणू काही काहीच कळले नाही असे अज्ञानाचे ढोंग करून जे काही रंगमंचावर

अभिनयाचे दर्शन घडते ते आपले निमूटपणे बघून घेतात अशी भलतीच जबाबदारी इंग्लिश प्रेक्षकांवर कधी काळी येऊन पडत असेल असे वाटत नाही कारण तिकडील नाटकाचे प्रयोग एकदा सुरू झाले की इतके सुविहित-पणे चालले असतात, की त्यात लहानसहान चुकानींही कधीच रसभंग होणार नाही अर्थात् त्यामागे त्याची केवढी मेहनत अन् तपश्चर्या असते ह्याची— नाटकाचे प्रयोग पाहिल्यानतर कल्पना येते तसे पाहिले तर आपल्याकडेही काही उत्कृष्ट दर्जाची नाटके नाहीत असे नाही नट-नटचाही पहिल्या प्रतीच्या अनेक आहेत परतु इथल्या दुय्यम नट-नटचाच्या अभिनयातही जी सफाई आहे, जो अकृत्रिमपणा आहे तो खरोखरच कौतुकास्पद आहे

माऊस ट्रॅप' ची लेखिका अॅगाथा क्रिस्टी म्हणजे रहस्यकथांची सम्राज्ञीच आहे ह्या नाटकातील रहस्य शेवटपर्यंत तसेच ताणून ठेवल्यामुळे त्यातील गमत वाढली आहे एका जुनाट वाडयात नुकतेच एका जोडप्याने हॉटेल थाटले आहे बाहेर होणाऱ्या सतत हिमवर्षावाने सर्व रस्ते बद झाले आहेत त्यामुळे आश्रयासाठी आलेले सहा प्रवासी तिथे अडकून पडले आहेत तेवढचातच त्यांच्या लक्षात येते, की एक पिसाट खुनी माणूस त्यांच्यामध्येच वावरत आहे आणि तो एकूण तीन खून तिथे करणार आहे सर्वांची भीतीने पाचावर धारण बसते मृत्यूच्या सापळचात सापडलेल्या उदरासारखी त्यांची अवस्था होते कुठल्या क्षणी कुणाचा खून पडेल त्याचा नेम नसतो प्रत्येकजण दुसऱ्याकडे सशयाच्या नजरेने बघत आहे त्याच्या त्या भीतीने गारठून गेलेल्या मनाची विलक्षण तगमग दाखविताना प्रत्येक नटनटीने अभिनयाची कमाल केली होती जबरदस्त नाटच असलेल्या त्या नाटकाने प्रेक्षकांच्या मनाची इतकी पकड घेतली होती, की सपूर्ण प्रेक्षकवर्ग जागच्या जागी गोठल्यासारखा स्तब्ध झालेला होता इतक्या विलक्षण ताकदीचे रहस्यमय नाटक अजून तरी माझ्या पाहण्यात आले नव्हते त्या नाटकाचा मनावर पडलेला ताण कमी होण्यासाठी दोनतीन दिवस तरी लागले

सध्या लडनमध्ये सेक्स प्लेज अतिशय बोकाळले आहेत 'ओह कलकत्ता ह्या नाटकासबधी वर्तमानपत्रातून व मासिकातून इतक्या वेळा लिहिले

गेले आहे व त्याच्यावर अनेक वेळा चर्चा झाली आहे, की त्यासबधी बहुतेक सर्वांनाच माहिती आहे हे व अशाच प्रकारची अनेक नाटके तिथ सतत चालू



असतात 'पजामा टॉप्स' हे नाटक आम्ही-- म्हणजे श्रीमती आजीबाई बनारसे ह्याची कन्या सौ कला मेहेता, तिचे यजमान श्री प्रतापभाई मेहेता आणि मी—बघायला गेलो त्या वेळी जाताना हेही नाटक अशा प्रकारचे असेल अशी मला कल्पनाच नव्हती कलाला व प्रतापभाईनाही खूप आवड आहे नाटकाची त्या दिवशी प्रतापभाईंचा वाढदिवस होता म्हणून त्यानी हौसेने ह्या नाटकाची तिकिटे मोठ्या मुष्किलीने मिळवून आणली नाटकाला जाताजाता कला मिस्किलपणे हसत म्हणाली, मीनाताई, ह्या नाटकात सगळ्या उघड्याच बायका आहेत बर का ! बापरे ! मी घाबरून उद्-गारले, 'पण थोडेफार काहीतरी अगावर घालत असतील ना ?' छे ! बिलकूल काही नाही ! पुरुष मात्र घालतात ह कपडे प्रतापभाईनी पुस्ती जोडली नशीब आमच !' मी एक सुटकेचा नि श्वास सोडला

नाट्यगृहात शिरताना मला उगीचच चोरट्यासारखे होत होते स्टेजवर अशा उघड्या बायका बघायच्या अन् त्याही सर्व लोकासमोर ? छे, छे ! ती कल्पनाच कशी तरी वाटत होती प्रेक्षकवर्गातल्या चागले अद्ययावत् पोषाख केलेल्या निरनिराळ्या वयाच्या सभ्य स्त्री-पुरुषाकडे पाहून मला थोडेसे आश्चर्य वाटले अशा नाटकाचा प्रेक्षकवर्ग वेगळ्याच प्रकारचा असावा अशी का कोण जाणे, पण माझी प्रामाणिक समजूत झाली होती माझी समजूत अगदीच निराधार होती हे तिथे गेल्यानतर लक्षात आले

आपल्या इकडल्याप्रमाणे नाटकाच्या आधी नाटकाच्या लेखकापासून ते रंगमंच-व्यवस्थापकापर्यंत मानकऱ्याच्या नावाची कटाळवाणी नामावळ सांगण्याची तिकडे पद्धत नाही नाटकासंबंधी माहिती छापलेल्या छोट्या-छोट्या पुस्तिकाच तिथे विकत घ्याव्या लागतात तेव्हा वेळ झाली की पडदा उघडून एकदम नाटकालाच सुरुवात होते त्याप्रमाणे पडदा अगदी वेळेवर उघडला गेला आणि एका इंग्लिश घरापुढल्या बागेचे दृश्य दिसू लागले हे दृश्य इतक्या सुंदर पद्धतीने उभे केले होते की जणू काही खरीखुरी बागच ! त्या बागेतील अर्ध्या भागात एक काचेचा प्रचंड तलाव उभारलेला होता ! त्याची रचना अशी होती, की त्यातील निळसर पाणी थेट तळापर्यंत काचेतून स्पष्ट दिसावे ह्या नुसत्या तलावासाठीच चाळीस हजार पौंड (म्हणजे जवळजवळ आठ लाख रुपये) खर्च केलेला होता ! तो तलाव ह्या नाटकाच्या प्रमुख आकर्षणाचा भाग होता

नाटक सुरू झाल्यानंतर बागेतल्या पायऱ्यावरून लचकत मुरडत उड्या मारीत नायिकेने प्रवेश केला साऱ्या प्रेक्षागृहात स्तब्धता पसरली गळ्यात घातलेल्या एका सोनेरी कड्यातून गुडघ्यापर्यंत सर्व अंगभर नाजूक सोनेरी साखळ्या सोडल्या होत्या एवढाच काय तो तिचा पेहेराव ! खांद्या-पर्यंत रुळणारे सोनेरी कुरळे केस, अत्यंत कमनीय बांधा, खेळकर अभिनय ह्या सर्वांमुळे तिने सर्वांची मने एका क्षणात जिंकून घेतली इतर स्त्री-पात्रेही अशीच थोडीफार वस्त्राचा आभास उत्पन्न करतील न करतील इतपत, आभूषणे ल्यालेली काही तर संपूर्ण विवस्त्र होत्या आणि त्या संबंध नाटकात मधूनमधून पोहोण्याच्या तलावात उड्या मारून आपले पोहोण्याचे कौशल्य दाखविता दाखविता अंगप्रत्यंगाचे निःसंकोचपणे दर्शन घडवीत होत्या तेवढेच त्यांचे त्या नाटकात काम होते ! पुरुषपात्रे मात्र अद्ययावत् सूटबूट घातलेली होती

ह्या नाटकात एक लहानशी कथा गुंफलेली होती म्हणूनच त्याला एक संपूर्ण नाटक म्हणायचे नाही तर लहान लहान चुटके, प्रहसने, कॅबेरे ह्यांचे ते एक मिश्रणच होते माऊ माऊ या गाजलेल्या फ्रेंच विनोदी प्रहसनावर आधारलेल्या ह्या नाटकाचा निर्माता आहे पॉल रेमंड ह्याने

'ओह् कलकत्ता' सारखी नाटके निर्मिलेली आहेत 'फॉर मेन ओन्ली' ह्या खास पुरुषासाठी निघणाऱ्या प्रचंड खपाच्या मासिकाचा प्रकाशक पॉल रेमडच आहे 'पॉल रेमड ऑर्गनायझेशन' ही फार मोठी संस्था असून, त्या संस्थेच्या मालकीचे 'व्हाइट हॉल' हे थिएटर आहे तिथे 'पजामा टॉप्स' नाटक चालू आहे

जुन्या ठराविक साचातील नाटकाची परंपरा मोडून निव्वळ करमणूक हेच ध्येय मनात ठेवून पॉल रेमडने अशा लैंगिक नाटकांची निर्मिती केलेली आहे सामान्य प्रेक्षक नाटकाना येतो तो रोजच्या व्यवहारातील कटकटी विसरण्यासाठी, चार घटका मजेत घालविण्यासाठी त्यामुळे डोक्यावरून जाणारे जडजबाल तत्त्वज्ञान प्रेक्षकाच्या गळी कडू गोळीसारखे उतरवि-ण्याचा प्रयत्न न करता त्याना भरपूर मनसोक्त करमणूक मिळावी हेच तत्त्व त्याच्या नाटकामागे आहे त्यांच्या करमणुकीची तऱ्हा कोणाला आवडो न आवडो, पण या नाटकाना भरपूर प्रेक्षकवर्ग येतो, दोन घटका बाहेरच्या जगाचा विसर पडून हसतखेळत परत जातो

'पजामा टॉप्स' मधील लिओनार्ड जॉली हे पुरुष-पात्र अत्यंत बायलट आहे त्यामुळे त्याचे चालणेबोलणे, कपडे करणे सगळेच बायकासारखे तो सर्वांची डोकेदुखी होतो त्याच्यातील पौरुष कसे जागे करायचे हा मोठा 'गहन' प्रश्न सर्वांना पडतो एका रात्री एक मुलगी चुकून त्याच्या खोलीत शिरते अन् सकाळी उठताच लिओनार्डचा एकदम कायापालट होऊन तो खऱ्या पुरुषासारखा वागायला लागतो नाटकाचा शेवट मग सुखात होतो हे सांगायला नकोच अर्थात् त्या रात्री त्याच्या खोलीत शिरलेली मुलगी कोण, हे रहस्य कायमच रहाते

लिओनार्डची भूमिका करणारा रॉजर किटर हा एक सुप्रसिद्ध कॅबरे नट आहे त्याला निरनिराळ्या मोठ्या हॉटेल्समधून काम करण्यासाठी सध्या फार मोठी मागणी आहे बघता बघता विनोदी चुटके मोठ्या मजेशीर पद्धतीने सांगणे हा त्याचा हातखंडा आहे अर्थात सर्व चुटके स्त्री-पुरुष-संबंधावर असल्यामुळे चावट आहेत तरीसुद्धा मनातील नाजूक भावनांना कुठेही धक्का लावत नाहीत सतत तीन तास प्रेक्षकाना भरपूर हसत ठवणारे हे नाटक म्हणजे विनोदाची मेजवानीच आहे

आपल्याकडे अशी नाटके कधी काळी येतील असे वाटत नाही पण सध्या आपल्याकडे आलेल्या विकृत नाटकापेक्षा ही लैंगिक प्रश्नावर अशी खुल्लम-खुल्ला निकोप चर्चा करणारी नाटके फार बरी मनात कुठेही विकृती निर्माण न करता किंवा लैंगिक भावनाना जरासुद्धा धक्का न लावता किंवा त्यासबंधी घृणा उत्पन्न न करता निव्वळ करमणूक करणारी ही हलकी-फुलकी नाटके माझ्या मते तरी निरुपद्रवी आहेत अर्थात् अशा नाटकाना चिरतन मूल्ये अशी काहीच नाहीत कदाचित काही दिवसानी प्रेक्षकांना कटाळा आल्यावर अशा नाटकांची लाट ओसरेलसुद्धा परतु तसा दावा ही नाटके करीतच नाहीत सध्या तरी ती प्रक्षकाचे भरपूर मनोरजन करीत आहेत.

डेबोरा कर ही माझी अत्यत आवडती नटी ॲन् अफेअर टु रिमेंबर या चित्रपटात घडलेले तिच्या उत्कृष्ट अभिनयाचे दर्शन कधीही विसरणे शक्य नाही त्यामुळे ती मुख्य नायिकेचे काम करीत असलेले 'अ डे आफ्टर द फेअर' हे नाटक बघण्यास मी अतिशय उत्सुक होते या नाटकाचा फारसा कुठे गाजावाजा झाला नव्हता त्यामुळे नाटक कसे असेल याबद्दल सर्वजण साशकच होते नाटक कसे का असेना, पण डेबोराला एकदा तरी प्रत्यक्ष रगभूमीवर बघायचीच असे मी ठरवले होते

नाटक अगदी साधे सरळ होते ना त्यात नेपथ्याचा बडेजाव ना कसली कथेतील रहस्यमय गुतागुत एका साध्या सामान्य स्त्रीच्या भावनाचा त्यात आविष्कार होता डेबोरा ही एका गर्भश्रीमत लॉर्डची पत्नी असते तिला पुत्रप्राप्ती न झाल्यामुळे ती दु:खी असते त्यातच नवरा नेहमी दारू आणि जुगार या व्यसनात बुडालेला त्यामुळे पुरुषाच्या सहवासाची अन् प्रेमाची ती भुकेली असते स्त्रीसुलभ भावनाचा कोंडमारा झालेली, मातृत्वाच्या सुखाला आसुसलेली डेबोरा आपली सुदर निष्पाप, कोवळी मोलकरीण कॅथी हिच्यावर मुलीसारखे प्रेम करू लागते आईच्या मायेने तिला जपते एके रात्री कॅथी एका जत्रेला गेली असता तिची एका उमद्या सुशिक्षित तरुणाशी गाठ पडते प्रथमदर्शनीच ती त्याच्या प्रेमात पडते तोही तिच्या साध्या सरळ स्वभावाला अन् निरागस सौंदर्याला भुलतो प्रेमाच्या भरात

त्याला ती नेहमी पत्रे पाठवीन म्हणून वचन देते नतर जेव्हा स्वत निरक्षर असल्याचे तिच्या ध्यानात येते तेव्हा तिचे धाबे दणाणते ती आपल्या मालकिणीकडे आपले मन उघडे करते त्या तरुणावाचून कॅथीला जगणे अशक्य आहे हे समजल्यावर डेबोरा तिला प्रेमपत्रे लिहून द्यायचे कबूल करते कॅथीसाठी प्रेमपत्रे लिहीत असताना तिच्या प्रेमभावनाशी डेबोरा इतकी एकरूप होऊन जाते, की नकळत ती आपल्या स्वत च्या दबलेल्या भावनांना मोकळी वाट करून देते जणू काही स्वत च कॅथी आहोत अशा तन्मयतेने ती आपल्या प्रेमाचे वर्णन करते ती प्रीतीने ओथबलेली पत्रे वाचून कॅथीचा प्रियकर अत्यत खूष होतो आणि कॅथीशी विवाह करण्याचे ठरवितो अशातच कॅथीला दिवस गेलेले असतात ते कळताच डेबोराला दु खाचा धक्का बसतो आपणच तिच्या जागी असतो तर किती बरे झाले असते अशा कल्पनेने ती व्याकळ होते, नी कॅथीचा सूक्ष्म मत्सर करू लागते अखेर ती कॅथीचा विवाह स्वत थाटाने लावून द्यायचे ठरवते लग्न झाल्यानतर भोळीभाबडी कॅथी आनदाच्या भरात पत्रांचे रहस्य आपल्या पतीला सागून टाकते त्याला मोठा धक्का बसतो कॅथीला घरी घेऊन जाण्यापूर्वी एकदाच डेबोराच्या भेटीची तो याचना करतो डेबोराची एकान्तात भेट झाल्यानतर तो तिला सागतो, 'मला मनातून समजत होते, की हे लिहिणे कॅथीचे नाही कुणाच्या-तरी भुकेल्या मनातील खऱ्या प्रीतीचे हे बोल आहेत आणि ते तुझेच होते मीही मनोमनी तुझ्यावरच प्रेम केले मी सुशिक्षित, समजस आहे कॅथीला मी नीट साभाळीन पती म्हणून माझी जी कर्तव्ये आहेत ती चोख पार पाडीन पण माझे मन मात्र तुझ्यापाशीच असेल ' डेबोराचे तो एकच चुबन घेऊन तिच्या आयुष्यातून कायमचा निघून जातो एक क्षणभर का होईना, खऱ्या प्रीतीचा साक्षात्कार डेबोराला घडतो अन् दुसऱ्याच क्षणी आपल्या विफल प्रेमाच्या दारुण दु खाने व्याकूळ होऊन ती धरणीवर कोसळते '

डेबोराने ही भूमिका इतकी सुदर साकार केली आहे, की ती अभिनय करीत आहे असे वाटतच नाही जणू काय ही तिची स्वत चीच कहाणी आहे असे वाटते तिच्या हालचालीत अजूनही मोठा डौल आहे एक प्रकारचा घरदाजपणा आहे वाणी अतिशय स्पष्ट, स्वच्छ असल्यामुळे भाषेतील

सौंदर्य द्विगुणित होते बोलण्यात किंचित कंप आहे पण ते तिचे वैशिष्ट्यच आहे आणि ते या भूमिकेला अगदी साजेसे आहे हे नाटक सर्वस्वी डेबोराचेच आहे भावनांचा कोंडमारा झालेल्या एका स्त्रीचे हे चित्र भारतीय स्त्रीच्या चित्राशी अगदी मिळतेजुळते आहे त्यामुळे हे नाटक परकीय असूनसुद्धा फार जवळचे वाटले जगात कुठेही गेले तरी स्त्रीच्या भावना सारख्याच असतात, याचा प्रत्यय हे नाटक बघताना येतो

१३ एप्रिल हा आमचा लंडनच्या मुक्कामातील शेवटचा दिवस होता त्या दिवशी लक्षात आले, की इथे खूप नाटके बघायची ठरवूनसुद्धा वेळेच्या अन् पैशाच्या अभावी आपण फारशी नाटके बघितली नाहीत आज तरी शेवटचे नाटक बघायचे म्हणून मी अधाशासारख्या नाटकांच्या जाहिराती बघू लागले आणि ' द अननोन सोल्जर अँड हिज वाइफ या नावाने मला एकदम आकर्षित केले लेखक, दिग्दर्शक आणि प्रमुख नट म्हणून पीटर उस्टिनॉव्हचे नाव झळकत होते माझी इच्छा कळून कलाची वहीण कमल हिने मोठ्या हौसेने तिकिटे काढून आणली



लंडनमधील ड्रुरी लेन ही गल्ली म्हणजे चारशे वर्षांपासूनचे रंगभूमीचे माहेरघरच आहे तेथील विंटर गार्डन ' हे जुने नाट्यमंदिर पाडून त्या जागी ' न्यू लंडन थिएटर हे भव्य नाट्यगृह नुकतेच बांधून पुरे करण्यात आले आहे अर्धवर्तुळाकार असलेल्या या थिएटरच्या काही खुर्च्या रंगमंचाच्या मागच्या बाजूला सरकवता येतात आणि वर्तुळाकार रंगमंच मध्यभागी सरकवून ते अँफीथिएटरसारखे वापरता येते येथील ध्वनीची अन् प्रकाशयोजनेची साधनसामग्री अत्यंत अद्ययावत् आहे

पडदा उघडल्यानंतर संपूर्ण रिकाम्या अशा भव्य रंगमंचावर फक्त एक थडगे दिसते भोवताली टेलिव्हिजनचे कॅमेरे सुसज्ज आहेत नुकत्याच

झालेल्या युद्धात धारातीर्थी पडलेल्या अज्ञात सैनिकाचे स्मारक उभारण्याचा प्रसग साऱ्या देशाला टी व्ही वरून दाखविण्याची जय्यत तयारी चालू आहे सैनिक व सेनाधिकारी मानवदना देण्यास उभे आहेत या प्रसगी योग्य असे भाषण करण्यास धर्मगुरू आलेले आहेत पण या सर्व समारभात त्या अज्ञात सैनिकाच्या पत्नीला मात्र कुठच स्थान नाही कारण तो सैनिक अज्ञात आहे तरीही पत्नी दावा करते, की तो तिचाच पती आहे तो नेहमीच अज्ञात राहिला, कुणी कधी त्याला ओळखलेच नाही बघताबघता काळाची पाने मागेमागे उलटतात सर्वजण हजारो वर्षापूर्वीच्या रोमन काळात वावरू लागतात धर्माच्या नावाखाली युद्धपिपासू राज्यकर्ते युद्ध पुकारतात अनन्वित अत्याचार केले जातात अन् त्याच्या क्रूर इच्छेसाठी बळी जातो बिचाऱ्या अज्ञात सैनिकाचा वर्षानुवर्षे त्याला युद्धात मरावेच लागते आपल्या पत्नीशी कधीही त्याचे मीलन होत नाही तिच्या पोटी जन्म घेणाऱ्या पुत्राचे दर्शन कधी त्याला घडतच नाही जगण्याची त्याची इच्छा कधी पुरीच होत नाही शतकामागून शतके गेली माणसे तशीच राहिली इच्छा आकाक्षा, लालसा, क्रौर्य, अत्याचार सर्व काही तेच राहिले मुखवटे फक्त बदलले बळी गेला तो सामान्य माणसाचा अखेर त्यानेही बड पुकारले दर खेपेस काय म्हणून त्याने अज्ञात रहायचे? तो अखेर मरायचे नाकारतो त्याला त्याच्या पत्नी-बरोबर ससार करायचाय, नवीन जन्म घेणाऱ्या पुत्राचे मुखदर्शन घ्यायचे आहे त्याला जगायचेय्, त्याला जगायचेय्

द अन्नोन सोल्जर अँड हिज वाइफ हा एक अद्भुतरम्य नाट्यानुभव आहे पीटर उस्टिनॉव्हच्या महान् प्रतिभेचे दर्शन घडविणारी ती एक चमत्कृती आहे जीवनाच्या दारुण शोकात्तिकेतून घडणाऱ्या विनोदाचे दर्शन आहे समाजातील अन्यायावर, ढोगावर निर्दयपणे ओढलेले उपरोधाचे कठोर फटकारे आहेत मनाला थक्क करून मोडणारी उत्तुग प्रतिभेची ही महान् भरारी आहे पीटर उस्टिनॉव्हने ढोगी, दुराचारी धर्मगुरूची भूमिका उत्कृष्टपणे साकार केली होती त्याच्या तोंडून निघणारे खुसखुशीत नर्म-विनोदाचे फवारे म्हणजे मोठी मेजवानीच होती पीटर उस्टिनॉव्ह हा अत्यत प्रतिभावान, अष्टपैलू लेखक आहे जीवनातील ढोगांवर विदारक

प्रकाश टाकणारी ही चमत्कृतिपूर्ण नाट्यकृती म्हणजे उपरोधिक विनोदाचा एक उत्कृष्ट नमुना आहे


नाटक संपल्यानंतर सर्व कलाकारांनी रंगमंचावर येऊन प्रेक्षकांना अभिवादन करण्याची इथे पद्धत आहे प्रेक्षकही कौतुकाने टाळ्या वाजवून कलाकारांना पुनःपुन्हा बाहेर बोलावतात त्या दिवशी पीटर उस्टिनॉव्ह व त्याचे सहकारी ह्यांना प्रेक्षकांनी किती वेळा टाळ्या दिल्या त्याला गणतीच नाही !

लंडनचा मुक्काम संपला अनेक नाटके बघायची राहिली म्हणून चुटपुटल्या मनाने लंडन सोडले रंगभूमीच्या कलेचे उत्कृष्ट दर्शन घडविणारी ती भूमी मागे राहिली युरोपमध्ये पाऊल टाकताच मोठमोठ्या शहरांत कोपऱ्याकोपऱ्यावर कॅबरे, सेक्स फिल्म्स, ब्ल्यू फिल्म्स, ह्यांचे विकृत भडक दर्शन घडले प्रत्येक शहरात 'लास्ट टँगो इन् पॅरिस' ह्या सिनेमाच्या जाहिराती प्रामुख्याने झळकत होत्या त्यातील मार्लन ब्रँडो ह्या नटाच्या नावाने माझे कुतूहल जागे झाले होते पण स्वित्झर्लंडमधील बासल गावात येईपर्यंत मी ते नावही विसरून गेले होते बासलला मधू व इंगे ह्यांच्याकडे उतरल्यानंतर मध्याकाळी आम्ही शहराचा फेरफटका मारायला निघालो त्यांच्या घराच्या कोपऱ्यावरच एक चित्रपटगृह होते बाहेर शोकेसमध्ये सिनेमातील विवस्त्र स्त्री-पुरुषांची निरनिराळ्या अवस्थांतील चित्रे उघडपणे लावलेली पाहून माझ्या मनाला धक्का बसला नंतर बासलच्या माझ्या एक महिन्याच्या वास्तव्यात अनेक वेळा त्या कोपऱ्यावरून जाताना शाळकरी पोरांचे थवेच्या थवे ती चित्रे बघायला थांबलेले मी पाहिले होते त्यांच्या कोवळ्या मनावर असल्या चित्रांचा काय परिणाम होत असेल असा विचार वारंवार माझ्या मनात येत राहिला

"तू 'लास्ट टँगो इन पॅरिस' बघितलास की नाही ?" मधूने मला विचारले येवढे बघण्यासारखे आहे काय ?" मी संशयाने विचारले "हॅं ! काहीच नाही त्यात पण तुम्ही बायकाबायकांच बघून या !" त्याने सांगितले त्या रात्री इंगे, तिच्या दोन मैत्रिणी व मी सिनेमाला गेलो, तो थिएटर अगदी गच्च भरलेले इंग्लंडमध्ये व युरोपमध्ये चित्रपटगृहे अक्षरशः ओस पडलेली

असतात एकदा तिकिट काढले की तुम्ही कितीही वेळ आतमध्ये बसू शकता हा सिनेमा मात्र सगळीकडे अगदी हाऊसफुल्ल चाललेला आहे इकडे थिएटरमध्ये धूम्रपान करायला परवानगी आहे सर्व बायका-पुरुषाच्या सिगरेटी पेटलेल्या होत्या !

चित्रपट अर्धा फ्रेंच तर अर्धा इंग्लिश भाषेत होता इंगेला फ्रेंच येत असल्यामुळे ती मधूनमधून मला अर्थ समजावून सांगत होती अर्थात् अर्थ न समजण्याइतके त्यात काहीच नव्हते सर्वच प्रसंग भडकपणे मांडलेले होते चित्रपटाची सुरुवात आकर्षक होती मार्लन ब्रँडो एका तरुण मुलीचा पाठलाग करीत होता त्याच्या चेहऱ्यावरच्या भावावरून तो प्रथमदर्शनीच विकृत मनाचा पुरुष दिसत होता नुकतीच त्याच्या पत्नीने आत्महत्त्या केलेली असते बघताबघता त्या मुलीला तो आपल्या घरी घेऊन येतो आणि सरळ



उचलून तिच्यावर बलात्कार करतो ! चित्रपट सुरू झाल्यानंतर कथेचा कुठल्याही तऱ्हेने परिपोष न होता अचानक दाखविलेला हा प्रसंग मनाला क मोठा हादरा देऊन जातो बलात्काराचा प्रसंग अगदी उघडपणे कुठेही आडपडदा न ठेवता चांगला दोनचार मिनिटे इतक्या भयान करीतीने चित्रित

केलेला आहे, की त्या सव प्रकाराची विलक्षण घृणा येते त्याच वेळी चित्रपट सोडून निघून जावेसे वाटते मानसिक रोगाने पछाडलेल्या ह्या माणसाचे व त्या तरुण मुलीचे सबध पुढे इतके विकृत दाखविलेले आहेत त्याच्या तावडीतून सुटण्याची त्या मुलीची केविलवाणी धडपड आणि त्या मुलीबद्दल वाढत चाललेले मार्लनच्या मनातील प्रेम ह्या सघर्षातून अखेर सुटका होते ती मार्लनच्या मृत्यूनेच ती मुलगीच त्याचा अखेर खून करते!

अशा विकृत विषयावर चित्रपट काढून निर्मात्याने काय साधले असेल ते असो पण मार्लन ब्रँडोसारखा एक उत्कृष्ट अभिनेता अशा चित्रपटाचा बळी पडला हे बघून अतिशय वाईट वाटले ज्युलियस सीझर ह्या चित्रपटातील त्याचे काम म्हणजे अभिनयाचा एक उत्कृष्ट नमुना आहे एकापेक्षा एक सरस अशा अनेक भूमिका त्याने साकार केलेल्या आहेत

अभिनयाची असामान्य पातळी गाठलेला एक उत्तम नट येथे सपूर्ण-पणे घसरला आहे कदाचित ओसरत चाललेली लोकप्रियतेची लाट थोपवून धरण्याचा हा एक अभिनव प्रकार असेल! या चित्रपटामुळे त्याला बेफाम पैसा मिळाला आहे एवढे मात्र निश्चित

आजकाल विकृत चित्रपटाची व नाटकाची नवीनच लाट आलेली आहे त्याच वर्गातील हा चित्रपट ह्याने कोणता उद्देश साध्य होत असेल तो होवो जीवन जसे आहे तसे दाखविणारी, स्वत ला वास्तववादी म्हणवून घेणारी नाटके व चित्रपट वास्तववादाच्या हव्यासापायी नकळत मनातील सद्वृत्तींना जबरदस्त हादरा देऊन जात आहेत हे निश्चित!

'लास्ट टँगो इन् पॅरिस' ह्या नावातील 'टँगो ह्या शब्दाचा अर्थ मी इंगेला विचारला 'टँगो हा एक विलक्षण जलद गतीचा पाश्चिमात्य नृत्याचा उत्कृष्ट प्रकार आहे पण तोही अनुभव ह्या चित्रपटात सुखासुखी मिळू दिलेला नाही! चित्रपटाच्या अखेरच्या भागात या नृत्याचा एक प्रसग आहे त्या नृत्याच्या शेवटी मार्लन अखेर उरलेसुरले जेवढे झाकण्यासारखे आहे ते उघडपणे दाखवून पसार होतो! चित्रपटसृष्टीतूनही त्याने असेच पसार व्हावे आणि आम्हा बिचाऱ्या सामान्य प्रेक्षकांना सकटातून सोडवावे हीच प्रार्थना करीत आम्ही चित्रपटगृहातून बाहेर पडलो!

□ □

# ८ 'बाथ'– एक थरारक अनुभव

रोज सकाळी उठल्यावर गरम वाफाळलेल्या चहाचे घुटके घेताघेता कला, प्रतापभाई व मी त्या दिवशी काय कार्यक्रम करावयाचा यावर चर्चा करीत असू लंडनमध्ये पाऊल टाकल्यापासून दररोज आमचे धूमधडाक्यात कार्यक्रम चालू होते "आज आपण बाथला जाऊ या,' कलेने त्या दिवशी उत्साहाने सांगितले– "तिथे रोमन काळातील गरम पाण्याचे झरे आहेत" दोनतीन दिवसांपासून ती सारखी मला सांगतच होती– मीनाताई, तुम्हाला बाथला घेऊन जाईन' म्हणून

दरखेपेला ती 'बाथ'बद्दल सांगे त्या वेळी ते नाव ओळखीचे वाटे तशी इंग्लंडला आल्यापासून बहुतेक सर्व ठिकाणांची नावे खूप ओळखीची असावीत असेच वाटत होते जणू काही पूर्वी केव्हातरी ती पाहिली असावीत अशी शाळेत असताना इंग्लंडच्या इतिहासाचा अभ्यास केला म्हणून असेल कदाचित इंग्लिश भाषेतील नावाजलेल्या कादबऱ्यांचीही अनेक पारायणे केली होती त्यामुळेही असेल, पण हा देश परका असा वाटतच नव्हता पपांच्या यशस्वी जीवनाची वाटचाल लंडनपासूनच सुरू झाली होती त्यामुळे मनात कुठेतरी ह्या गावाबद्दल आत्मीयता वाटत होती जिव्हाळा वाटत होता त्यातच आजीबाई वनारसे, त्यांच्या मुली, धाकटी मुलगी कला, हिचे यजमान प्रतापभाई मेहेता ह्यांनी केलेल्या प्रेमळ आदरातिथ्याने मन अगदी भारावून गेले होते त्यामुळे जणू काही माहेरी आल्यासारखेच वाटत होते मला

बरीच वर्षे लंडनला राहिल्यामुळे कलाला लंडनची खडान् खडा माहिती होती तिने आतापर्यंत मोठ्या हौसेने जीजी ठिकाणे दाखविली होती ती सर्वच अप्रतिम होती त्यामुळे बाथही तितकेच प्रेक्षणीय असणार या खात्रीने त्याबद्दल जास्त काहीही चौकशी मी केली नव्हती

कलाची तिन्ही मुले मोठी अवखळ आहेत तिच्या दोन्ही जुळ्या मुलींपैकी कुठली कोण हे मला शेवटपर्यंत कधी ओळखताच आले नाही



त्या तिघांच्या खोड्या आवरताआवरता तिची बिचारीची कोण धावपळ होत होती त्यांचे सर्व आटोपून बाहेर पडतापडता जवळजवळ १२ वाजले होते निघेपर्यंत प्रतापभाईंच्या एकसारख्या सूचना चालूच होत्या

कलाचे मोटार-ड्रायव्हिंग मोठे कौशल्यपूर्ण होते त्यामुळे आम्ही अगदी निश्चितच होतो रस्त्याचा नकाशा कलाने माझ्याजवळ दिला व तिला रस्ता दाखविण्यास सांगितले मी तिची गाइड बनले लंडनपासून चारी बाजूला अनेक हमरस्ते आहेत या रस्त्यांना ओ-वन, ओ-टू अशी नावे दिली आहेत लंडनहून बाथला जाण्यासाठी ओ-फोर हा रस्ता सर्वांत जवळचा व सोयीचा होता, असे नकाशावरून दिसत होते त्यामुळे आम्ही ओ-फोरच्या रस्त्यावरून आमची गाडी चालवली लंडनबाहेरच्या हमरस्त्यावरून एकदा गाडी हाकायला सुरुवात केली, की मध्ये कुठे थांबताच येत नाही रस्त्यावर दर मैलागणिक सूचना देणाऱ्या पाट्या असतात गाडी चालविणाऱ्या माणसाला गाडीच्या वेगामुळे त्या पटकन वाचता येत नाहीत त्यामुळे एखादी पाटी चुकली की चुकीचा रस्ता आहे हे कळल्यानंतरसुद्धा मध्येच कुठेतरी गाडी उभी करता येत नाही पार्किंगसाठी जिथे खास जागा केलेल्या असतात अशा ठिकाणीच गाडी थांबवता येते परंतु अशी जागा मिळेपर्यंत चांगले ४०–५० मैलांपर्यंत पुढे जावे लागते

रस्ता चुकू नये म्हणून मी अगदी काळजीपूर्वक लक्ष ठेवून होते आमच्या रोजच्या फिराफिरीने निमा खूपच थकली असल्यामुळे मागच्या सीटवर डोळे मिटून ती आरामशीर पडली होती

नकाशा बघताबघता मी कलाला सहजच विचारले, "कधी पोहोचू आपण बाथला?" "दोन तास तरी नक्कीच लागतील " कला म्हणाली "दोन तास? म्हणजे आहे तरी किती लांब हे गाव?" मी आश्चर्याने विचारले लंडनजवळच फार तर २५–३० मैलांवर हे गाव असेल अशी माझी समजूत होती "असेल एक १५० मैल" रस्त्यावर नजर स्थिर ठेवून कलाने शांतपणे सांगितले ते ऐकून मी थक्कच झाले! म्हणजे मुंबईहून पुणे जितके मैल आहे त्यापेक्षा जास्तच! "अग, मग तू एकटीच एवढे ड्रायव्हिंग कशी करणार? प्रतापभाईंना का नाही बरोबर घेतले? मी काळजी वाटून विचारले इतके मैल ही मुलगी एकटीच मोटार चालविणार ह्या कल्पनेने मला तिचे खूपच कौतुक वाटले इतकी वर्षे मी ड्रायव्हिंग करते आहे तरी मी फक्त मुंबईतल्या मुंबईत गाडी चालविण्यात शूर. अगदी पुण्यापर्यंत

अन् तेही एकटीने गाडी चालविण्याचे धैर्य कधी अंगात येईल असे मला वाटत नाही

आतासुद्धा आम्ही तिघी बायकाच आहोत हे लक्षात आल्यानतर मला मनात उगीचच भीती वाटू लागली इतका वेळ शात बसलेली निमाही खाडकन जागी झाली अन् घाबरून म्हणाली, 'आता हो मीनाताई ?' ते ऐकून कला खळखळून हसली व म्हणाली, "तुम्ही घाबरू नका हो निर्मलाताई मला सवय आहे एकटे ड्रायव्हींग करायची" ते ऐकून आम्हांला थोडा धीर आला, तरी कुणीतरी पुरुष माणूस बरोबर असायला पाहिजे होते अशी रुखरुख वाटतच होती निमाच्या मनातही नेमका तोच विचार आला असावा एकदम आठवण येऊन ती म्हणाली, "आपण भेडे याना तरी बरोबर घ्यायला पाहिजे होते ते म्हणाले होते, 'केव्हाही गेलात तरी मी येईन तुमच्याबरोबर' म्हणून" श्री विलास भेडे हे मुबईचेच एक उत्कृष्ट फोटोग्राफर आहेत त्यांची आमची आजीबाईंकडेच ओळख झाली होती तीनचार दिवसांपूर्वी ते आम्हांला लडनजवळील विंडसर कॅसल आणि सफारी पार्क येथे घेऊन गेले होते आदल्यादिवशी लडनला खूप पाऊस पडत होता हवा एकसारखी ढगाळलेली होती थोडा वेळ जरी बाहेर पडले तरी बोचरे वारे अगाला नुसते झोबत होते त्यामुळे दुसऱ्या दिवशी सफारी पार्कमध्ये कसे काय जाता यईल अशी शका वाटत होती "रात्री साडेनऊ वाजता टी व्ही वरील हवामानवृत्त ऐकून मग उद्या जायचे का नाही ते ठरवू या' भेंडचानी सागितले होते ते ऐकून मला खूप हसू आले हवामानवृत्ते कधी खरी ठरतात काय ? आपल्याकडील हवामानवृत्त म्हणजे एक मोठा विनोदच असतो रोज रात्री अकरा वाजता रेडिओ बद होण्यापूर्वी ते उगीच आपले द्यायचे म्हणून दिलेले आश्वासन— "येत्या चोवीस तासात हवामान कोरडे राहील अधूनमधून पावसाच्या सरी येतील, वगैरे वगैरे. जय हिंद"

बरोबर साडेनऊ वाजून पाच मिनिटांनी भेडे याचा फोन आला "गुड न्यूज— उद्या चकचकीत ऊन पडणार आहे सकाळी नऊ वाजता गाडी घेऊन येतो" मी आपली खिडकीवर ठिबकणाऱ्या पावसाच्या पागोळ्याचा आवाज ऐकत साशक मनाने झोपी गेले सकाळी चिमण्याच्या मजूळ चिवचिवाटाने

जागी होऊन बघते तो काय आश्चर्य ! बाहेर स्वच्छ उन्हे पडली होती मी अगदी थक्कच झाले ! म्हटले, कमाल आहे या हवामानतज्ज्ञाची ! त्याच्या अचूक हवामान-अदाजाचा प्रत्यय त्यानतर वेळोवेळी येत राहिला त्या दिवशी हवा विलक्षण सुदर होती सफारी पार्कला पोहोचेपर्यंत उन्हे बरीच वर आली होती पण हवेतील प्रसन्न गारव्याने त्याचा ताप होत नव्हता पार्कभोवती १०–१२ फूट उचीचे तारेच्या जाळीचे कुपण घातलेले होते मोटारीची दारे, खिडक्या पूर्ण बद करून कुपणाच्या आत गेल्यानतर कुपणाचे दरवाजे घट्ट बद करण्यात आले पार्कमध्ये फिरण्यासाठी मोटारचे सुदर रस्ते होते पार्कमध्ये मोटारनेच फिरावे लागते कारण बाहेर ५०–६० वनराजाचा समुदाय सभोवताली फिरत असता बाहेर पडताक्षणीच आपला चट्टामट्टा व्हायला वेळ लागला नसता ते वनराज म्हणजे भेडचाना फोटो काढण्यासाठी उत्कृष्ट मॉडेल्सच मिळाली होती त्यानी योग्य अशा ठिकाणी गाडी थांबवली अन् त्याचा कॅमेरा सटासट फोटो टिपू लागला आसपासचे दृश्य मोठे विलक्षण होते अत्यत मेहेनतीने जोपासलेले ते सिंह वनराज ह्या नावाला खरोखर शोभून दिसत होते भरपूर खायला मिळाल्यामुळे ते अगदी सुस्त होऊन पडले होते अन् आमच्याकडे ढुकूनसुद्धा पाहायला तयार नव्हते मला मोठी गमत वाटली भारताचा हा राष्ट्रीय प्राणी स्वतःच्या देशात बिचारा खगलेला, भुकेला, म्हातारा झालेला अन् मायदेशापासून हजारो मैल दूर असलेल्या ह्या देशात त्याची किती सुदर काळजी घेतली जाते प्राण्यांची एवढी उत्कृष्ट देखभाल येथे केली जाते, मग माणसेही मायदेश सोडून इथे अत्यत आनदात राहतात त्यात काय नवल आहे ?

मोटारीच्या आसपास वनराजाचे छोटेछोटे असख्य बछडे कळपाकळपाने मजेत खेळत बागडत होते एकमेकाच्या अगावर लोळत घेतलेले ते खोटेखोटे चावे, लुटुपुटीच्या लढाया, ती सर्व गमत बघून मजा वाटत होती एवढ्या मोठ्या संख्येने सिंह अगदी जवळून बघण्याची कल्पना रोमांचकारी वाटत होती. गाडीच्या काचा बद असल्यामुळे आम्ही अगदी निर्धास्त होतो कुठे का राहीनात, पण अत्यत सुखात वावरणारे ते सिंह बघून समाधान वाटले होते

'आपण बरोबर चाललो आहोत ना मीनाताई ? ' कलाने विचारलेल्या प्रश्नाने मी एकदम विचारतंद्रीतून जागी झाले व नकाशावर दाखविलेल्या अे-फोर ह्या रस्त्यावरूनच आम्ही चाललो होतो ह्याची खात्री करून घेतली गाडी वेगाने धावत होती नकाशावर दाखविलेली सर्व गावे एकामागून एक येत होती आम्ही तिघीजणी अगदी निर्धास्त होतो अन् एकाएकी काय झाले कुणास ठाऊक अे-फोर हा रस्ता कुठे गायब झाला तेच कळेना ! त्या रस्त्याच्या पाट्याच कुठे दिसेनाशा झाल्या काही क्षण गेल्यानतर रस्ता नक्की चुकला अशी खात्री वाटून मी कलाला म्हटले, "आपण गाडी थाबवून नकाशा बघू या " तरी पार्किंगची जागा सापडेपर्यंत चागले १५–२० मैल आणखीन पुढे आलो होतो नकाशाची बराच वेळ पाहाणी केल्यानतर लक्षात आले, की अे-फोर ट्वेंटी हा रस्ता सरळ बाथला जातो सर्वानुमते तोच रस्ता घ्यावा असे ठरले अन् मग त्या रस्त्याच्या शोध घेत आम्ही निघालो आता तो ४२० रस्ता लागेल, मग लागेल अशी आशा करीत आम्ही पुढेपुढे जात होतो पण त्या रस्त्याचा कुठे मागमूस लागेना ह्या ४२० रस्त्याने आम्हाला इतक्या हुलकावण्या दिल्या, की अनेक वेळा आम्ही रस्ता चुकलो अखेरपर्यंत तो रस्ता आम्हाला काही सापडला नाही नावाप्रमाणेच ४२० रस्ता निघाला तो !

बघता बघता ऑक्सफर्ड शहराच्या पाट्या दिसू लागल्या अन् मग आम्ही सगळ्याच हादरून गेलो बाथच्या अगदी विरुद्ध दिशेने आम्ही चाललो होतो बाथ राहिले दक्षिणेकडे अन् आमची स्वारी निघाली होती उत्तरेकडे ! रस्त्यात तर कुणी चिटपाखरू दिसत नव्हते वाटेत एके ठिकाणी मोटारीचा कारखाना लागला कारखान्याच्या बाहेर हजारो मोटारी उभ्या होत्या तरी माणसाचा शुकशुकाटच होता जरा पुढे रस्त्यावर भगव्या प्लास्टिकच्या पताकाची माळ लावली होती अन् बाजूलाच भगव्या रगाचे जाकिट घातलेला एक धिप्पाड माणूस फावडे घेऊन माती उकरत होता रस्त्यावर काम चालले असले की खुणेसाठी अशा भगव्या रगाच्या पताका लावतात काम करणारी माणसेही भगवेच कपडे घालतात हेतू हा, की मोटार चालविणाऱ्यांना लाबूनही ती माणसे दिसावीत

त्या माणसाजवळ आम्ही गाडी थांबविली अन् त्याला विचारले, ' कॅन यू प्लीज टेल अस द रोड टू बाथ ?" तो माणूस मख्खासारखा आमच्याकडे बघतच राहिला थोड्या वेळाने त्याच्या डोक्यात ट्यूब लाइट पेटला "ओ, बॅथ !" तो उद्गारला मनात म्हटले, "बाथ की बॅथ पत्ता मात्र बरोबर सांग ' पँटच्या खिशात दोन्ही हात अडकवून पोट पुढे काढून ओठाचा चंबू करून 'बॅथ, बॅथ' असे पुटपुटत तो एकदा डावीकडे, एकदा उजवीकडे बराच वेळ बघत राहिला एकाएकी साक्षात्कार झाल्यासारखा तो चीत्कारला, "ओ ऽ ऽ बॅथ ! गो स्ट्रेट, टर्न टु द राइट, टर्न टू द लेफ्ट, अगेन गो स्ट्रेट टिल यू कम टू रिंग रोड, देन टू द लेफ्ट ॲण्ड यू विल गो स्ट्रेट टू बॅथ !" काही न कळून मी विचारले, "पार्डन ?" पुन्हा त्याने तीच पढविलेल्या पोपटासारखी वटवट केली मला फक्त रिंग रोड एवढेच काहीतरी कळले होते लंडनमध्ये अनेक वेळा पत्ते शोधताना कुणाला पत्ता विचारला की ते असेच सांगत, ' टर्न टू द लेफ्ट, देन टू द राइट, गो स्ट्रेट, अगेन टु राइट, देन फिफ्थ बिल्डिंग ऑन द लेफ्ट" ही माणसे अशी पाठ केल्यासारखी धडाधड कशी काय पत्ते सांगतात देव जाणे! त्यांनी सांगितल्याप्रमाणे गेल्यावर पत्ते बरोबर सापडत येवढे मात्र खरे !

रिंग रोडचा पत्ता काढीत आम्ही निघालो रिंग रोड सापडला, पण तो अखेरचा 'लेफ्ट' काही केल्या सापडेना बराच वेळ गेला अन् निमा एकदम ओरडली, 'अय्या, तो मघाचाच पत्ता सांगणारा माणूस ! चल ग, काही तरीच काय! तो तर कधीच मागे राहिला, मी म्हणाले, अय्या, नक्की तोच तो, ' निमा ठासून म्हणाली अन् खरेच, थोड्या वेळाने आम्ही त्याच माणसाच्या अंगावरून पुढे गेलो ! म्हणजे रेसच्या घोड्याप्रमाणे आम्ही आपल्या त्या रिंग रोडच्या रिंगणातच सारख्या फिरत होतो 'आपण आता घरीच परत जाऊ या " निमा रडवेल्या स्वरात म्हणाली मलाही मनातून तसेच वाटत होते पण कला मोठी जिद्दीची मुलगी बाथ दाखविल्याशिवाय परत फिरायचे नाही असा तिने ठाम निश्चय केला होता

अन् अखेर बाथचा रस्ता सापडला ! काय विलक्षण आनंद वाटला आम्हाला! साहसी कथेतील राजपुत्राला गुलबकावलीचे फूल सापडल्यावर जसा विलक्षण आनंद झाला असेल ना, अगदी तस्साच !


बाथ शहरात शिरल्याबरोबर डोळ्याचे पारणे फिटले सार्‍या परिश्रमाचे चीज झाले दोन डोंगराच्या दरीमध्ये वसलेले हे गाव इतके रमणीय ठिकाण आहे दोन्ही बाजूला डोंगरावर पायर्‍यापायर्‍यांनी बांधलेली सुबक घरे त्यातून वळणे घेतघेत माथ्यापर्यंत गेलेले स्वच्छ सुंदर रस्ते सर्व शहरभर पसरलेल्या सुंदर बागा ते सर्वच दृश्य अगदी विलोभनीय होते

बाथ शहराचा इतिहासही रोमहर्षक आहे ज्युलिअस सीझर या महान रोमन सम्राटाने आपल्या राज्याचा विस्तार वाढविण्याच्या महत्त्वाकांक्षेने ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात इंग्लंडवर स्वारी केली होती तो बाथ शहरापर्यंत येऊन पोहोचला होता पण रोमन लोक फार काळपर्यंत इंग्लंड ताब्यात ठेवू शकले नाहीत ते इंग्लंड सोडून परत गेल्यानंतर त्यांच्या अस्तित्वाच्या खुणा फक्त बाथमध्येच शिल्लक राहिल्या बाथमध्ये खनिज द्रव्याने युक्त असे नैसर्गिक गरम पाण्याचे झरे आहेत त्याचे महत्त्व रोमन लोकांनी जाणले त्यांनी त्या ठिकाणी निरनिराळे सांध्यांचे रोग बरे करण्यासाठी स्नानगृहे बांधली त्या गावाचे नाव त्यांनी ''ॲक्वा सुलीस' असे ठेवले रोमन लोक गेल्यानंतर कित्येक वर्षे ही गरम पाण्याची स्नानगृहे अज्ञात राहिली १८ व्या शतकात रिचर्ड नॅश नावाचा एक सैन्यातला अधिकारी होता पुढे तो सैन्यातील नोकरी सोडून जुगार-सट्टा यावर आपला उदरनिर्वाह करू लागला त्याच्या छानछोकीच्या रहाणीमुळे व अत्यंत फॅशनेबल कपड्यामुळे तो 'ब्यू नॅश या नावाने ओळखला जाऊ लागला रोज नवीननवीन गोष्टींच्या शोधात असलेल्या साहसी ब्यू नॅशने बाथचा शोध लावला न्हाणीघरावरच त्याने मोठमोठे हॉल्स बांधले थोड्याच दिवसात बाथ हे श्रीमंत फॅशनेबल लोकांचे आरोग्य सुधारण्याचे, हवा पालटण्याचे अत्यंत आवडते ठिकाण बनले आजूबाजूला वस्ती होऊ लागली जेन ऑस्टिन, चार्लस डिकन्ससारखे सुप्रसिद्ध लेखक, लेखिका, राजघराण्यातील मोठमोठ्या व्यक्ती येथे येऊन राहू लागल्या इंग्लिश भाषेतील प्रसिद्ध कादंबर्‍यातून तर या गावाचे अनेक उल्लेख सापडतील बाथचा जनक ब्यू नॅश मात्र अत्यंत दारिद्र्यात अखेरचे दिवस घालवून मरण पावला

आता रोमन स्नानगृहांचे अवशेष जसेच्या तसे ठेवून त्याच्याभोवती अद्ययावत् इमारती बांधलेल्या आहेत मुख्य दरवाजातून आत शिरल्यानंतर

डाव्या हाताला असलेल्या जिन्याने उतरून तळघरात गेल्यानंतर स्वीडिश बाथ, सर्क्युलर बाथ, ग्रेट बाथ, अशी निरनिराळी स्नानगृहे आहेत ग्रेट बाथ ८० फूट लांब, ४० फूट रुंद व ६ फूट खोल आहे त्यात दोन हजार वर्षांपूर्वी जमिनीखाली बसविलेल्या शिशाच्या पाइपमधून एकसारखे पाणी वाहत असते गरम पाण्याच्या झऱ्याचे तपमान १२० अंश फॅरेनाइट असून दररोज त्यातून पाच लक्ष गॅलन पाण्याचा पुरवठा होत असतो इतकी वर्षे झाली तरी त्या पाणीपुरवठ्यात व पाण्याच्या तपमानात अजून तसूभरही फरक पडलेला नाही त्याकाळी रोमन लोक स्थापत्यशास्त्रात किती पुढे गेले होते हे रोमन बाथ पाहिल्यानंतर लक्षात येते

'रोमन बाथ्स्' बघून बाहेर पडतो तो लक्षात आले की संध्याकाळ झाली आहे म्हणून। बाथचा रस्ता शोधण्याच्या भानगडीत खाण्यापिण्याचे भान राहिले नव्हते तहानभूक विसरून 'बाथ'ला पोहोचण्याची आम्ही धडपड केली होती त्यामुळ आता पोटात भुकेचा डोंब उसळला होता खाद्य-गृहाचा शोध घेत आम्ही फिरू लागलो परंतु बहुतेक सगळी दुकाने व खाद्य-




गृहे बंद होत आली होती शेवटी आमच्या नशिबानं एक लहानसे खाद्यगृह उघडे सापडले गरमगरम कॉफी पोटात गेल्याबरोबर बरे वाटले खरे, पण

त्याबरोबर लक्षात आले, की दिवसभरच्या प्रवासाने सर्वांग शिणले आहे आता लागलीच पुन्हा यवढा प्रवास करून लंडनला परत जायचे आहे, या कल्पनेने अंगावर शहारा आला मी कलाकडे बघितले वाटले, की हिला बिचारीला मोटार ड्रायव्हिंगचा किती शीण आला असेल परंतु सध्याकाळी आपल्या बछड्याच्या ओढीने परतणाऱ्या गायीप्रमाणे कलाच्या चेहऱ्यावर व्याकुळता दिसू लागली होती मुलाच्या आठवणीने तिच्या हृदयात कालवा-कालव होत असल्याची मला जाणीव झाली अन् ताडकन् उठून आम्ही खाद्य-गृहातून बाहेर पडलो


बाथ शहर सोडण्याचे अगदी जिवावर आले होते अधार पडल्या-मुळे घराघरातून दिवे लागले होते त्या दिव्यांनी दरीच्या दोन्ही बाजूचे डोंगर असख्य काजवे पेटल्याप्रमाणे झगमगून फुलले होते ते दृश्य इतके विलोभनीय होते, की मला बाथमध्ये राहण्याचा मोह झाला घराघरांवर 'बेड ॲण्ड ब्रेक-फास्ट' अशा लागलेल्या पाट्या राहण्याचे आमंत्रणच देत होत्या! "निमा, आपण राहू या का?" मी निमाला म्हटले पण मग लक्षात आले, की आपण राहिलो तर कलाला एवढा प्रवास करून एकटीलाच परत जावे लागणार कसेबसे मन आवरून आम्ही बाथ शहर सोडले बाथचे ते विलोभनीय दृश्य दिसेनासे होईपर्यंत मी ते डोळ्यात साठवून ठेवण्याचा प्रयत्न करीत होते

# ९. लंडनच्या आजीबाई

बाथहून आम्ही लडनकडे परत चाललो होतो रात्रीमुळे गाडीचा वेग मदावला होता दिवसभराच्या प्रवासाने डोळे मिटू लागले होते निमा तर मागच्या सीटवर केव्हाच झोपून गेली होती लडनला पोहोचेपर्यंत दोन-तीन तास काढायचे होते कलाला ड्रायव्हिंग करायचे होते म्हणून तिला सतत जागे रहाणे भागच होते बराच वेळ आम्ही कुणीच एकमेकीशी बोलत नव्हतो मनात उगीचच निरनिराळ विचार येत होते थोडी झोप काढावी म्हणून मी डोळे मिटणार तोच कलाकडे माझे लक्ष गले वाटले, हिला चुकून एक क्षण झोप लागली तर ? पुढे काय होईल ह्या विचाराने अगावर काटा उभा राहिला काहीही करून हिला जागे ठवले पाहिजे ह्या विचाराने मी तिला सहज विचारले, "कला, तू प्रथम इग्लडला आलीस ते आठवते का तुला ?" "न आठवायला काय झाल ? मी मोठीच होते त्या वेळी" ती म्हणाली "मग तुझे वडील कसे आले इथे ?" मी विचारले "ते माझे वडील नव्हते" तिने सागितले

कलाच्या आई म्हणजे सुप्रसिद्ध आजीबाई बनारसे ह्याच्याबद्दल मी खूप ऐकले होते वाचले होते त्यामुळे त्याना भेटण्याची मला अतिशय उत्सुकता वाटत होती त्यामुळे लडनला त्याच्याकडे उतरण्याचा योग जमून आलो ह्याबद्दल मला अतिशय आनद झाला लडनच्या विमानतळावर मी उतरले

तेव्हा कलाचे यजमान प्रतापभाई मला घ्यायला आले होते  आपण आधी आजीबाईंनाच भटू या" असे म्हणून त्यानी आजीबाईंच्या घरापाशी गाडी थाबवली  देवदर्शनासाठी कुणी पाहुणेमडळी आली होती म्हणून आजीबाई खोलीत त्याच्या घरात असलेल्या मदिरात होत्या  पायातले बूट काढून आम्ही मंदिराचे दार उघडून हलकेच पाऊल आत टाकले मात्र, तिथल्या त्या सुदर, प्रसन्न वातावरणाने मनाला एकदम शात वाटले  पाहुणमडळीशी बोलत आजीबाई पाठमोऱ्या उभ्या होत्या  मला आलेली बघून त्या माझ्याकडे वळल्या "याऽऽ' म्हणून त्याना माझ ताडभरून स्वागत कल अन् मला माझी आईच भेटल्याचा भास झाला! जणू काही आमचे पूर्वजन्मीचे काहीतरी ऋणानुबध होते  मदिरात सुदर फुलाफुलांचा मखमली गालीचा अथरला होता  साईबाबा, हनुमान, राम-सीता, विठ्ठल-रखुमाई अशा निरनिराळ्या देवांच्या मूर्ती व तसबिरी अतिशय कलापूर्ण रीतीने मांडलेल्या होत्या  रगोबेरगी दिव्याची आरास केली होती  तेलातुपाच्या समया जळत



होत्या  सुगधी उदबत्त्यांचा सुवास वातावरणात पसरला होता  ह्या पार्श्वभूमीवर नऊवारी जरीकाठी साडी परिधान केलेली आजीबाईंची ठेंगणीठुसकी काळीसावळी मूर्ती तर साक्षात् विठाईमाऊलीच देहरूपाने प्रकट झाल्यासारखी दिसत होती  सभोवतालच्या साऱ्या देवताचा देवपणा, प्रेमळपणा आजीबाईंच्या रूपानेच समोर उभा राहिल्याचा भास झाला  अन् नकळत मी पुढे होऊन त्याच्या पाया पडले!

सध्याकाळ होत आली तशी आजीबाईंच्या घरी त्याच्या लेकी, नातवडे, स्नेहीमडळी जमायला लागली  त्या गजबजलेल्या वातावरणात मला अगदी

स्वत च्या घरी आल्यासारखे मोकळे वाटायला लागले सर्व मडळीना आग्रह करून पोटभर खायला घालण्याची आजीबाईंना मोठी हौस रोज कमीतकमी १५–२० माणसे तरी जेवायला असतातच एखाद्या अन्नपूर्णेच्या सिद्धहस्ताने पदर बाधून आजीबाई इतक्या मडळींचा स्वयपाक करतात अन् मोकळ्या सढळ हाताने ताटात भरपूर पदार्थ वाढताना त्याना अतिशय धन्यता वाटते आपण अगदी आकठ जेवून तृप्तीने ढेकर द्यावा तरी तुम्ही काहीच जेवला नाहीत ' ही त्याची प्रेमळ तक्रार असतेच

त्याच्या आदरातिथ्याला अन् पाहुणचाराला सीमाच नाही लडन-सारख्या परक्या प्रदेशात प्रथमच पाऊल टाकताना अनेक भारतीय विद्यार्थ्यांना हुरहुर वाटते, एकाकीपणा वाटतो, अनेक अडचणीना तोड द्यावे लागते अशाना तर आजीबाईचा केवढा आधार वाटत असेल ! त्यांच्या प्रेमळ आतिथ्यशील स्वभावामुळे त्यानी किती माणसे जोडली असतील, किती माणसाचे प्रेम सपादन केले असेल त्याला तर सीमाच नाही लडनमध्ये त्यानी एक ' मिनी ' महाराष्ट्रच निर्माण केला आहे लडनमध्ये थोडेफार भारतीय सस्कृतीचे जतन केले असेल तर ते आजीबाईंनीच त्याच्याकडील खास भारतीय पद्धतीच्या रहाणीला नाके मुरडणारे अनेक महाराष्ट्रीयन लोक आहेत पण ते स्वत च आपले खास भारतीय वैशिष्टच हरवून बसले आहेत

हे लोक नुसते नावालाच ' इडियन राहिले आहेत भारताचा उल्लेख ते ' इडिया ' म्हणूनच करतात जणू काही त्याचा ह्या देशाशी काही सबधच नाही ! धड इकडे ना तिकडे अशी यांची अवस्था झालेली असते त्यापेक्षा खास भारतीय पद्धतीने राहाणाऱ्या, वागणाऱ्या, मनमोकळ्या, साध्या, प्रेमळ आजीबाईच मला फार आवडल्या अशा या आजीबाईंविषयी अधिक जाणून घेण्याची मला अतिशय उत्सुकता लागली होती मुबईला प्रतापभाई आले असताना बोलताबोलता एकदोन वेळा त्यानी उल्लेख केला होता, की सुप्रसिद्ध गायक अन् सगीत दिग्दर्शक सुधीर फडके हे आजीबाईंच्या जीवनावर चित्रपट काढणार आहेत म्हणून चित्रपट काढण्याइतके कोणते नाट्य त्याच्या जीव-नात भरले असेल ह्या विचाराने माझी कल्पनाशक्ती भराऱ्या मारू लागली

पण माझ्या कल्पनेपेक्षा प्रत्यक्षातील आजीबाईंचे आयुष्य एखाद्या कादंबरी-पेक्षाही साहसपूर्ण अन् अद्भुत होते

अन् 'ते माझे वडील नव्हते' असे जेव्हा कला म्हणाली तेव्हा मी जरी काही बोलले नाही तरी माझी उत्सुकता कलाला समजली असावी म्हणून मोटार चालविता–चालविताच रंगात येऊन तिने मला आजीबाईंच्या जीवनाची कहाणी पहिल्यापासून सांगायला सुरुवात केली

वऱ्हाडातील यवतमाळजवळील एका खेडेगावात आजीबाई आपल्या पतीबरोबर शेतीचा व्यवसाय करीत असत त्यांना पाचही मुलीच झाल्या-मुळे त्यांच्या सासूच्या त्या नावडत्या बनल्या सासूने आपला सर्व जमीनजुमला दुसऱ्या मुलाला देऊन टाकला तरीसुद्धा खचून न जाता आजीबाई व त्यांचे पती ह्यांनी स्वतंत्रपणे बटाट्याचा व्यापार यशस्वीपणे चालविला मोठ्या मुलीचे लग्नही करून दिले परंतु त्यांचे सुख देवाला पाहवले नाही दुर्दैवाने आजीबाईंचे पती आजारी पडले अन् त्यातच त्यांचा दु:खद अंत झाला परंतु आजीबाई फार धैर्यशाली होत्या न डगमगता त्यांनी व्यापार पुढे चालविला अन् मुलींचा सांभाळ केला परंतु स्त्री ही कितीही शूर असली तरी तिला एकाकी आयुष्य जगणे असह्य होते तिलाही पुरुषाचा आधार लागतोच अन् आजीबाईंना योगायोगाने श्री बनारसे ह्यांचा आधार मिळाला हे गृहस्थ लंडनला उदबत्त्यांचा व्यापार करीत होते बरेच वर्षांपासून ते तिथे रहात होते त्यांना दोन मुलगे होते त्यांची प्रथम पत्नी निवर्तल्यामुळे पुन्हा लग्न करण्याच्या इच्छेने ते हिंदुस्थानात आले होते एका नातेवाइकाच्या मध्यस्थीने त्यांचा व आजीबाईंचा विवाह ठरला आजीबाईंनी संमती देताना त्यांना एक अट घातली, की आपल्याबरोबर आपल्या चारी मुलींचा सांभाळ त्यांनी केला पाहिजे त्याला श्री बनारसे यांनी मोठ्या खुशीने संमती दिली

लग्न झाल्यानंतर आजीबाईंनी लंडनला जायची तयारी केली अन् एकाएकी त्यांच्यावर आकाश कोसळले! बनारसे यांनी सांगितले, की मी फक्त तुमच्या एकाच मुलीला बरोबर नेऊ शकतो आजीबाईंना जबरदस्त धक्का बसला त्यांची परिस्थिती अतिशय दीनवाणी झाली पतीबरोबर गेले

नाही तर साऱ्या गावात नाचक्की होणार अन् बरोबर गेले तर त्या चिमण्या मुलांना इथे एकटे सोडून कसे जायचे ? ह्या विचाराने त्यांच्या हृदयात कालवा-कालव सुरू झाली अखेर मनावर दगड ठेवून त्यांनी कठोर अंतःकरणाने तीन मुलींची निरनिराळ्या ठिकाणी व्यवस्था केली व कलाला बरोबर घेऊन त्या पतीबरोबर लंडनला गेल्या त्या वेळी आपल्या मुलींना मागे ठेवून जाताना त्यांच्या मातृहृदयाला किती असह्य यातना झाल्या असतील त्याची कोणाही सहृदय माणसाला कल्पना येईल अशा अत्यंत विचित्र मनःस्थितीत लंडनला काही वर्षे घालविल्यानंतर पुन्हा आणखी एक जबरदस्त आघात झाला अन् तो म्हणजे त्यांच्या दुसऱ्या पतीचे निधन ! त्यानंतरची काही वर्षे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत, हलकीसलकी कामे करण्यात, काबाडकष्ट करण्यात गेली तसल्याही परिस्थितीत त्यांनी तिन्ही मुलींना लंडनला आणले अनेक वर्षांनी झालेली ती मायलेकींची भेट केवढी हृदयस्पर्शी झाली असेल ! वात्सल्याचा महापूर लोटला असेल एकमेकींच्या अश्रूंनी एकमेकींची मने धुऊन मोकळी झाली असतील

आजीबाईंच्या प्रेमळ, मनमोकळ्या स्वभावाने त्यांच्यावर भारतातून आलेले अनेक विद्यार्थी आईप्रमाणे प्रेम करीत ते त्यांना खूप दिलासा देत कित्येकांनी तर आजीबाईंनी स्वतःचे गेस्टहाऊस काढावे म्हणून पैशाचीही मदत देऊ केली पण त्या वेळी तरी त्यांना गेस्टहाऊस काढणे ही अशक्य कोटीतील गोष्ट वाटत होती गेस्टहाऊस काढायचे म्हणजे स्वतःचे घर पाहिजे त्याशिवाय फर्निचर, भांडीकुंडी वगैरे किती तरी गोष्टींची जरुरी होती एवढा पैसा कसा उभारावा ? पण आजीबाईंना अशक्य असे काही उरलेच नव्हते इतकी वर्षे आजीबाईंची सत्वपरीक्षा पाहणारा परमेश्वर एक दिवस अचानक एका अनोळखी इंग्लिश गृहस्थाच्या रूपाने त्यांच्या दारात येऊन उभा राहिला ! काहीही रक्कम डिपॉझिट न ठेवता त्याने आजीबाईंना २५ हुप लेन, गोल्डर्स ग्रीन-- हे घर मिळवून दिले जादुगाराने किमया करावी त्याप्रमाणे एका दिवसात आजीबाईंचे गेस्टहाऊस उभे राहिले त्यांच्यावर प्रेम करणारे अनेक विद्यार्थी तिथे रहायला आले अन् त्या घराला गोकुळाचे सौख्य, समाधान लाभले खरोखर आजीबाईंचे घर म्हणजे अक्षरशः एक

गोकुळच आहे स्वत च्या कुटुबीय मडळींनी सदा गजबजलेले आणि तितक्याच जिव्हाळ्याने बाहेरची माणसेही त्यात सामावलेली !

आजीबाईंची तपश्चर्या फार मोठी आहे त्यांच्या मुलीही तितक्याच कर्तबगार, आदरातिथ्यशील अन् प्रेमळ आहेत इतक्या साध्या, सरळ, निरक्षर स्त्रीने मायदेशापासून हजारो मैल लाब असलेल्या ह्या परक्या देशात जी कर्तबगारी, धैर्य दाखविले त्याला भारताच्या इतिहासात तरी तोड नाही ! पण ही सर्व परमेश्वराचीच किमया आहे, अशा श्रद्धेने आजीबाईंनी आपल्या घरात एका छोट्याशा मदिराची स्थापना केली लडनमध्ये रहाणारे अनेक भारतीय लोक ह्या मदिराला मोठ्या भाविकतेने भेट देत असतात कितीतरी धार्मिक विधी तिथे केले जातात अनेक वेळा आजीबाई यजमानपण करतात तिथल्या माणसामध्ये आजीबाईंनी जो जिव्हाळा निर्माण केला आहे, जे प्रेम निर्माण केले आहे, ते खरोखरच अद्वितीय आहे

मोटार वेगाने चालली होती आपल्या तेजस्वी आईची जीवनकथा मोठ्या अभिमानाने सागतासागता कलाला एक प्रकारची धुदी आली होती मीही भारावल्यासारखी तिच्या तोडातून पडणारे शब्दन् शब्द टिपत होते एकसारखी ती बोलत होती अन् मी अधाशासारखी ऐकत होते लडनला पोहोचेपर्यंत ते दोनतीन तास कसे गेले ते कुणालाच कळले नाही

वाटले, लडन इतक्यात येऊच नये मैलोन् मैल असाच प्रवास चालू रहावा, कलाने असेच आजीबाईंच्या अद्भुत रोमहर्षक जीवनातील किस्से सागत रहावेत, मीही ते तासन् तास ऐकत रहावेत अन् आयुष्यातील येणाऱ्या सकटांना धैर्याने सामोरे जायची त्यांच्या जीवनकथेपासून स्फूर्ती घ्यावी !

□ □

# १०. अखेरचा निरोप

लडनच्या विमानतळावरून बाहेर पाऊल टाकले अन् हवेतील विलक्षण गारठ्याने शरीर अगदी काकडून गेले अगात एकावर एक गरम कपडे होते, तरीसुद्धा त्यातून अगाला तीक्ष्ण सुयाप्रमाणे थडगार वारे बोचत होते हाता-पायाची बोटे काळीनिळी पडून सवेदनारहित झाल्यासारखी वाटत होती

आजीबाईंच्या घरात ऊब मिळाल्यावर जरा बरे वाटले शरीराला आलेला थकवा थोडाफार गेल्यासारखा वाटला परतु मनाला आलेला तो विलक्षण थकवा-- तो मात्र जास्तच वाढला मन औदासिन्याने झाकळून गेले आपले घर, आपली माणसे हजारो मैल दूर राहिली या कल्पनेने नुसते बचैन करून सोडले

आतापर्यंत पाश्चिमात्य देशाबद्दल एवढे ऐकले होते, वाचले होते, त्यामुळे ते देश आपल्याला कधी बघायला मिळतील या उत्कट इच्छेने मी भारावून गेले होते एखाद्या गोष्टीची अनिवार्य ओढ लागावी, त्याचाच एकसारखा ध्यास लागावा, कुठली तरी अज्ञात शक्ती आपल्याला तिकडे खेचून नेत असावी, अशी माझी अवस्था झाली होती वाटेत अनेक अडचणीचे डोंगर उभे होते पण त्याची पर्वा वाटत नव्हती उलट जितक्या अडचणी आल्या तितका प्रवासाचा निर्धार पक्का झाला अडचणीना तोंड द्यायची प्रतिकारशक्ती जास्तच वाढली उत्साहाला तर उधाण आले घरच्या मडळीचे प्रोत्साहन होते, सपूर्ण सहकार्य होते, त्यामुळे पाठीमागची कसलीच काळजी नव्हती निर्धास्त मनाने प्रवासाची पूर्वतयारी केली होती

निघण्याची तारीख जवळ येत चालली तसतशी मनात हुरहुर उगीचच वाटू लागली नाहीनाही त्या शंका मनात येऊ लागल्या इतक्या लांबचा प्रवासाचा बेत उगीचच आखला असे वाटू लागले पण दुसऱ्याच क्षणी मी स्वत:ची समजूत घातली, की आयुष्यात वारंवार अशी संधी प्रयत्न करूनही येत नसते हीच वेळ आहे आलेल्या संधीचा फायदा घेण्याची दीड-दोन महिने बघताबघता निघून जातील मुलानाही आतापासून स्वतंत्रपणे रहायला शिकविले पाहिजे एकमेकात फार गुतून रहाणेसुद्धा पुढच्या आयुष्याच्या दृष्टीने चागले नाही

मनाची इतकी तयारी झाली तरी आईची मात्र एकसारखी काळजी वाटत होती मी एकटीने इतक्या लांबचा प्रवास करणे तिला फारसे पसत नव्हते. तशी लहानपणापासूनच तिने माझी फारच काळजी केली होती सतत लहान-सहान गोष्टीवरून काळजी करणे हा तिचा स्वभाव होता त्यात अलीकडील दोन-चार वर्षांपासूनच्या तिच्या दुर्धर दुखण्यामुळे तिचा स्वभाव फारच हळवा झाला होता एक दिवस जरी तिला भेटायला जायला जमले नाही किंवा कामाच्या गडबडीत तिला फोन करायचा राहून गेला तरी ती काळजी करा-यला सुरुवात करी त्यामुळे मी माझा प्रवासाचा बेत भीतभीतच तिच्या कानावर घातला

"कशाला तू एकटी जातेस ?" म्हणून तिने चितेच्या स्वरात विचारले "आई, मी एकटी जात नाही निर्मला पण बरोबर आहे " मी तिची समजूत काढीत म्हणाले, "शिवाय सर्व ठिकाणी आपली ओळखीची माणसे आहेत तू काही काळजी करू नकोस तुझी नाही का किती इच्छा होती युरोपला जायची ? तुला कधी जायला मिळाले नाही म्हणून मला तरी जाऊ दे " "हो ना पपानी मला कधी नेले नाही " मनात दबून राहिलेली तिची नाराजी बाहेर पडली

"तुझी तब्येत चागली नव्हती ना, म्हणून नेले नाही पपानी तुला नसता सहन झाला एवढा लाबचा प्रवास " एखाद्या लहान मुलाला समजवावे तसे मी तिला समजावले 'म्हणूनच म्हणते, अगात जोम आहे, उत्साह आहे तोपर्यंत मला जाऊन येऊ दे " यावर ती काहीच न बोलता ओठ घट्ट आवळून

गप्प राहिली मनातून ती नाराजच आहे हे मी ओळखले अन् मला वाटले उगीच मी हा प्रवासाचा बेत आखला आता इतकी तयारी झाल्यानंतर पुन्हा रद्द करणेही शक्य नव्हते माझी द्विधा मनःस्थिती नानीने ओळखली मला धीर देत ती म्हणाली, "अग, मी आहे ना तिच्याजवळ तू काही काळजी करू नकोस आपण कितीही मोठ्या झालो तरी तिला वाटते, की आपल्या मुली अजून लहानच आहेत तू अगदी निश्चिंत मनाने जा ' तिच्या या शब्दांनी मला खूप बरे वाटले

निघायच्या दिवशी सकाळी मी आईचा निरोप घ्यायला गेले मी कशी जाणार, कुणाकडे उतरणार वगैरे अगदी बारकाईने तिने चौकशी केली "हॉटेलमध्ये एकटी राहू नको तब्येतीला जप पत्र पाठव वगैरे सूचनाही पुन्हापुन्हा ती देत राहिली तास दीड तास कसा गेला ते कळलेच



नाही अखेर मी जायला उठले, तिला वाकून नमस्कार केला अन् तिच्या अंगा-वरून हात फिरवून म्हटले, "येते मी आई !" अन् एकाएकी काय झाले कुणास ठाऊक तिने एकदम माझे हात घट्ट धरले तिचे सर्वांग हुंदक्यांनी गदगदून निघाले डोळ्यांतून अश्रूंचा पूर लोटला

"मिने, अग, तू कशी मला सोडून जातेस ? इतके दिवस कधी कुठे गेली नाहीस मला सोडून मला आता तुझ्यावाचून करमणार नाही तिचे ते हृदयद्रावक शब्द ऐकून मी क्षणभर अवाक् झाले समजू लागल्यापासून मी आईला अनेक अग्निदिव्यातून तावूनसुलाखून बाहेर पडताना अनेक वेळा

पाहिले होते स्वतःच्या खाजगी आयुष्यात, शैक्षणिक व्यवसायात अन् नंतर वृद्धावस्थेतही तिच्यावर अनेक भीषण संकटे आली परंतु त्या प्रसंगी तिला क्षणभरसुद्धा डगमगलेली, बिथरलेली कधीच पाहिली नाही आमच्या-समोर तिने डोळ्यातून एक टिपूस कधी गाळलेले पाहिले नाही. ती जणू धैर्याचा साक्षात मेरुमणी होती तिच्या नाजुक गोऱ्यापान अन् कोमल स्त्री-देहात एवढा कणखरपणा, पुरुषी कठोरपणा कुठून आला होता देव जाणे! पण तशी ती नसती तर ती केव्हाच पिचून झिजून गेली असती एखाद्या पुरुषानेसुद्धा शिकावा एवढा खंबीरपणा तिच्या अंगात होता आयुष्याच्या अखेरच्या दिवसांत तिच्यावर रोगांनी केलेले आक्रमण तर फार भयकर होते मधुमेहासारख्या दुर्धर रोगाने तिचे शरीर पोखरून टाकले होते गँगरिन झाल्यामुळे तिचे दोन्ही पाय कापून टाकायची वेळ आली, तेव्हा तर आमच्या जिवाचे नुसते पाणीपाणी झाले केवळ कल्पनेनेच काटा उभा राहिला विलक्षण बेचैनीतच ते दिवस गेले ऑपरेशनमधून ती परत उठणे अशक्य वाटत होते आम्ही सर्वांनी तिची आशाच सोडली होती पण तिची जगण्याची इच्छा-शक्ती इतकी विलक्षण जबरदस्त होती, की त्या जिवावरच्या संकटातूनही ती सुखरूप बाहेर पडली तिच्या त्या प्रबळ इच्छाशक्तीवर माझा पूर्ण विश्वास होता म्हणूनच मी हा प्रवासाचा बेत आखला होता अन् आता तिचा निरोप घेण्याच्या क्षणी तिला असे अश्रू गाळताना पाहून माझे सारे धैर्य, सारे अवसान, गळून पडले मी व्याकुळपणे तिला म्हटले, "आई, रडू नकोस ग तू तूच आम्हाला वेळोवेळी धीर देत आलीस अन् आता तूच का रडतेस? अग, मी लवकर येईन दिवस कसे भरभर जातील बघ" तिच्या कुशीत मान घालून तिच्या अंगावरून हात फिरवीत मी कितीतरी वेळ तशीच खिन्नपणे पडून होते

थोड्या वेळाने ती शांत झाली अन् रुमालाने डोळे पुसून म्हणाली, "जा तू काळजी घे मला पत्र पाठव" तिचा निरोप घेऊन जड पावलाने मी बाहेर पडले पण माझे मन मात्र तिच्यापाशीच घुटमळत राहिले

विमानतळावर घरचे सर्व प्रियजन हसतमुखाने निरोप देत होते— "खूप फिरून ये, मजा कर. घरची काही काळजी करू नकोस निश्चिंत मनाने जा" अशा शब्दांत धीर देत होते निघण्याची वेळ जवळ येऊ लागली तशी

प्रिया मात्र मला जास्तजास्तच बिलगत होती अखेर कस्टम वगैरे विमानतळा-वरचे उपचार पार पाडण्यासाठी जड अंत करणाने सर्वांचा निरोप घेऊन मी काचेपलीकडील दालनात गेले अन् मग मला एकदम आपल्या प्रियजनांपासून दूर गेल्याची जाणीव व्हायला लागली विमानाजवळ घेऊन जाणाऱ्या कोचमध्ये बसण्यासाठी मी बाहेर आले अन् वरच्या सज्जाकडे नजर टाकली अंधारा-मुळे कुणाचेच चेहरे दिसत नव्हते परंतु प्रियाने मारलेल्या " आईऽऽ आईऽऽ " या हाका एकसारख्या ऐकू येत होत्या तिला शोधण्यासाठी माझे डोळे भिरभिर फिरू लागले तिला पुन्हा एकवार हृदयाशी धरण्याची तीव्र इच्छा उत्पन्न झाली पण आता ती कितीतरी दूर राहिली होती परत मागे फिरणे शक्य नव्हते

विमानाने आकाशात उड्डाण केले मात्र, किंचित शांत होत आलेल्या मनात पुन्हा खळबळ माजली जमिनीचा आधार सुटल्यानंतर शरीराच्या होणाऱ्या त्या विलक्षण अवस्थेचा पहिलाच अनुभव ज्यांना आला असेल त्यांनाच त्या अवस्थेची कल्पना येईल मला तर मनाचाही आधार सुटल्या-सारखे झाले होते अशा अस्वस्थ मनःस्थितीतच प्रवासाला सुरुवात झाली

लंडनला उतरल्यानंतर विमानतळावर प्रतापभाई मेहेता— आजी-बाईंचे जावई— न्यायला आलेले पाहून खूपच धीर आला १५–२० दिवसा-पूर्वीच त्यांची मुंबईला भेट झाली होती इंग्लंडचा व्हिसा मिळण्यासाठी त्यांनी मला खूप मदत केली होती लंडनला आल्यानंतर त्यांच्याच घरी उतरण्याचे त्यांनी मला आग्रहाचे निमंत्रण दिले होते

मुंबईहून निघताना मी त्यांना केबल केली होती लंडन जसजसे जवळ येऊ लागले तशी माझ्या मनात शंका यायला लागली, की ती केबल प्रताप-भाईंना मिळाली नसली तर ? अन् ते विमानतळावर घ्यायला आले नाहीत तर येवढ्या मोठ्या शहरात आपण एकटीने त्यांचे घर कसे शोधून काढायचे ? निर्मलेला आयत्या वेळी महत्त्वाचे काम निघाल्यामुळे ती माझ्याबरोबर येऊ शकली नव्हती ती आठ दिवसांनी लंडनला येणार होती विमानतळावर प्रतापभाईंना पाहिले अन् मी निर्धास्त झाले

आजीबाईंच्या प्रेमळ सहवासात अन् आदरातिथ्यात १५–२० दिवस कसे निघून गेले ते कळले पण नाही सकाळपासून सध्याकाळपर्यंत भटकण्याचे कार्यक्रम रोजचेच चालू असल्यामुळे घरची काळजी करायला पण वेळ मिळत नव्हता लडनच्या 'कॉसमॉस' ह्या प्रवासी कपनीतर्फे मोटरकोचने युरोपला निघणाऱ्या १६ दिवसांच्या प्रवासाची सफर आम्ही आधीच ठरवलेली होती निघण्याची तारीख जवळ येऊ लागली तशी निमा व मी लहान मुलीसारख्या उतावळ्या झालो

निघायचा दिवस उजाडला आम्ही आजीबाईंचा निरोप घ्यायला गेलो अन् लक्षात आले, की त्याना सोडून जाणे ही गोष्टसुद्धा कठीण होती

मी लडनला खूप फिरले खूप पाहिले, अगदी डोळ्याची आकठ तृप्ती होईपर्यंत पण मनाचे समाधान झाले, मनाला शाती लाभली, आईच्या प्रेमाची उणीव भरून निघाली ती फक्त आजीबाईंपाशीच ! अन् लडन सोडताना आणखी एक मन मागे राहिले

"पुन्हा या हं लडनला पत्र पाठवा आजीबाईंनी अगदी आईसारखेच बजवजावून सागितले अश्रुपूर्ण नेत्रानी मी त्याचा निरोप घेतला

"मीनाताई, मुबईला जाताना परत इथे येऊनच जा, कलाने पुन पुन्हा आग्रहाने बजाविले आजीबाईंच्या या हुषार, तरतरीत, प्रेमळ मुलीने माझ्यावर बहिणीसारखी माया केली तिचा व तिच्या तीन खट्याळ बच्चांचा निरोप घेऊन मी व निमा प्रतापभाईंबरोबर व्हिक्टोरिया स्टेशनवर आलो इथून आमची 'कॉसमॉस टूर'ची खास आगगाडी सुटणार होती सकाळी ९ ची गाडी होती घरून निघतानिघता कसा उशीर झाला ते कळले नाही गाडी सुटायच्या वेळेपर्यंत आम्ही कसेबसे धावपळ करीत प्लॅटफॉर्मवर आलो अन् बॅगा भराभर आत टाकून गाडीत चढतो न चढतो तेवढ्यात गाडी सुरू पण झाली ! मग लक्षात आले, की आपण प्रतापभाईंचा धड निरोपसुद्धा घेतला नाही गाडी स्टेशनबाहेर पडली अन् मला एकदम एकाकी वाटायला लागले आजीबाई व त्याच्याकडील सर्व मडळींनी थोड्याच दिवसात इतका जिव्हाळा उत्पन्न केला होता, की त्याना सोडून जाताना जिवाची विलक्षण

कालवाकालव झाली डोळ्यात अश्रू उभे राहिले पुन्हा आईची तीव्रतेने आठवण उचंबळून आली

लंडनच्या वास्तव्यात मी आईला एकसारखी पत्रे पाठवीत होते सर्व हकीगत कळवत होते घरूनही पत्रे येत होती अन् त्यातून आईची खुशाली कळून खूप बरे वाटत होते १४ एप्रिलपासून आमची युरोपची सोळा दिवसांची सफर सुरू झाली आगगाडीने डोव्हरला पोहोचल्यानंतर बोटीतून इंग्लिश खाडी ओलांडून आम्ही बेल्जियममधील ऑस्टेंड या बंदराला उतरणार होतो व तिथून कॉसमॉस कंपनीच्या मोटर कोचने आमचा युरोपातील सहा देशांचा दौरा सुरू होणार होता रोजचाच प्रवास असल्यामुळे या सोळा दिवसांच्या कालावधीत घरचे एकही पत्र मिळणे शक्य नव्हते सोळा दिवस घराचा संबंधच तुटणार होता त्यामुळे तो विरहकाळ अगदी मोठा आ वासून पसरल्या-सारखा वाटत होता

ऑस्टेंडपासून आमचा बसचा प्रवास सुरू झाला दिवसभर ४००—५०० मैल प्रवास करून रात्री मुक्कामाला मोठ्या शहरात जायचे दोन दिवस तिथली प्रेक्षणीय स्थळे बघायची अन् पुन्हा सकाळी दुसऱ्या मुक्कामाला प्रयाण करायचे, असा आमचा कार्यक्रम अगदी बांधलेला होता सुरुवातीला नवीन सहप्रवाशांच्या ओळखी करून त्यांच्याबरोबर विचारांची देवाणघेवाण करण्यात, हिंडण्या-फिरण्यात कसे दिवस गेले ते कळले नाही तेवढ्या धाई-गर्दीतसुद्धा मी रोज आईला पत्र लिहीत होते तिच्याकडून काहीच उत्तर मिळणार नव्हते हे माहीत असल्यामुळे पत्र लिहिताना खूपच अस्वस्थ वाटत होते पण तिला तरी माझी खुशाली कळेल एवढेच समाधान होते

२२ एप्रिलला आम्ही व्हेनिसला पोचलो त्या रात्री व्हेनिसच्या सुप्रसिद्ध कालव्यातून गोंडोलामध्ये बसून सफर केली गोंडोलातल्या त्या गायकाच्या इटालियन गाण्याच्या करुणरम्य सुरांनी हृदयातील तारा छेडल्या गेल्या, अन् मनाची अस्वस्थता वाढतच गेली घरच्या मंडळींच्या, आईच्या आठवणी उचंबळून आल्या

दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर मस्तक सुन्न झाले होते मन ठिकाणावर नव्हते काय होत आहे तेही कळत नव्हते इतकी अस्वस्थता आजा-पर्यंत आयुष्यात कधीच जाणवली नव्हती सर्व काही अनाकलनीय होते

सकाळी आम्ही व्हेनिस शहराचा फेरफटका मारायला बाहेर पडलो ग्रँड कॅनाल ओलांडून आम्ही पलिकडच्या जुन्या व्हेनिसमध्ये उतरलो अन् नागमोडी वळणे घेत जाणाऱ्या गल्ल्यामधून सेंट मार्को स्क्वेअरच्या दिशेने निघालो आमच्याबरोबर अल्बर्टो हा किंचित स्थूल अन् मध्यम वयाचा मार्ग-दर्शक होता

सेंट मार्को चर्चमध्ये ईस्टरनिमित्त प्रार्थना सुरू होत्या म्हणून आल्बर्टोने आम्हाला आवाज न करता एकेकाला शांतपणे चर्चमध्ये जायला सांगितले चर्चचा सोन्याने मढविलेला वजनदार दरवाजा ढकलून मी हलकेच आत पाऊल टाकले अन् आतमधल्या वातावरणाने भारावून क्षणभर स्तब्ध उभी राहिले उत्तम करारा जातीच्या संगमरवरी दगडाने बांधलेले ते भव्य चर्च नखशिखांत सोन्याच्या वेलबुट्ट्यानी भरले होते एका दृष्टिक्षेपातच मी ते सर्व पाहून घेतले ऑर्गनच्या सोन्याच्या भव्य नळ्यामधून सबंध चर्च व्यापून टाकणारे घनगंभीर सूर बाहेर पडत होते त्या सुरात सूर मिसळून वृद्ध स्त्रीपुरुषांचा समुदाय गुडघे टेकून, हात जोडून मनोभावे प्रार्थना म्हणत होता त्या सर्वांच्या नजरा समोरच्या क्रॉसवरील ख्रिस्ताच्या नजरेकडे लागल्या होत्या ख्रिस्ताचा पुनरुत्थानाचा तो दिवस होता ऑर्गनच्या भरदार सुरानी अंत करणातील उदात्त भावना उचंबळून आल्या त्याग, प्रेम, करुणा ह्या सर्व भावना एकवटलेल्या ख्रिस्ताच्या चेहऱ्याकडे मी एकाग्र चित्ताने बघू लागले कुठेतरी कसलीतरी जाणीव जागृत होत होती मी हात जोडून निश्चलपणे उभी राहिले हा त्याग मी पूर्वी पाहिला आहे, हे प्रेम मी पूर्वी अनुभवलं आहे, ही नजर ओळखीची वाटत होती पण कुठे, कधी, केव्हा पाहिली ते समजेना, उमजेना माझ्या डोळ्यातून नकळत अश्रू ओघळू लागले आतापर्यंत कधीही न घेतलेला हा अनुभव होता इतकी मी परमेश्वराच्या ठिकाणी कधीच एकरूप झाले नव्हते एकीकडे ऑर्गनच्या सुरानी शांत वाटत होते, तर दुसरीकडे स्वत भोवती असलेले कवच तोडून फोडून फेकून द्यावे, मन मोकळे करावे अशी एक अस्वस्थता बेचैन करून सोडत होती सर्वच काही अनाकलनीय, गूढ वाटत होते

असाच किती वेळ गेला कुणास ठाऊक ! निघायची वेळ झाली होती पुन्हापुन्हा येशू ख्रिस्ताच्या मूर्तीकडे वळून बघत, अन् ऑर्गनचे करुण स्वर

मनात साठवत नाइलाजाने मी चर्चच्या बाहेर पाऊल टाकले काही बोलू शकत नव्हते, कुणाला काही सागू शकत नव्हते

दुपारी व्हेनिस सोडले, अन् आम्ही व्हिएन्नाच्या दिशेने निघालो सध्याकाळी साडेपाच वाजता आम्ही हमरस्त्यावरील एका मोटेलपाशी पोचलो त्या रात्री आमचा तिथेच मुक्काम होता आसपास बघण्यासारखे काहीच नव्हते जेवणे लौकरच आटोपली होती

आमचे सहप्रवासी नाचगाण्यात दग होते तिथे मन रमेना म्हणून मी व निमा दोघीजणी वरती खोलीत आलो अन् अथरुणावर अग टाकले दिवसभराच्या श्रमामुळे निमा एका क्षणात गाढ झोपी गेली मी डोळे मिटून झोपण्याचा प्रयत्न केला, पण झोप लागेना उठून खिडकीचा पडदा बाजूला करून मी बाहेर पाहिले भोवतालच्या ओसाड माळरानात भयाण शांतता पसरली होती मागच्या बाजूला उंच पर्वतांची रांग होती तिच्या काळ्या सावल्या लाबवर पसरल्यासारख्या दिसत होत्या हवेत विलक्षण गारठा पडला होता एकाएकी त्या माळरानावरून कुणीतरी मला हाका मारीत आहे असा भास झाला मी क्षणभर भयभीत झाले अन् अथरुणावर येऊन पडले पुन्हा त्याच अस्वस्थतेने मला व्यापून टाकले काटेरी मुकुट घातलेला येशू ख्रिस्ताचा तो कारुण्यमय चेहरा डोळ्यासमोर तरळू लागला डोक्यात एकसारखे ते ऑर्गनचे सूर घुमू लागले मनातील अस्वस्थता घालविण्या-साठी काहीतरी केले पाहिजे असे वाटून मी उठले व पलगाजवळचा टेबललँप लावला बॅगेतून कागद अन् पेन बाहेर काढले आणि भराभर पत्रे लिहायला घेतली आईला, आजीबाईना अन् आणखी कुणाकुणाला— एकसारखी पत्रे लिहीत सुटले लडन सोडल्यापासून आजीबाईंना पत्र पाठवायला जमले नव्हते त्यांची मला आता एकाएकी तीव्रतेने आठवण येऊ लागली कुणाच्य तरी मायेची मला या क्षणी खूप गरज भासू लागली आईच्या आठवणीने माझा जीव व्याकूळ झाला तिला पत्र लिहिल्यानतर मी शात झाले अन् नतर केव्हा तरी मी निद्रेच्या आधीन झाले

२६ एप्रिल सकाळी पश्चिम जर्मनीतील रेगेन्सबर्गपासून बॉनपर्यंत प्रवास सुरू झाला प्रवासातील हा शवटचा टप्पा होता एकीकडे प्रवास सपत

आला म्हणून एक प्रकारची हुरहूर वाटत होती, तर दुसरीकडे कधी एकदा हा प्रवास संपतो, कधी एकदा घरचे पत्र मिळते असे वाटत होते अशा द्विधा मन स्थितीतच पुढचा प्रवास सुरू झाला दुपारी चहापानासाठी रुडेशाईम ह्या छोट्या गावात आमची बस थांबली निरनिराळ्या प्रकारच्या उत्तम वाइन्स साठी ऱ्हाइन नदीवरचे हे देखणे, टुमदार गाव प्रसिद्ध आहे एका बाजूला ऱ्हाइन नदीचा प्रशस्त प्रवाह अन् दुसऱ्या बाजूला हिरव्यागार टेकड्यांची रांग व त्यामधल्या अरुंद चिंचोळ्या पट्ट्यात रुडेशाईम वसले आहे रूडेशाईम ते बॉन ह्या प्रवासात ऱ्हाइन नदी सतत साथ करीत होती जर्मनीतील खरी समृद्धी येथेच पाहायला मिळत होती नदीच्या दोन्ही तीरावर ओळीने उभ्या असलेल्या टेकड्या नखशिखान्त हिरव्यागार द्राक्षाच्या मळ्यांनी आच्छादून गेल्या होत्या वेलीवर लटकणाऱ्या निळ्याजांभळ्या टपोऱ्या द्राक्षाच्या ओथंबणाऱ्या रसाने काठोकाठ भरून फेसाळून वाहणाऱ्या देवसुरेसारखी ती गहिरी, निळी ऱ्हाइन नदी ! कितीही पाहिली तरी मनाची तृप्ती होत नव्हती

बॉनला रात्री पोचल्यानंतर जेवणं आटोपून आम्ही सर्वजणी ऱ्हाइनच्या तीरावर खूप भटकलो दोन्ही काठावर चमचमणाऱ्या दिव्यांची पाण्यात पडलेली लक्षलक्ष प्रतिबिंबे डोळे भरून पाहिली तृप्त मनाने अन् थकलेल्या देहाने अंथरुणावर अंग टाकले अन् प्रवासाचे फक्त दोनच दिवस राहिले या समाधानात डोळे मिटले

सकाळी उठून ऱ्हाइन नदीचे शेवटचे दर्शन घ्यावे म्हणून मी खिडकीतून बाहेर डोकावले तर ऱ्हाइन नदी दाट धुक्याच्या पडद्याआड केव्हाच अदृश्य झाली होती ! जणू काही ती त्या ठिकाणी नव्हतीच ! आभाळाला तर नुसती गळतीच लागली होती निराश मनाने मी बॅग उचलून खाली उतरले आणि बसमध्ये बसले त्या दिवशी आमच्या बसमधले सहप्रवासीही गप्प होते उत्साहाची मूर्तिमंत पुतळी मॉली– ती तर डोळे मिटून स्वस्थ पडली होती दूरवर कुठेतरी चर्चच्या दु खनिदर्शक घंटेचे सावकाश ठोके पडत होते ऐकताच माझ्या छातीत धस्स झाले हे लक्षण काही बरे नाही असे वाटले दूरवरच्या एका हिरव्या कुरणातील भिजलेल्या नागमोडी वाटेने लाल रेनकोट, टोपी घातलेले एक मूल एकटेच शाळेला चालले होते त्याला पाहून माझ्या हृदयात कालवा-

कालव झाली व्याकुळपण मी माझे मस्तक मागे टेकले आता पुढचा प्रवास नकोसा झाला होता बाहेर बघण्याची इच्छा होत नव्हती माझ्यातील अस्वस्थतेची जाणीव निमाला झाली "होमसिक झालात ना मीनाताई ?" तिने माझी चेष्टा करायचा प्रयत्न केला "छ, होमसिक कुठली ?' तिला मी म्हटले घरातून निघताना दीर्घकाल मुलाचा विरह सहन करावा लागणार या मनाच्या पूर्ण तयारीनेच मी बाहेर पडले होते पण मग ही अस्वस्थता कशाची होती ? कदाचित कसल्यातरी आगामी संकटाची पूर्वसूचना तर नव्हती ? काहीतरी भीषण घडणार आहे, मनाला कसलातरी विलक्षण हादरा बसणार आहे अशी जाणीव वारवार होऊ लागली ब्रुसेल्सला पोचताक्षणी बासलची गाडी पकडायचा निश्चय मी मनाशी केला कारण बासलला मधू व इंगेकडे पोचल्यावर घरचे पत्र मिळणार होते, सर्वांची खुशाली कळणार होती, अन् माझी अस्वस्थता अनाठायी ठरणार होती नव्हे तशी ती ठरावी यासाठी मी मनोमन प्रार्थना करीत होते ब्रुसेल्सच्या नॉर्ड स्टेशनवर बसलला जाणाऱ्या आगगाडीत बसताना पुन्हा एकदा आईला पत्र लिहिले

आगगाडीत आम्हाला छोटासा कूपे मिळाला होता पण रात्रभर कस्टम्सचे अधिकारी पासपोर्ट तपासणीसाठी वारवार दार ठोठावीत होते त्यामुळे झोपेची आशा मी सोडून दिली पहाटे ५–४५ ला बासल स्टेशन आले अन् आम्ही भराभर बॅगा बाहेर फेकून प्लॅटफॉर्मवर उड्या मारल्या कळविल्या-प्रमाणे आम्हाला न्यायला समोरून मधू येत होता त्याला पाहून माझा जीव भांड्यात पडला

घरी इंगे आमची वाटच पाहात होती भेटताक्षणीच आम्ही दोघींनी एकमेकींना मिठ्या मारल्या तिची माझी प्रत्यक्ष अशी पहिलीच भेट होती इतके दिवस आमची पत्रमैत्री चालू होती पण भेटल्यावर असे वाटले की, आमची जन्मजन्मान्तरीची मैत्री आहे

घरून एक दोन पत्रे आली होती ती मी अधाशासारखी फोडून वाचली ९–१० दिवसांपूर्वी पाठवलेली पत्रे होती ती

सर्वांची खुशाली वाचून मला खूप बरे वाटले व मोकळ्या मनाने आम्ही गप्पा मारायला सुरुवात केली

२०८२०
३१-५-६

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून वासलच्या आसपासची ठिकाणे बघण्यासाठी मी, निमा, मधू बाहेर पडलो खाली उतरल्यावर जिन्यापाशी असलेल्या पत्रपेटीत भारताचा शिक्का असलेली पत्रे दिसत होती, ती बघून मला खूपच आनंद झाला एक सुधाकराचे व दुसरे नानीचे होते पत्र फोडणार इतक्यात निमा म्हणाली, "गाडीतच वाचा की सावकाश" "हो, घरचे पत्र आहे म्हणजे काय बोलायची सोय नाही तिला मागेच बसू दे सावकाश पत्र वाचत !" मधुने माझी चेष्टा केली मी त्या चेष्टेने खुलून जाऊन मागच्या सीटवर आरामात अंग टाकले आणि सावकाश पत्रे उघडली अन् अन् पत्रातल्या मजकुरावर विश्वासच बसेना ! माझी प्रिय आई २३ एप्रिलला हे जग सोडून गेली होती ही बातमी वाचून माझ्या मनाला जबरदस्त धक्का बसला हृदय बंद पडते की काय असे वाटू लागले हातापायाला कापरे सुटले काळजातून दु:खाचे उमाळे बाहेर पडण्यासाठी धडपडू लागले अन् एका क्षणात सगळ्या गोष्टींचा उलगडा झाला सबंध प्रवासात मला वाटणाऱ्या अस्वस्थतेचा अर्थ कळला ! सेंट मार्को चर्चमध्ये अचानकपणे बांध फोडून बाहेर पडलेल्या अश्रूंच्या भावना कळल्या


येशू ख्रिस्ताचा करुण, त्यागमय, प्रेमळ चेहरा खूप ओळखीचा वाटला होता कुठेतरी पाहिल्यासारखा वाटत होता आता उमजले, की तो माझ्या आईचाच चेहरा होता अन् त्या दिवशी मला कसे कळले नाही ? त्या रात्री माळरानावरून ऐकू आलेल्या हाका त्याही तिच्याच होत्या ! त्या वेळी ती प्राणांतिक यातनेने तळमळत होती शरीराचे कवच फोडून बाहेर पडण्यासाठी धडपडणाऱ्या आत्म्याने निरोप घेताना अखेरच्या निर्वाणीने मारलेल्या हाका नाने–मिने–नाने–मिने मुंबईहून निघताना माझा निरोप घेताना माझ्याकडे ती अश्रुपूर्ण नेत्रांनी बघत होती तिला कळले होते का, की तिची लाडकी मिनी पुन्हा तिला भेटणार नव्हती ?

गाडी वेगाने पुढे चालली होती मधु व निमा गप्पांच्या नादात असल्यामुळे त्यांचे माझ्याकडे बराच वेळ लक्ष नव्हते मी काही बोलत नाही हे थोड्या वेळाने त्यांच्या लक्षात आले "काय लिहिलेय पत्रात ?" मधूने हलकेच विचारले "वाईट बातमी आहे ' मी कसेबसे सांगितले अन् निमाचा हात

घट्ट धरला "निमा, आई गेली मला सोडून" पुढे मला बोलता येईना आम्ही दोघी एकमेकींना मिठी मारून अश्रू ढाळू लागलो न बोलताच एकमेकींच्या भावना एकमेकींना कळत होत्या "घरी परत जाऊ या का?" मधूने विचारले "नको, नको घरी बसणे असह्य होईल" मी म्हटले

त्या दिवशी आम्ही एकसारखे दिवसभर फिरत होतो एक क्षणभर जरी थांबले तरी दुःखाच्या प्रचंड लाटेत मी वाहून जाईन अशी भीती वाटत होती माझे दुःख मी आतल्या आत दाबून ठेवले त्यामुळे मनावर असह्य ताण पडला होता पण माझे दुःख मलाच सहन करावयाचे होते

फिरताफिरता आम्ही एका डोंगरमाथ्यावरील चर्चपाशी आलो नकळतच आमची पावले आत वळली आतमध्ये घनगंभीर शांतता होती.



मधूने एक मेणबत्ती पेटवून हलकेच माझ्या हातात दिली येशू ख्रिस्ताची मूर्ती अंधुक प्रकाशातून करुणपणे पाहात होती त्याच्यासमोर मेणबत्ती ठेवून मी हात जोडले अन् त्याच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहू लागले त्याच्या रूपातून आईचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी त्याच्या कारुण्याने

ओथंबलेल्या नजरेतून माझी आईच माझ्याकडे डोळे भरून बघत होती माझ्यावर मायेचा वर्षाव करीत होती बघताबघता माझ्या डोळ्यांतून अश्रूंचा महापूर बांध फोडून फोफावत बाहेर पडला दु:खाचे कढ एकापाठोपाठ येणाऱ्या लाटेप्रमाणे बाहेर पडत होते थोड्या वेळाने दु:खाचा पहिला भर ओसरल्यावर मी भानावर आले माझ्याभोवती घोटाळणाऱ्या आईच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून प्रार्थना केली, अन् जड अंत:करणाने मी तिचा अखेरचा निरोप घेतला तिच्याबरोबर माझ्या खऱ्या अर्थाने संपलेल्या बालपणाचाही ।

REFBK-0020829